मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग

राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.

२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.

३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.

४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

वर्ष २३ - अंक : पाचवा

सप्टेंबर १९६८

'युगवाणी' दिवाळी अंक

कथा व कवितांसाठी पारितोषिक योजना

'युगवाणी'चा दिवाळी अंक ललित साहित्य विशेषांक म्हणून प्रसिद्ध होईल. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या कथा व कवितांसाठी एक पारितोषिकांची योजना आखण्यात आली आहे. या पारितोषिकांसाठी एकूण पाचशे रुपयांची रकम राखून ठेवण्यात आली असून त्यापैकी कथांसाठी रु. ३०० ची व कवितांसाठी रु. २०० ची पारितोषिके देण्यात येतील. कथा व कवितांसाठी प्रत्येकी तीन ते पाच पारितोषिके देण्यात येतील. पारितोषिकपात्र कथा–कवितांची संख्या व पारितोषिकांचे रकमांची विभागणी परीक्षक मंडळांच्या सल्ल्यानुसार करण्यात येईल

या पारितोषिकांसाठी विषयाची अट नाही. तसेच नव्या, जुन्या, प्रथितयश, होतकरू, सर्व लेखकांना व कवींना ही स्पर्धा खुली आहे. मात्र कथा वा कविता स्वतंत्र असावी. अनुवादित वा रूपांतरित कथा–कविता विचारांत घेतल्या जाणार नाहीत.

स्पर्धेसाठी नेमलेल्या परीक्षकांच्या सल्ल्याने संपादकांनी घेतलेला निर्णय अखेरचा राहील.

स्पर्धेसाठी आलेल्या कथा – कवितांमधून पारितोषिकांसाठी निवड झालेले साहित्य 'युगवाणी'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध होईल. पारितोषिकांसाठी निवड न झालेल्या काही कथा–कविताही प्रसिद्धीयोग्य वाटल्यास त्या प्रसिद्ध करण्यात येतील व त्यांसाठी 'युगवाणी'च्या पद्धतीप्रमाणे मानधन दिले जाईल.

स्पर्धेसाठी कथा व कविता 'संपादक' युगवाणी विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर या पत्त्यावर दि. २५ सप्टेंबर १९६८ पर्यंत पाठवाव्या. पाकिटावर **दिवाळी अंक कथा–कविता स्पर्धेसाठी** असे स्पष्ट लिहावे. लेखकाचे नाव, संपूर्ण पत्ता वेगळ्या कागदावर लिहून तो कागद मजकुराबरोबर टाचून पाठवावा. **कथेवर वा कवितेवर नाव लिहू नये.**

स्पर्धेचा निर्णय दिवाळी अंकात जाहीर होईल. त्यासंबंधी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. नापसंत साहित्य परत पाठविण्यासाठी पुरेशी टपालाची तिकिटे सोबत असल्यासच दिवाळी अंकाच्या प्रकाशनानंतर ते साहित्य परत पाठविले जाईल किंवा कार्यालयातून परत मिळू शकेल.

स्पर्धेत भाग घेऊ इच्छित नसतील अशा लेखकांनी वा कवींनीही दिवाळी अंकासाठी साहित्य पाठविल्यास त्याचा प्रसिद्धीसाठी अवश्य विचार केला जाईल व प्रसिद्ध केलेल्या साहित्याबद्दल रीतसर मानधन दिले जाईल.

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २३) सप्टेंबर १९६८ (अंक ५

संपादक
प्र. वा. ऊर्ध्वरेषे

संपादक मंडळ
डॉ. मा. गो. देशमुख
प्राचार्य भाऊ मांडवकर
डॉ. द. भि. कुळकर्णी

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
व्हीनस प्रिंटिंग हौस
धंतोली, नागपूर–१

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

तीन श्रेष्ठ साहित्यकारांना श्रद्धांजली

वेदमूर्ती पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर, ह. भ. प. प्रा. सोनोपंत दांडेकर व साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास या तीन ज्येष्ठ व श्रेष्ठ विद्वानांच्या निधनाने मराठी साहित्याचीच नव्हे तर महाराष्ट्राच्या समाज जीवनाची अपरिमित हानी झाली आहे.

पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर

पं. सातवळेकर यांनी आधुनिक काळात वेदविद्येच्या व संस्कृत भाषेच्या अभ्यासाच्या क्षेत्रात नवे चैतन्य निर्माण केले. ऋषितुल्य जीवन, प्रगाढ विद्वत्ता व अविश्रांत परिश्रम यांचा अत्युच्च संगम त्यांच्या जीवनात झाला होता. पूर्ण शंभर वर्षांचे सफल जीवन जगून त्यांनी केलेल्या थोर कामगिरीबद्दल महाराष्ट्रानेच नव्हे तर समग्र भारताने गेल्या वर्षीच यांचा गौरव केला होता. त्यानंतर एका वर्षाच्या अवधीतच त्यांनी या जगाचा निरोप घेतला परंतु त्यांचे ऐहिक जीवन संपले असले तरी त्यांचे कार्य अमर आहे. व त्यांचे ग्रंथ भारतीयांना सतत प्रेरणा देत राहतील यात संशय नाही.

ह. भ. प. सोनोपंत दांडेकर

प्रा. सोनोपंत दांडेकर याचे व्यावसायिक जीवन शिक्षणक्षेत्रात व्यतीत झाले. तत्त्वज्ञानाचे विद्वान प्राध्यापक व प्राचार्य म्हणून तर त्यांनी विद्यार्थ्यांचे प्रेम व आदर संपादन केलाच, पण त्याहीपेक्षा त्यांची मोठी कामगिरी म्हणजे वारकरी पंथाचे नेतृत्व. त्यांनी महाराष्ट्रात सर्वत्र संचार करून आपल्या रसाळ प्रवचनांनी अक्षरशः लाखो लोकांची मने जिंकली. त्यांच्या अखेरच्या आजाराच्या काळात व मृत्यूनंतर पुण्यापासून आळंदीपर्यंत निघालेल्या अंत्ययात्रेत लोकांच्या या भक्तीची व श्रद्धेची अभूतपूर्व प्रचीती आली. त्याचे निर्लेप चारित्र्य, वारकरी पंथाचे कार्य व भक्तिमार्गाचा प्रसार यांचा महाराष्ट्राला विसर पडणे शक्य नाही.

साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास

साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांनी वयाची पन्नाशी नुकतीच ओलांडली असतानाच यांचे निधन झाले या वार्तेने विदर्भच नव्हे तर सबंध महाराष्ट्र हळहळला. त्यांचे प्रकांड पांडित्य, स्वतंत्र प्रज्ञेची व प्रतिभेची सतत साक्ष पटविणारी ग्रंथरचना व मोठमोठ्या समुदायांना मंत्रमुग्ध करणारे ओजस्वी वक्तृत्व यामुळे त्यांना मराठी साहित्यसृष्टीत व सामाजिक जीवनात आगळे स्थान प्राप्त झाले होते. विदर्भ साहित्य संमेलनाच्या वाशीम येथील अधिवेशनाचे अध्यक्षस्थानही त्यांनी भूषविले होते. धर्म, इतिहास, पौराणिक वाङ्मय वगैरेप्रमाणेच राजकारण व समाजकारण या क्षेत्रातही त्यांची लेखणी व वाणी अत्यंत प्रभावी होती. त्यांची धीरगंभीर वाणी आता ऐकू येणार नसली तरी त्यांचे ग्रंथ हे त्यांचे चिरंतन स्मारक आहे.

' युगवाणी ' च्या वतीने आम्ही या ज्येष्ठ साहित्यकारांच्या स्मृतीला आदरपूर्वक श्रद्धांजली अर्पण करतो.

नावात काय आहे ?

माधव गोपाळ देशमुख

नावात काय आहे ? BEE

का आग्रह ? रसिका ! नाव सांग मज म्हणसी,
नावात मोहनी भासो सामान्यासी !
घननीलमणिप्रासादचंद्रशालांत,
ते असंख्य सुंदर तारे चमचमतात,

अनिवार इंद्रजलाते–टाकिती,
वसुवेस मंत्रमुग्धेते–भ्रमविती,
संगूढ नेत्रसंकेते–वाहती,

हे विलास हरिती वस्तुजातहृदयासी,
वद ! त्यांची नावे काय पुसाया जाशी ?

तरुलता प्रसूनान्विता राहती रानी,
संपूर्ण भारिती वनश्रेणि गंधांनी,

ह्या प्रमदवनांतरि शिरले–जे जन,
तरुलनाचि अंगे झाले–आपण,
निज नामरूपही गेले–विसरून,

आनंदसमीरण डोल देतसे त्यांसी,
टपटपा पडति खालती लूट कुसुमांसी !

'What is in a name? That which we call rose
By any other name would smell as sweet.'

शेक्सपीअरच्या ' रोमिओ अँण्ड जूलियट् ' मधील वरील पंक्तींवरून ' नावात काय आहे ? ' या कवितेचे शीर्षक ' Bee ' कवींनी घेतले आहे. या पलिकडे या दोन कल्पनांमध्ये काहीच साम्य नाही.

काव्यरसिकाची वृत्ती कशी असावी ?

'नावात काय आहे ? ' हा ' Bee ' कवींना कुणा रसिकाने प्रश्न केला व त्याचे त्यांनी उत्तर दिले, असेच केवळ नसून या कवितेत ' Bee ' कवींनी श्रेष्ठ काव्यापासून होणाऱ्या आनंदाची मीमांसा केली आहे. ' तुमचे नाव काय ते सांगा ? ' अशा प्रश्नाचे उत्तर या कवितेत आढळणार नाही. पण आचार्य अत्र्यांनी ' फुलांची ओंजळ – सत्कार' मध्ये अशी भूमिका स्वीकारल्यामुळे जणू काही एखाद्या नववधूप्रमाणे लाजत–मुरकत 'Bee' कवींनी आपले नाव घेतले, किंवा घेण्याचे टाळले, असे सूचविले आहे. वास्तविक पाहता ही कविता कवीच्या नावासंबंधी नसून खऱ्या काव्यरसिकाची वृत्ती कशी असावी हे या कवितेत सांगितले आहे.

'नावात जादू आहे' हे अप्रस्तुत आहे !

आचार्य अत्र्यांप्रमाणेच त्या काळातले सुप्रसिद्ध कवी श्री. आनंदराव टेकाडे यांनाही 'नावात काय आहे ? ' हा जणू काही 'Bee' कवींना पडलेला महान बिकट प्रश्न आहे व त्या प्रश्नाचे उत्तर त्यांना माहीत नसल्यामुळे ते आपण दिले पाहिजे, नव्हे ते देणे हे आपले परम कर्तव्य आहे असे वाटले व अशा बुद्धीने त्यांनी ' नावात काय आहे ?'—या कठीण प्रश्नाचे ' नावात जादू आहे !' असे सांगे उत्तर त्याच मथळ्यानिशी एका कवितेतूनच दिले ! हे उत्तर मुळातूनच वाचण्यासारखे आहे, ते असे—

नावात जादू आहे !

[" Bee " कवींच्या, 'नावात काय आहे ?' या कवितेस उत्तर]

(भूपती खरे ते- या चालीवर)

नावात असे जी जादुगिरी भरलेली
अन्यत्र कुठेही नसेल वाटे असली !

श्रीकृष्ण' नाम हे श्रवणी-वदनी येता
ती दिव्य पुढे ये कर्म-समर्था 'गीता'
षंढही षंढपण विसरूनिया भट होतो
हा प्रभाव नुसता 'ग्रंथ' शब्दि का दिसतो ?

सुचविते 'शकुनि' ही व्यक्ती । का जना
' कर्णार्जुन ' का बोधीती । आपणा
सतीधर्म 'गांधारी' ती । दाविना ?

परिसता 'भीष्म' किति हृदयी उठति तरंग
ज्यापुढे प्रतिज्ञा होय हरीची भंग !

'तव नाथ येइ गे !' वच हे पडता श्रवणी
सानंदमना किति होय विरहिणी रमणी
वाटेल इतरि का तिला स्निग्धता तीच ?
प्रथमाभिधान मग महती ये स्वरुपीच

मोद दे दृष्टि जननीची । बालका
तैशिच इतर युवतीची । गमत का
कवणाला प्रचिती याची । नाही का ?

' आई ' ह्या शब्दी दिव्य साठले जितुके
प्रत्यक्ष ईश्वरी नसेल वाटे तितुके !

" नावात मोहिनी भासो सामान्यासी "
कविराया वदसी कवनी ह्या बोलासी
मग बाभळिची का कुणी वेचितो सुमने ?
(तोडिती श्रमे का गुलावपुष्पा सु-मने)

प्रज्ञासचि नामी भासे । मोहिनी
सामान्य उलट उपहासे । जाणुनी
जग रम्य वाटते ऐसे । देखुनी

कलहंस रसिक हा जलमिश्रित पय जग हे
पय पिनो तयातुनि रसिक घटाघटा पाहे !

व्यवहारी जग हे सकलहि नच वेदान्ती
सर्वात्मभाव नच म्हणुनि वसे तच्चित्ती
हा सूर्य जयद्रथ नित्य पाहिजे त्याते
तर्करीति देई दूर झुगारुनिया ते
कोळसा हिरा हे समान गुण धर्माचे
कोळशास मग का कुणि दे मोल हिऱ्याचे ?

अग्नीवरि पद ठेवील । का कुणी ?
कूपांत उडी घेईल । का कुणी ?
कालकूट गरल पिईल । का कुणी ?

हे समजुनि करि त्या खुळ्यात जग लोटील
मग सुज्ञ जगाला दोष कोण देईल ?

****

नाजूक व हळूवार स्वभाव हेही अप्रस्तुत

आचार्य अत्र्यांनी तर अशीही उत्प्रेक्षा केली आहे की "आपल्या मोहक सुवासाने सर्व वनप्रदेश दरवळून टाकणाऱ्या पण आपण मात्र स्वतः एका दगडाआड दडून बसलेल्या लाजऱ्या फुलाला उद्देशून रे. टिळक यांनी जी एक सुंदर कविता लिहिली आहे ती जणू काय Bee कवींच्या जीवनक्रमाला व वृत्तीला अनुलक्षूनच लिहिलेली असावी असे मानले तर त्यात चूक मुळीच होणार नाही." "अप्रसिद्धीच्या संरक्षक पडद्याआड निर्वेधपणे गुंजारव करीत बसण्यातच Bee कवींना समाधान वाटते, " या आचार्य अत्र्यांच्या विधानांवरून ही कविता Bee हे एक ' अन्तर्मुख ' वृत्तीचे व ' आत्मक्रीडः आत्मरतिः ' अशा प्रकारचे 'आत्माराम' होते अशी समजूत होईल. " प्रसिद्धीच्या हमरस्त्यावर बसून येणाऱ्याजाणाऱ्यांची वर्दळ सहन करणे हे Bee यांच्या नाजूक स्वभावाला कधीच मानण्यासारखे नव्हते व नाही" असाही एक अप्रस्तुत निष्कर्ष आचार्य अत्रे यांनी आपल्या 'सत्कार' मध्ये काढला आहे.

'तुम्ही मला नाव सांगण्याचा विनाकारण आग्रह का करिता ?' असा लाजाळूच्या पानाप्रमाणे Bee कवींचा लाजरा व हळूवार स्वभाव आहे, असे म्हणणारे आचार्य अत्रे अशा स्वभावाचे प्रत्युदाहरण देताना आजकालच्या आत्मप्रसिद्धीच्या व आत्मघोषणेच्या काळातील पुरुषांचा उल्लेख करतात. वास्तविक पाहता 'नावात काय आहे ?' असा Bee कवींना किंवा कोणत्याही कवीला कोणी प्रश्न विचारला नाही व त्याचे उत्तर देणें हेही ही

अनुक्रमणिका

कविता लिहिताना Bee कवींना अभिप्रेत नव्हते. तसेच या कवितेतून Bee कवींच्या तथाकथित लाजऱ्या, हळू-वार व नाजुक स्वभावाचा कुठेही प्रत्यय येत नाही

कवीचे व्यक्तित्व : लौकिक आणि अलौकिक

'Bee कवींची कविता आत्मलक्षी नसल्याने तिच्यात आत्मचरित्रपर उल्लेख कोठेही आले नाहीत" हा आचार्यांनी निर्माण केलेला एक विरोधाभास आहे. कारण आत्मलक्षी (subjective) कविता करणारा कवी हा आत्मचरित्र सांगत असतो हा एक गैरसमज आहे. आणि 'आत्मलक्षी' आणि 'परलक्षी' अशी केलेली काव्याची वर्गवारी हीच Bee कवींच्या काव्यस्वरूपावर अन्याय करणारी आहे. तरीपण विशेषेकरून 'नावात काय आहे ?' ही कविता तर खऱ्या अर्थाने सर्वस्वी आत्मलक्षीच म्हणावी लागेल. आत्मलक्षी कवितेत कवीच्या खाजगी चरित्रातील उल्लेख यावेत अशी अपेक्षा करणे हे चुकीचे ठरते. कवितेच्या रसग्रहणाला अशा उल्लेखांची आवश्यकता नसते. कवीचे लौकिक जीवनातील व्यक्तित्व आणि त्याच्या काव्यातून प्रतिबिंबित झालेले त्याचे अलौकिक व्यक्तित्व वेगवेगळ्या पातळीवरून समजून घेतले पाहिजे. कवी आणि काव्य यांच्यातील प्राचीन साहित्यशास्त्रकारांनी वर्णिलेला संबंध लक्षात घेऊन Bee कवींनी त्याला येथे काव्यरूप दिले आहे, हे ओळखल्याशिवाय या काव्याचे अंतरंग लक्षात येणार नाही.

हा एक प्रश्नालंकार

'नावात काय आहे ?' हा एक प्रश्नालंकार आहे. कवीच्या नावाला काही महत्त्व नाही असा त्याचा रोख आहे. या प्रश्नाचे उत्तर 'नावात जादू आहे' हे जसे नाही त्या प्रमाणे 'मला माझे नाव सांगण्याची लाज वाटते ; ते मला तुम्ही विचारू नका' हेही नव्हे. श्रेष्ठ कविता म्हणजे काही व्यवहारातील प्रश्नोत्तरे नव्हेत. अत्रे किंवा टेकाडे समजतात त्याप्रमाणे Bee सारखे प्रतिमासंपन्न आणि मर्मज्ञ कवी एका महत्त्वाच्या काव्यविषयक प्रश्नाच्या बाबतीत सर्वसामान्य व्यावहारिक पातळीवर येतील हे संभवत नाही; इतकेच काय पण या कवितेत तर कवीने 'नावात मोहनी भासो सामान्याशी' अशी रसिकतेशी संबंध नसलेल्यांची 'सामान्य' अशा शेलक्या शब्दाने संभावना केली आहे.

'रसिका' या शब्दातील सौंदर्यसर्वस्व

या कवितेतील सारे सौंदर्य 'रसिका !' या एका शब्द भोवती गुंफलेले आहे. कालिदासाच्या 'मेघदूता'तील "कच्चित् भर्तुः स्मरसि रसिके ! त्वं हि तस्य प्रियेति" या प्रसिद्ध पंक्तीतील काव्यसौंदर्य 'रसिके' या शब्दातील व्यंजनेत सामावले आहे अशी प्रसिद्ध टीकाकारांनी ग्वाही दिली आहे. ध्वन्यर्थाबाबत Bee कवी व विशेषतः त्यांची ही कविता 'मेघदूता'च्या तोडीची असून कालिदासाप्रमाणे याही कवितेत कवीने आपल्या शब्दाशब्दातून ध्वनिगंगा वाहविली आहे.

सर्वसामान्य लोक केवळ नावाला मोहून जातात याचे कारण ते केवळ नामरूपाच्या बंधनात गुरफटलेले असतात. परंतु काव्याच्या प्रमत्त वातावरणात प्रवेश करणारे कवी तेथे शिरल्यानंतर स्वतःचे नामरूपही विसरून जातात. काव्याच्या क्षेत्रात कवीच्या नावाला महत्त्वच काय पण अस्तित्वही उरत नाही. मग 'रसिकाचे' काम कवीच्या आत्मानंदाशी समरस होऊन काव्याचा आस्वाद घेणे एवढेच राहते. हा सारा आशय या कवितेत 'बीं' नी अर्थगर्भ असे दोन दृष्टान्त देऊन मार्मिकपणे सूचित केला आहे.

कवितेचा आशय

घननील अशा रत्नांनी बनविलेल्या प्रासादाच्या चंद्रशालेत 'शुभ्र चुनेगच्चीवर' म्हणजेच मेघ, निळा रंग आणि चंद्राला सौंदर्य देणारी भव्य पार्श्वभूमी असलेल्या आकाशात, लुकलुकणारे असंख्य व सुंदर तारे जणू आपल्या प्रभावी वशीकरणाच्या साहाय्याने मंत्रमुग्ध झालेल्या स्त्रीसदृश अशा पृथ्वीस मोहात पाडतात. किंबहुना पृथ्वीची भ्रमंती ही जणू काही त्या ताऱ्यांच्या आकर्षणामुळेच एकसारखी चालली आहे. कारण हे तारे आपले लुकलुकणारे डोळे मिचकावून केवळ पृथ्वीलाच कळतील असे संकेत करून तिला साद घालतात. सृष्टीच्या ह्या लीला प्रत्येक व्यक्तीच्या हृदयाला आनंद देतात. अशा वेळी आपले हृदय आनंदमय व्हावे की आपण त्या ताऱ्यांची नावेच विचारावीत ? अर्थात काव्याने हरखून जाणे ही मुख्य गोष्ट. कवीच्या नावाची चौकशी करणे हे अरसिकतेचे द्योतक होय.

रानामध्ये फुललेल्या तरुलता आपल्या सुगंधाने सारे रान भारून टाकतात. अशा उन्मत्त, सुगंधी वातावरणात

शिरलेले कवी वनातील जे विषय (तरुलता) त्यांच्याशी एकरूप होतात. विषय आणि विषयी असे द्वंद्व तेथे उरत नाही. अर्थात ते स्वतःचे नावरूपही विसरून जातात. अशा तरुलतांशी एकरूप झालेल्या कवींना आनंदरूपी वायूने हेलकावे दिले तर झाडावरून जशी फुले टपटपा खाली पडतात तशी कवीच्या मुखामधून कविता ही सहजपणे व्यक्त होते. फुलांचा टपटपा सडा पडत असताना गंधवेड्या रसिकांनी ती फुले लुटावीत हे स्वाभाविक आहे. फुलांचे खरे रसिक फुलांच्या नावाची चौकशी करीत बसत नाहीत. त्याप्रमाणें काव्यरसिकांनी कवीला लाभलेल्या काव्यानंदाचा वाटा उचलावा. प्रतिभावान कवी काव्यनिर्मितीच्या आनंदाच्या क्षणी या नामरूपात्मक सृष्टीच्या पलीकडे गेलेले असतात. त्यांना आपल्या नावाचे तरी भान कसे राहणार ? ते स्वतःच जे विसरून गेले ते कवीचे नाव विचारण्याचा—त्याचे लौकिक जीवन जाणून घेण्याचा अप्रयोजकपणा खऱ्या रसिकाने करू नये.

निर्मितीचा आनंद व आस्वादाचा आनंद

दुसऱ्या कडव्यातील 'आनंद-समीरण डोल देतसे त्यांसी' या पंक्तीमधील 'आनंद-समीरण' या शब्दावरून प्रमदवनामध्ये शिरणारे व स्वतः तरुलता होऊन आपले नावरूप विसरून जाणारे हे रसिक होत, असा बहुतेक समीक्षक अर्थ करिताना दिसतात. "काव्यरसात जर रसिक खरा रंगला असेल किंवा तल्लीन झाला असेल तर त्याला कवीचे नाव विचारण्याची शुद्धही राहात नाही– मग तुम्ही मला नाव सांगण्याचा विनाकारण आग्रह का करिता ?" असे आचार्य अत्रे लिहितात. वास्तविक 'आनंद' हा शब्द येथे काव्यविषयाशी एकरूप होणाऱ्या कवीच्या निर्द्वंद्व स्थितीला उद्देशून वापरलेला आहे. 'आनंद' ही मनाची निर्द्वंद्व अवस्था होय. पण ती प्रथम काव्यविषयाशी (तरुलताशी) एकरूप होणाऱ्या कवीला उद्देशून वर्णिली आहे. ते सृष्टीच्या नामरूपात्मक अवस्थेच्या पलीकडे जातात व त्यांच्या या अवस्थेमधून म्हणजेच आनंदाच्या डोलण्यामधून स्वाभाविकपणे जी काव्यनिर्मिती होते, तिच्याशी–तिच्यातील आनंदरूप अशा कवीच्या मनाच्या अवस्थेशी–रसिकाने आपले साधारणीकरण करून घेतले पाहिजे. अर्थात् येथील आनंद म्हणजे काव्याच्या आस्वादाचा आनंद नसून कवीच्या निर्मितीचा आनंद होय. त्या आनंदाशी रसिकाने आपल्या भावनेचे साधारणीकरण करून घेऊन टपटपा खाली पडणाऱ्या फुलांना वेचण्याच्या उत्कटतेने काव्याचा आनंद लुटावा. सामान्य माणसाप्रमाणे कवीच्या नावाविषयी मनात फाजील उत्सुकता बाळगून 'कसेही करा पण तुमचे नाव काय ते सांगा' असा आग्रह करू नये.

ज्ञानेश्वरांच्या प्रतिज्ञोत्तराचे स्मरण

या काव्यात कवीचा लाजरा, बुजरा, हळुवार अथवा नाजुक असा स्वभाव व्यक्त होत नसून कवीचा निर्भय असा आत्मविश्वास व रसिकाच्या साहित्यशास्त्रोक्त भूमिकेची यथार्थ जाणीव या दोन गोष्टी व्यक्त होतात. 'बी' कवींच्या या कवितेवरून ज्ञानेश्वरांच्या–

एकलें अवधान देइजे
मग सकल सुखांसीं पात्र घेइजे ।
हे प्रतिज्ञोत्तर माझें
उघड आइकां ।।

या नवव्या अध्यायातील प्रारंभीच्या सडेतोड, आत्मनिर्भर व आत्मविश्वस्त उद्गारांची आठवण होते. रसिकांनी कवीच्या नावाची चौकशी करणे ही गोष्ट ताऱ्यांची अगर वृक्षवेलींची नावे विचारण्याइतकी भडाणीपणाची आहे असे सडेतोडपणे ठणकावून सांगणारा कवी जेव्हा लाजरा नाजुक व हळुवार ठरतो तेव्हा मात्र अशा कवीचा समानधर्मा अद्यापि निर्माण व्हावयाचा आहे असे म्हणावे लागते.

मराठी समीक्षेचा विकास :

'मराठी समीक्षेचा विकास' या नागपूर आकाशवाणीवरील भाषण मालिकेतील डॉ. अ. ना. देशपांडे व प्रा. म. वावगावकर यांची दोन भाषणे आकाशवाणीच्या सौजन्याने 'युगवाणी'च्या ऑगस्टच्या अंकात प्रसिद्ध झाली होती. त्यानंतरची प्रा. श्री. मा. कुळकर्णी व डॉ. द. भि. कुळकणी यांची दोन भाषणें येथे प्रसिद्ध करीत आहोत.

— संपादक

१९२०–१९४५ कालखंड

प्रा. श्री. मा. कुळकर्णी

१९२० हे वर्ष भारताच्या व महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात तसेच मराठी वाङमयाच्या इतिहासातही एका नव्या कालखंडाचा प्रारंभ म्हणून महत्वाचे आहे. १९२० ते ३५ या कालखंडात म. गांधींच्या नेतृत्वाने व कर्तृत्वाने राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक इ. क्षेत्रात नवीन विचारसरणी सुरू झाल्या. या सर्वांना मिळून पुढे गांधीवाद हे नाव प्राप्त झाले. या विचारसरणींचा प्रसार हळूहळू होत होता व त्याचा प्रभावही कमी अधिक प्रमाणात सर्व क्षेत्रांत दिसून येत होता. महाराष्ट्रातील बहुसंख्य बुद्धिजीवी मध्यमवर्ग मात्र या विचारसरणींपासून पुष्कळच अलिप्त राहिला होता. हा वर्ग या काळात बेताची विद्या, पोटापुरती नोकरी, साधेल तेवढी चैन व करमणूक अशा काहीशा सुखवादाकडे झुकलेला दिसतो. बहुसंख्य साहित्यिक व साहित्य-समीक्षकही या वर्गातूनच पुढे आले होते.

गांधीवाद येथे रुजत असतानाच एक नवी विचारसरणीही या देशात येत होती. रशियाच्या राज्यक्रांतीने व समाजक्रांतीने जगाचे लक्ष वेधून घेतले. १९२४ च्या सुमारास भारतात साम्यवादी पक्षाची स्थापना झाली. यात महाराष्ट्रीयांचा पुढाकार होता. १९३४ साली कॉंग्रेसने आपलेच एक अंग म्हणून समाजवादी पक्षाची स्थापना केली. अशारीतीने साम्यवाद व समाजवाद हे समाजजीवनावर प्रभाव गाजवू लागले. या दोन विचारसरणींप्रमाणेच जगात आलेल्या अन्य वैचारिक व सामाजिक परिवर्तनाचाहि परिणाम येथील जीवनसरणीवर व विचारसरणीवर होऊ लागला. या सर्वांचा प्रभाव साहित्यक्षेत्रातही दिसून आल्याशिवाय राहिला नाही. या भिन्न विचारसरणीतून वाङमय निर्माण होऊ लागले. त्यापेक्षाहि अधिक या विचारसरणीतून वाङमयाकडे पाहिले जाऊ लागले, वाङमयाचे मूल्यमापनही होऊ लागले. १९२० ते ४५ या काळात जी समीक्षा मराठीत उदयाला आली व विकास पावली तिची सामाजिक व वैचारिक पार्श्वभूमी ही अशी आहे.

या कालखंडातील समीक्षेच्या स्वरूपाची चर्चा करण्यापूर्वी एक मुद्दा स्पष्ट व्हायला पाहिजे. साहित्यशास्त्र आणि टीकावाङमय वा समीक्षा एक नव्हेत हा तो मुद्दा होय. प्राचीन काळी साहित्यशास्त्र हे परिणतावस्थेला पोचले होते परंतु टीकावाङमय अगदीच तुरळक होते. काव्यलक्षण, काव्यकारण, काव्याचे प्रयोजन काव्यस्वरूप, काव्याचे घटक, काव्यानंदाचे स्वरूप व कारणे इ. संबंधीची शास्त्रीय भूमिकेवरून केलेली चर्चा व तीतून प्रस्थापित केलेले सिद्धान्त यांचा साहित्यशास्त्रात समावेश होतो. तर टीकावाङमयात एकेका कलाकृतीच्या आस्वादाचा, स्वरूप विवेचनाचा, मूल्यमापनाचा वगैरे समावेश होतो. या मीमांसेतून क्वचित काही नियमही निष्पन्न वा सिद्ध होतील. परंतु येथे मुख्य भर विशिष्ट कलाकृतीच्या आस्वादाचा वा मूल्यमापनाचा असतो. अर्थात न्यायाधीश एखाद्या खटल्यासंबंधी निवाडा देत असताच काही नियमही निर्माण करतो व त्यांचा पुढे केस लॉ बनतो तसा प्रकार टीकेच्या बाबतीतही होतो. पण मुळात साहित्यशास्त्र व हे टीकावाङ्मय भिन्न आहेत.

या मुद्याची यहून अधिक चर्चा येथे करणे शक्य नाही व आवश्यकहि नाही. केली तेवढी चर्चा अशासाठी केली की प्रस्तुत कालखंडात जे वाङ्मयविवेचनात्मक वाङ्मय निर्माण झाले आहे त्यातील साहित्यशास्त्रपर वाङ्मय वगळून टीकावाङ्मयाचाच विचार करणे शक्य व मान्य व्हावे. उदाहरणार्थ या कालखंडात प्रकाशित झालेले अभिनव काव्यप्रकाश, सौंदर्यशोध आणि आनंदबोध हे रा. श्री. जोगाचे ग्रंथ, काव्यालोचन हा द. के. केळकरांचा ग्रंथ किंवा "रसविमर्श" हा के. ना. वाटव्याचा ग्रंथ, तसेच भारतीय नाट्यशास्त्र अलंकार मंजूषा, मराठीचे साहित्यशास्त्र हे ग्रंथ, यांचा परामर्श येथे घेण्याचे कारण नाही.

"साहित्यशास्त्र" या सदरात मोडणारे असे हे ग्रंथ बाजूला सारले तरी टीकावाङ्मयात वा समीक्षावाङ्मयात पुन्हा दोन भाग स्पष्ट दिसतात. हे दोन्ही भाग "आधुनिक" असल्यामुळे त्यांचा विचार येथे करावाच लागेल. विशिष्ट कलाकृतीचा आस्वाद व मूल्यमापन करणारी "परीक्षणे" हा एक भाग आणि जुन्यानव्या साहित्यविषयक प्रश्नांची चर्चा करणारे निबंध वा प्रबंध हा एक भाग हे ते दोन भाग होत. काही आधुनिक वाङ्मयप्रकाराची चर्चा करणारे प्रबंधही या दुसऱ्या भागातच समाविष्ट करणे सोयीचे होईल.

फुटकळ साहित्यकृतींची परीक्षणे या काळात उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणात प्रसिद्ध होऊ लागली. नियतकालिकांची वाढती संख्या, चोखंदळ वाचकांच्या संख्येत झालेली वाढ आणि खुद्द साहित्यकृतींच्या निर्मितीत झालेली वाढ यामुळे साहजिकच परीक्षणांची संख्याही वाढली. पण ही वाढ म्हणजे काही समीक्षेचा विकास नव्हे. विकासाला अनुकूल परिस्थिती मात्र या वाढीमुळे निर्माण झाली असे म्हणता येईल.

या परीक्षणांच्याकडे पाहिले तर प्रथम जी गोष्ट लक्षात येते ती म्हणजे या परीक्षणांची कमी झालेली लांबी-रुंदी. १९२० च्या आगे-मागे प्रसिद्ध झालेली "प्रेम की लौकिक ?" व "दुटप्पी की दुहेरी" या कादंबऱ्यांची वा. म. जोशींनी केलेली परीक्षणे, किंवा केळकरांनी केलेले कोल्हटकरांच्या मूकनायकाचे परीक्षण आणि कोल्हटकरांनी केळकरांच्या तोतयाच्या बंडाचे परीक्षण, ही व असली परीक्षणे पाहिली व त्यानंतरची वा. म जोशी, ना. सी. फडके, ग. त्र्य. माडखोलकर, वि. स. खांडेकर यांनी केलेली परीक्षणे पाहिली म्हणजे लांबी रुंदी मध्ये पडलेला फरक चटकन नजरेत भरतो. अर्थात या बाह्य फरकाच्या मुळाशी कलाकृतीविषयीच्या कल्पनेत व दृष्टीत पडलेला फरक आहे हे ध्यानात घ्यायला हवे. कथानक, स्वभावपरिपोष, भाषा, निसर्गवर्णने, तत्वचर्चा इ. घटक हे भिन्न भिन्न व स्वतंत्र आहेत अशी समजूतीने पूर्वीच्या दीर्घ परीक्षणात एकेका घटकाचा सविस्तर परामर्श घेतला जात असे. उत्तरोत्तर ही समजूत बदलायला लागली. कलाकृती ही एकसंध, एकजिनसी, चैतन्यपूर्ण अशी ललितकृती आहे ही जाणीव उदयाला येऊ लागली. यानंतरचा परीक्षणकारही या सर्व घटकांचा विचार करीत नसे असे नाही. पण हे सर्व घटक कलाकृतीपासून अविभाज्य आहेत किंबहुना त्या कलाकृतीच्या एकंदर घाटाला पोषक असे ते आहेत व त्यादृष्टीनेच त्यांचा विचार करायला हवा हे त्याच्या लक्षात यायला लागले होते. हे परीक्षणकार कोणत्याही कृतीचे परीक्षण करतांना ती ललित कृती आहे की नाही हे पाहू लागले व ललितकृती म्हणून तिची वैशिष्टे व वैगुणे शोधू लागले.

या टप्प्यावर टीकाकारांना एकप्रकारच्या टीकावाङ्मयाच्या उपयोग व्हायला लागला. विशिष्ट वाङ्मयप्रकाराच्या स्वरूपाची व त्यात दिसून येणाऱ्या नियमांची चर्चा करणारे वाङ्मय हा तो प्रकार होय. प्रतिभासाधन लेखकाला, ललितकलामीमांसा साहित्यदर्शन, स्वभावलेखन यासारखे ग्रंथ भिन्न भिन्न वाङ्मयप्रकारांच्या तंत्राची चर्चा करणारे आहे. या तंत्राचा आधार घेऊन एखाद्या ललितकृतीचे परीक्षण करण्याचा प्रयत्न १९३० ते ४५ या कालखंडात अनेक परीक्षणकारांकडून झाला व परीक्षणांना तंत्रानुसार परीक्षण व मूल्यमापन असे स्वरूप आले. या परीक्षणात कधी कधी कारागिरीलाच कला समजण्याची चूकही झालेली दिसते. मात्र एवढे खरे की या काळातील परीक्षणकारांना ललितकृतीच्या स्वरूपाची व वैशिष्टचांची अधिक जाणीव झाली होती. याचा अर्थ असा की समीक्षा ही कलाकृतीच्या बाह्यरूपाकडून अंतःस्वरूपाकडे वळू लागली होती, नियमानुसार परीक्षण करताकरताच तिची वैशिष्टचे ध्यानात घेऊ लागली होती, तिन्हाइतपणे परीक्षण व मूल्यमापन करताकरताच रसग्रहण करू लागली होती, रसास्वाद घेऊ लागली होती.

समीक्षेच्या या भागाचा असा विकास चालू असतानाच दुसऱ्या भागातहि घडामोड चालू होती, वाढविकास चालू होता. आणि त्याचा परिणामहि या परीक्षणात्मक भागावर अपरिहार्यपणे होत होता. ग्रंथपरीक्षणाच्या बाबतीत या कालखंडाच्या आरंभी वा. म. जोशी हे जसे आघाडीवर होते तसेच वाङ्मयतत्वविवेचनाच्या बाबतीतहि ते अग्रेसर होते. या वाङ्मयतत्वविवेचनापैकी वाङ्मयाची प्रवृत्ति व ध्येये, काव्यानंदमीमांसा अशासारख्या भागाचा नवीन ललितकृतींच्या निर्मितीवर वा आस्वादना-मूल्यमापनावर फारसा परिणाम होण्यासारखा नव्हता. परंतु वाङ्मय कालनिष्ठ की व्यक्तिनिष्ठ ? भौतिकशास्त्रांची वाढ काव्याला पोषक की मारक ? सत्य, सौजन्य, सौंदर्य यांचे स्वरूप, कलाविषयक दृष्टी, नीती व कला यासारख्या प्रश्नांची, तत्वांची चर्चा व मीमांसा, टीकाकारांच्या कलाविषयक जाणीवेत भर घालणारी व त्यांच्या दृष्टीचा विकास करणारी ठरली आणि त्याचा परिणाम परीक्षणात्मक वाङ्मय समीक्षेवर निश्चितपणे झाला. या व यासारख्या प्रश्नांची चर्चा १९२० ते ४५ या काळात अनेक मातबर साहित्यिकांनी व नामवंत विद्वानांनी केली आहे. न. चिं. केळकर, ना. सी. फडके, ग. त्र्यं. माडखोलकर, वि. स. खांडेकर, पु. य. देशपांडे, द. बा. कालेलकर, श. द. जावडेकर इत्यादींनी भिन्न भिन्न दृष्टिकोनातून व विभिन्न भूमिकांवरून चर्चा केल्या. या काळखंडाच्या अखेरी अखेरीला श्री. के. क्षीरसागर वा. ल. कुळकर्णी, कुसुमावती देशपांडे आदि नव्या जाणीवेच्या समीक्षकांनी या क्षेत्रात पदार्पण केले आणि वाङ्मय तत्वविवेचनाला नवी दिशा, नवे वळण नवी पातळी प्राप्त करून दिली. या सर्व तत्वविवेचनाचा परिचय करून देणे येथे अशक्य व अप्रयोजकही आहे. त्यांचा परामर्श घेणे तर त्याहून कठीण व अशक्य कोटीतील होय. या सर्व विवेचनातील काही महत्वाच्या समीक्षा विषयक भूमिकांचा व दृष्टिकोनांचा उल्लेख करणे व त्यातून समीक्षेची वाटचाल दिग्दर्शित करणे एवढेच शक्य व पुरेसे होईल.

१९२१ साली बडोदे येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदावरून न. चिं. केळकरांनी जे भाषण केले ते पुढील दशकातील वाङ्मय तत्व विवेचनाला चालना देणारे ठरले. काव्यानंदा विषयीची सविकल्प समाधीची उपपत्ती साहित्यशास्त्रीय विचारात मोडणारी म्हणून बाजूला ठेवली तरी कलेचे प्रयोजन या संबंधी त्यांनी केलेल्या विवेचनातून "कलेकरिता कला" हा विचारपुढे आला व त्याला पुढे कलावादाचे स्वरूप प्राप्त झाले हे लक्षात घेतले पाहिजे. समीक्षेच्या क्षेत्रात या कालखंडात "कलेकरिता कला" ता विचाराने वा वादाने जेवढा प्रभाव गाजविला जेवढा कोणत्याहि दुसऱ्या विचाराने कोणत्याहि कालखंडांत क्वचितच गाजविला असेल. या वादाचे प्रवर्तक न. चिं. केळकरांना मानावयाचे ते केवळ ऐतिहासिक दृष्टीने. सविस्तर मांडणी हिरीरीने पुरस्कार प्रत्यक्ष वाङ्मयीन आचार या सर्वदृष्टीनी या वादाचे प्रवर्तकत्व प्रा. ना. सी फडके यांच्याकडेच जाते. फडक्यांच्या ललितवाङ्मयापासून या त्यांच्या वाङ्मयतत्वविवेचनाला वेगळे काढून, शुद्ध दृष्टीने त्याकडे पाहिल्यास कलेची संपूर्णता व स्वयंपूर्णता तिची सत्ता व अस्मिता या गोष्टींच्याकडे या वादानेच प्रथम लक्ष वेधले व त्यांवर केंद्रीत केले हे मान्य करायला अडचण वाटणार नाही. वाङ्मयकलेचा इतर ललितकलांशी घनिष्ठ संबंध आहे किंबहुना या सर्व ललितकलांची प्रेरणा व प्रयोजन एकच आहेत हा विचारही या वादाच्या निमित्तानेच अधिक पुढे आला व ठसला. या वादात, विशेषतः प्रा फडक्यांनी केलेल्या त्याच्या मांडणीत कांही उणीवा होत्या. त्यामुळे आणि समाजात प्रचलित होत असलेल्या जीवनविषयक काही विचारसरणींच्या मुळे, या वादाला विरोधी म्हणून "जीवनाकरिता कला" अशा घोष वाक्याने ओळखली जाणारी एक विचारसरणी समीक्षेच्या क्षेत्रात पुढे आली. "जीवनाकरिता कला" याचे अनेकाचे अनेक अर्थ आहेत. त्यांचा येथे विचार करता येणार नाही. पण कला ही जीवनासाठी आहे, तिने जीवनाचा विचार केला पाहिजे अशा विचारसरणीतून केलेले अर्थातच वाङ्मयाने ही विशिष्ट प्रकारच्या जीवनाचा वा जीवन दृष्टीचा प्रचार व पुरस्कार केला पाहिजे. असा दृष्टिकोन पुढे आला व शिष्टमान्य झाला. वाङ्मयाच्या श्रेष्ठतेची ती एक कसोटी मानण्यात येऊ लागली. याचा परिणाम प्रत्यक्ष वाङ्मयनिर्मितीवरहि होऊ लागला विशिष्ट जीवनदृष्टीचा प्रचार करणारे ललितवाङ्मय निर्माण झाले व काही समीक्षकांकडून ते श्रेष्ठहि ठरविले जाऊ लागले. याचा प्रतिकार एकीकडे प्रत्यक्षपणे प्रा. फडके प्रभृति कलावादी टीकाकार करीत असतानाच समीक्षेच्या क्षेत्रात एका नव्या तत्वाचा, नव्या दृष्टीचा तात्विक भूमिकेवरून प्रवेश झाला.

कलावादातील तत्वाहून हे तत्व सर्वस्वी निराळे होते असे मात्र नव्हे. "सौंदर्य" हे ते तत्व होय. "वाङ्मयीन महात्मता" या ग्रंथात बा. सी. मर्ढेकर यांनी आधुनिक पद्धतीने व नवी परिभाषा वापरून या सौंदर्यतत्वाचा उच्चार व पुरस्कार केला. वाङ्मयात कल्पनात्मक प्रतिक्रियेला महत्व आहे. वाङ्मयाच्या क्षेत्रातील संघटनांचे स्वरूप तर्कनिष्ठ नसून सौंदर्यनिष्ठ आहे. येथे इंद्रियसंवेदनांना व लयतत्वाला महत्व आहे, वाङ्मयीन महात्मता ही लेखनपूर्व व लेखनगर्भ आत्मनिष्ठेवर अवलंबून आहे इ. विचार त्यांनी मांडले. यातून सौंदर्यवादी समीक्षेचा उदय झाला. आणि कलेकरिता कला व जीवनाकरिता कला या दोन वादांच्या संघर्षातून जे विचार व जी तत्वे बाहेर पडली त्यातून उदयाला आलेल्या नीतिकल्पनानुसारी, मानसशास्त्रानुसारी समाजशास्त्रनिष्ठ अशा भिन्न भिन्न समीक्षापद्धती कांहीशा मागे पडून सौंदर्यवादी समीक्षा पद्धती पुढे आली.

या सर्व विचारमंथनातून व विचारसंघर्षातून भिन्न भिन्न समीक्षा पद्धती जशा पुढे आल्या व मागे पडत गेल्या तशाच समीक्षाविषयक दृष्टी व भूमिका ही बदलत गेल्या. परीक्षकाची व गुणदोष विवेचकाची भूमिका, मूल्यमापकाची भूमिका, उपदेशकाची, मार्गदर्शकाची भूमिका अशा भूमिकांतून जाता जाता आस्वादकाच्या भूमिकेवर समीक्षक आला व कलाकृतीच्या सौंदर्याचे रहस्य शोधू लागला. टीका हा एक अखंड अंत शोध आहे ही भूमिका व ही दृष्टी यातूनच पुढे उदयाला आली या भूमिकांतील बदलाला अनुसरूनच टीकावाङ्मयाचे स्वरूपहि अंतर्बाह्य बदलत गेले व या काळखंडाच्या अखेरीला, अंधुक व पुसट का होईना, त्याला स्वतंत्र वाङ्मयप्रकाराचे स्वरूप येऊ लागले.

समीक्षेचे खरे कार्य काय ? याचा शोध व निर्णय अद्यापहि लागलेला नाही. एका मर्यादेपलीकडे तो लागणे शक्यही नाही. पण म्हणूनच समीक्षेची वाटचाल अखंड चालू राहिली आहे व राहणार आहे.

मराठी समीक्षेचा विकास : १९४५ नंतरची समीक्षा

– डॉ. द. भि. कुळकर्णी

१९४३ ते ४७ या कालावधीत मराठी साहित्यात अत्यंत महत्वाचे परिवर्तन घडून आले. या परिवर्तनाचा उल्लेख आपण "नवसाहित्याचा उदय" या शब्दात करीत असतो.

नवसाहित्याचा हा उदय योगायोगाने किंवा एक टूम म्हणून झाला नाही. एका मूलगामी साहित्यशास्त्रीय दृष्टीमुळे हे साहित्यपरिवर्तन घडून आले.

या परिवर्तनाचे मुख्य श्रेय अर्थातच मर्ढेकरांच्या कलामीमांसेला आहे. 'आर्टस अँड मॅन,' 'वाङ्मयीन महात्मता', "सौंदर्य आणि साहित्य" इत्यादी ग्रंथातून मर्ढेकरांचा हा कलाविचार अभिव्यक्त झाला. मर्ढेकरांनी आपल्या समीक्षालेखनातून फडके, माधव ज्यूलियन, यशवंत, काणेकर इत्यादी लोकप्रिय मराठी साहित्यिकांच्या वाङ्मयीन थोरवीबद्दल संदेह व्यक्त केला आणि रूढ वाङ्मयीन अभिरुचीला एक जोरकस धक्का दिला. हा धक्का वाङ्मयक्षेत्राला उपकारकच ठरला. या धक्क्याने मराठी वाचक आणि मराठी समीक्षक खडबडून जागा झाला. आपल्या हातातील वाङ्मयीन मानदंडच तो तपासून पाहू लागला. आपली वाङ्मयीन अभिरूची कितपत वस्तुनिष्ठ आणि भरवशाची आहे याची तो चर्चा करू लागला.

या जागृतीमुळे नव्या वाङ्मयीन प्रवृत्तीच्या स्वागताला अनुकूल वातावरण निर्माण झाले. समीक्षा ही ललित साहित्यानुगामी असते असे म्हटले जाते ते खरे आहे. परंतु हा संक्रमणकाळ त्याला अपवाद ठरला. या संक्रमणकाळाच्या प्रारंभी समीक्षा साहित्यानुवर्ती झाली नाही तर ललित साहित्यच समीक्षानुगामी झाले. या काळातील समीक्षेने ललित साहित्याची वाट तयार केली. ललित साहित्याचे संगोपन आणि संवर्धन केले.

अनुक्रमणिका

अशा वाङ्मयीन संक्रमणकाळात कलावंत आणि समीक्षक यांच्या भूमिका एकमेकांच्या अतिशय निकट येतात. मर्ढेकर हे केवळ समीक्षकच नव्हते, ते सृजनशील कलावंतही होते. म्हणूनच त्यांचे समीक्षालेखन हे एका कलावंताचे आत्मचिंतन होते. त्यांचे ललितलेखन हे एका समीक्षकाचे सृजन.

हीच गोष्ट कमीअधिक प्रमाणात गाडगीळ, रेगे, चित्रे, करंदीकर, मुक्तिबोध, कानेटकर यांच्याबद्दलही खरी आहे.

कानेटकरांनी आजकाल समीक्षालेखन सोडले आहे. परंतु एकेकाळी त्यांनी महत्वाच्या वाङ्मयीन नियत-कालिकांतून चोखंदळ समीक्षा लिहिली आहे, आणि ती नव्या वाङ्मयीन अभिरुचीला पोषक अशी लिहिली आहे. विशेषत: त्यांचे "केशवसुत" आणि "नवकाव्य" या दोन विषयांवरील लेख आजही स्वतंत्रपणे संग्राह्य वाटावेत या तोलाचे आहेत. या प्रारंभीच्या काळातील त्यांचे ललित साहित्यही नव्या वाङ्मयीन अभिरुचीशी सुसंगत असेच होते.

मुक्तिबोधांचे समीक्षालेखन 'कांही निबंध' या लेखन-संग्रहात समाविष्ट झाले आहे. मर्ढेकरी कलाविचारांचे खंडन आणि साम्यवादी कलाविचारांचे मंडन असे मुक्तिबोधी समीक्षेचे दुहेरी प्रयोजन आहे. प्रयोजनाचा आवाका असा संमिश्र असल्यामुळे की काय मुक्ति-बोधांच्या लेखनातून मर्ढेकरी विचारांचे खंडनही यथास्थित होत नाही आणि साम्यवादी कलामीमांसाही समग्रपणे अवगत नाही. याचा परिणाम असा होतो की मूळ प्रतिज्ञेच्या मानाने मुक्तिबोधांची समीक्षा त्रोटक आणि स्वत:वर आणि इतरांवर अन्याय करणारी उतरते 'नवी मळवाट' च्या दोन प्रस्तावनाही याला अपवाद नाहीत.

त्या मानाने करंदीकरांची समीक्षा अधिक सुसूत्र आणि वस्तुनिष्ठ आहे. करंदीकरांच्या 'परंपरा आणि नवता' या लेखसंग्रहातील 'मर्ढेकरी समीक्षेची मूलतत्वे' हा लेख तर मराठी समीक्षा वाङ्मयात ऐतिहासिक मोलाचा आहे. मर्ढेकरांचा समग्र कलाविचार इतक्या वस्तुनिष्ठपणे त्यापूर्वी कोणीच विशद केला नव्हता.

परंतु करंदीकरांच्या समीक्षालेखनालाहि एक मोठी मर्यादा आहे. आणि ती म्हणजे आत्मप्रत्ययाचा अभाव. केशवसुत-मर्ढेकर इत्यादी कवींवर करंदीकरांनी समीक्षा-लेख लिहिले आहेत. परंतु आत्मप्रत्ययाच्या अभावामुळे हे त्यांचे लेखन काव्यावरील न होता पद्यावरील झाले आहे.

चित्रे याच्या समीक्षेतही हीच उणीव जाणवते. शिवाय पढिकपणा आणि समकालीन कवींविषयी चुग्मभावना ही वाङ्मयीन आणि वाङ्मय बाह्य वैगुण्येही त्यांच्या समीक्षेला दूषितच करतात.

मर्ढेकरी कलाविचाराला नवी परिभाषा देण्याचा त्यांचा प्रयत्न आणि त्यांची काव्यनिर्मिती आणि त्यांचा समीक्षाविचार यांच्यातील सुसंवाद हे त्यांच्या समीक्षा-लेखनाचे खरे विशेष होत.

'छांदसी' मधील रेग्यांचे समीक्षालेखन वरवर त्रोटक आणि विस्कळित वाटले तरी एका निश्चित वाङमयीन भूमिकेतून जन्माला आलेले, खंडनमंडनापासून बहुधा अलिप्त आणि चिंतनशील उतरले आहे. त्यांची समीक्षा आणि त्यांची कविता या दोहोतील अमूलाग्र सुसंगतीही वेधक आहे.

अर्थात मर्ढेकरांच्या खालोखाल या सृजनशील समीक्षवर्गात कोणाला स्थान द्यायचे असेल तर ते गंगाधर गाडगीळ यांनाच. गाडगीळांनी नाही म्हटले तरी मर्ढेकरी कलाविचारच आत्मसात केलेला आहे. मधून-मधून मर्ढेकरांशी मतभेद नोंदवीत मर्ढेकरच स्वीकारला आहे. बहुधा असे घडते की आजची मराठी समीक्षा घाट, लय, आत्मनिष्ठा, महात्मता इत्यादी मर्ढेकरी परिभाषा खुशाल वापरते, पण त्या परिभाषेतील मर्ढेकरी विचारव्यूह मात्र दुर्लक्षिते. गाडगीळ यांची समीक्षा नेमकी याच्या उलट वर्तन करते. ती मर्ढेकरांची परिभाषा सहसा घेत नाही, पण मर्ढेकरांचा विचारव्यूह निश्चयाने स्वीकारते. अर्थात असे करताना गाडगीळांची समीक्षा मर्ढेकरांचे अनुकरण करीत नसते, ती मर्ढेकरांच्या कलाविचारांचे उपयोजन करीत असते. अशी उपयोजना-साठी वैचारिक शिस्तीबरोबरच तरल रसिकतेची गरज असते गाडगीळांची वैचारिक शिस्त क्वचित कमी पडते, पण किर्लोस्कर, हरिभाऊ. बालकवी, रेगे, इंदिरा इत्यादी साहित्यिकांच्या साहित्यवृत्तीचे रसग्रहण करताना त्यांनी जी रसिकता प्रगट केली आहे ती मराठी समीक्षेत अपवादभूत आहे.

मर्ढेकरांप्रमाणेच गाडगीळांच्या समीक्षेनेहि रूढ वाङमयीन अभिरूचीच्या मर्यादा स्पष्ट करून नव्या आणि सकस वाङमयीन अभिरूचीचा सक्रिय उच्चार केला आहे. हे कार्य करतांना प्रसंगी त्यांच्या लेखनात

काही दोष आले आहेत. पण ज्या वाङ्मयीन परिस्थितीत ही समीक्षा निर्माण झाली ती परिस्थिती लक्षात घेता हे दोष क्षम्य मानले पाहिजेत.

थोडी अतिशयोक्ति करून असेही म्हणता येईल की गाडगीळांच्या या भावोत्कट अविष्काराचा लाभ मिळाल्यामुळे व त्याच परंपरेत पण अधिक अंतर्मुख आणि सूक्ष्म समीक्षा लिहिणे माधव आचवल यांना आज सुलभ झाले आहे.

पंचेचाळीस नंतरच्या मराठी समीक्षेवर मर्ढेकरांच्या विचाराचा इतका परिणाम झाला आहे, की या काळातील समीक्षेला 'मर्ढेकरी युगातील समीक्षा' असे म्हटले तर ते अगदी रास्त ठरेल. अर्थात हा परिणाम नेहमीच अनुकूल आणि योग्य दिशेने झाला असेल असे नाही. दोन तीन वर्षांपूर्वी 'मराठी टीका' या ग्रंथात वसंत दावतर यांनी या संदर्भात अत्यंत गंभीर आक्षेप घेतले आहेत. आजच्या मराठी समीक्षेचा बारकाईने अभ्यास करून दावतरांनी असा निष्कर्ष काढला आहे की, मर्ढेकरांच्या प्रभावाने स्फुरण पावलेल्या टीकेने मर्ढेकरांचे मूळ विचार पचविण्याचा प्रामाणिक प्रयत्नच केलेला दिसत नाही.

दावतरांचे हे निरीक्षण कितपत खरे आहे ? मर्ढेकरांचा कलाविचार समग्र स्वरूपात अजून मराठी समीक्षेला पचलेला नाही हे खरे. परंतु एवढ्यावरून आजची मराठी समीक्षा अप्रामाणिक आहे असे म्हणता येणार नाही. उल्ट पाध्ये, गाडगीळ, बापलिंगे, मुक्तिबोध, कुरुंदकर, कविमंडन, करंदीकर, मे. पु. रेगे, आचवल चित्रे, प्रभाकर पुजारी, इत्यादी अभ्यासक आपल्या परीने मर्ढेकरी कलाविचार समजून घेण्याचा, त्याचे उपयोजन करण्याचा, त्याचे खंडन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत असे दिसेल. या प्रयत्नात त्यांना जर हवे तेवढे यश मिळाले नसेल तर त्याचे कारण ५५ ते ६५ हा अल्प कालावधी आणि मर्ढेकरी कलाविचाराची सूक्ष्मता आणि सर्वंकषता हेच असले पाहिजेत.

मर्ढेकरांची समीक्षा ही सौन्दर्यनिष्ठ समीक्षा होती. त्या समीक्षेने साहित्यवृत्तीतील सामाजिक आशयाचा परामर्श घेतला. पण 'सामाजिक आशय' हे मूल्य म्हणून या समीक्षेने मान्य केले नाही. सामाजिक आशय हा कलावृत्तीचा, भावानुभूतीचा केवळ एक घटक असतो, असे या समीक्षेने मानले. म्हणून व्यक्तितत्वाचा अविष्कार, मानवता, जीवनदर्शन इत्यादी घटकांना या सौन्दर्यनिष्ठ समीक्षेने वाङ्मयीन मूल्याचे स्थान दिले आहे. या समीक्षेच्या मते 'सौन्दर्य' हे वाङ्मयाचे अंतिम मूल्य आहे. एखाद्या शब्दवृत्तीत व्यक्तितत्वाचा अविष्कार, मानवता, जीवनदर्शन इत्यादी घटक कितीहि असोत, तिच्यात जर सौन्दर्यतत्वाचा अविष्कार नसेल, समग्र भावानुभूतीला लयबद्ध घाट मिळाला नसेल तर ती शब्दकृती ही वाङ्मयकृती होणार नाही.

मर्ढेकरांच्या या भूमिकेला विरोध करणारे दोन मातब्बर समीक्षक आढळतात. ते म्हणजे कुसुमावती देशपांडे आणि दि. के. बेडेकर. अभिनव गुप्ताच्या परिभाषेत बोलावयाचे तर मर्ढेकर-गाडगीळ हे अलौलिक वादी समीक्षक असून देशपांडे-बेडेकर हे लौकिकवादी समीक्षक आहेत. देशपांडे आणि बेडेकर या उभय समीक्षकांजवळ सूक्ष्म चिकित्साबुद्धि, अभिजात रसिकता आणि सुसंस्कृत सौजन्य, हे गुण फार मोठ्या प्रमाणात आढळतात. साहित्यकृती ही नवनिर्मिती असते, पण ती निर्मिती समाजापेक्षा आणि समाजहितपोषक असते, असावी, असा या उभयतांचा दावा आहे. मूल्यदृष्ट्या देखील कला आणि सौन्दर्याची स्वायत्तता या समीक्षकाना मान्य नाही. म्हणूनच 'पासंग' मध्ये बाईंनी लिहिले, 'बहुजन समाजाच्या मार्गदर्शनासाठी, नियमासाठी व विकासासाठी नवभारतातील सर्व कलांचा उपयोग केला पाहिजे' आणि 'साहित्य विचार' या ग्रंथात बेडेकरांनी म्हटले, 'साहित्याने जर आजच्या' 'मानवी प्रत्यक्षाला प्रामाणिक व उत्कृष्ट तऱ्हेने चित्रित केले... तर मग अशा साहित्यातून आमचे मनोरंजनहि होईल व आमच्या जगण्याण्यातला अर्थहि पाहणे आम्हाला थोडे सोपे जाईल.'

देशपांडे-बेडेकर यांच्या या दोन अवतरणांतून कितीतरी वाङ्मयीन प्रश्न उपस्थित होतात. बहुजन समाजाचे मार्गदर्शन, नियमन आणि विकास म्हणजे नेमके काय आणि ललित साहित्य ते कार्य नेमके कसे काय करू शकते ? जगण्यातला अर्थ साहित्याने दाखवावयाचा म्हणजे नेमके काय करायचे ? आणि मुख्य म्हणजे या घटकांना मूल्यांचे स्वरूप कसे प्राप्त होते ? या मूल्यांच्या आधारे विविध साहित्यकृतींची प्रतवारी कशी लावता येते ?

थोडक्यात, ही समाजनिष्ठ समीक्षा साहित्यातील भावानुभूती आणि समग्र साहित्यकृती, साहित्याचे साधन आणि साहित्याचे माध्यम, दैनंदिन व्यवहारातील अनुभवाची जात आणि कलास्वादाच्या अनुभवाची जात, यात विलक्षण गल्लत करीत आहे, असे दिसते. निदान देशपांडे-बेडेकर यांच्या उपलब्ध लेखनातून तरी या शंकाचे निरसन होत नाही.

आजच्या मराठी समीक्षेत अलौकिकवादी विचारसरणीचे जितके सम्यक दर्शन घडते तितके या लौकिकवादी विचारसरणीचे घडत नाही. आपली समाजनिष्ठ लौकिकवादी समीक्षा बेडेकरांसारख्या विचारवंताने अधिक साकल्याने मांडल्यास ते मराठी साहित्याच्या हिताचे ठरणार आहे.

वा. ल. कुळकर्णी यांच्यासारखे समीक्षक लौकिकवाद आणि अलौकिकवाद आणि अलौकिकवाद यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करतात. पण अजून तरी त्यांचा हा प्रयत्न यशस्वी झाल्याचे दिसत नाही. उलट अशा प्रयत्नामुळे त्यांची वैचारिक बैठक मात्र शिथिल होते. 'अनन्यसाधारण चैतन्य', 'गूढ' 'शोध', इत्यादी शब्द सातत्याने वापरून एकाच वेळी कलाकृतीची स्वायत्तता आणि तिची जीवनसापेक्षता सुत्रविण्याचा वा. ल. सतत प्रयत्न करीत असतात. परंतु या शब्दांचे निश्चित आणि पारिभाषिक अर्थ ते कुठेही स्पष्ट करीत नाहीत. त्यामुळे त्यांची समीक्षा कधी शब्दवेल्हाळ, कधी गूड-गूंजनपर आणि बहुधा तडजोडवादी होते. विशेष वाङ्मय वृत्तांची परीक्षणे यात नेहमीच महदंतर पडते. 'मुक्तमाला' पासून 'डोह' पर्यंत अनेक वाङ्मयवृत्तींची परीक्षणे वा. ल. यांनी केली आहेत. परंतु यापैकी कुठल्याही कलाकृतीचे 'अनन्यसाधारणत्व', तिच्यातील 'चैतन्य' निचे 'गूढ' याचा 'शोध 'त्यांनी घेतल्याचे दिसत नहीं.

पढिकपणाचा अभाव उत्स्फूर्तता, सुबोधता, नव्याच्या स्वागताची तयारी आणि वृत्तीचा सौम्यपणा हे गुण मात्र त्यांच्या सर्वच टीकालेखनात दृग्गोचर होतात.

सौन्दर्यनिष्ठ समीक्षा, समाजनिष्ठ समीक्षा आणि समन्वयवादी समीक्षा असे तीन प्रवाह मर्ढेकर, बेडेकर, कुळकर्णी, यांच्या रूपाने या मर्ढेकर युगात पाहावयास मिळतात. यापैकी कोणता प्रवाह कसा विकसित होतो यावर मराठी समीक्षेचे भावी स्वरूप अवलंबून आहे.

श्री पु. बा. काळे

नागपुरातील प्रख्यात यंत्रज्ञ, लिपीसुधारक आणि दानशूर गृहस्थ श्री. पु. बा. काळे ह्यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. वि. सा. संघाशी त्यांचे फार जिव्हाळ्याचे संबंध होते. वि. सा. संघाच्या वास्तूला आज जो आकार दिसतो आहे ह्याचे श्रेय काही प्रमाणांत त्यांचे आहे. त्यांनी दिलेल्या उदार-देणगीमुळे वि. सा. संघाच्या शिवाजीग्रंथालयाची उभारणी होऊ शकली. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात वि. सा. संघ सहभागी आहे.

हिब्रू भाषेचे पुनरुज्जीवन

प्रभाकर ऊर्ध्वरेषे
इंग्रजी विभाग, नागपूर विद्यापीठ.

**लक्षावधी बहुभाषिक ज्यू लोकांना
एक भाषेच्या सूत्राने एकसंध
बनविणाऱ्या अर्वाचीन हिब्रू
भाषेच्या विकासाचा अभिनव प्रयोग**

हिब्रू भाषेचे पुनरुज्जीवन

उच्च शिक्षणाच्या माध्यमाच्या निमित्ताने एक महान् वाद (ग्रेट डिबेट) सुरू आहे.

केंद्र सरकारने प्रादेशिक भाषांमधून निरनिराळ्या विषयांची पुस्तके प्रकाशित करण्यासाठी १८ कोटींची रकम मंजूर केली असली तरी हे होणे केवळ अशक्यप्राय आहे असे अनेकांना वाटते व म्हणून इंग्रजी भाषाच उच्च शिक्षणाचे माध्यम राहावे असा त्यांचा आग्रह आहे. शिवाय इंग्रजी गेले की राष्ट्रीय ऐक्याला तडे जातील व हा खंडप्राय देश अनेक खंडात विभागला जाईल अशीही कित्येकांना भीती वाटते.

या वादाच्या पार्श्वभूमीवर अनेक देशातील परिस्थितीचा व तेथील भाषाविषयक प्रश्नांच्या सोडवणुकीच्या प्रयोगांचा उल्लेख केला जातो. सोविएत युनियनमधील आशियाई प्रजासत्ताक राज्यांच्या अत्यंत मागासलेल्या व काही तर लिपीसुद्धा नसलेल्या भाषा अवघ्या २५–३० वर्षात समृद्ध होऊन राज्यकारभार व सर्व शिक्षणाचे माध्यम म्हणून वापरल्या जाऊ लागल्या हा एक प्रयोग. चीनच्या खऱ्या विकासाला अवघ्या वीस वर्षांपूर्वीच सुरुवात झाली असता त्यांनी आपल्या भाषेतूनच विज्ञान व तंत्राची वाढ केली व भाषाही समृद्ध केली हा आणखी एक प्रयोग.

यापेक्षाही आपल्या प्रश्नाच्या संदर्भात अधिक महत्त्वाचा असा एक भाषाविषयक प्रयोग आधुनिक काळात झाला आहे. तो म्हणजे इस्राएल मधील हिब्रू भाषेच्या पुनरुज्जीवनाचा. सोविएत युनियन व चीन या दोन्ही राष्ट्रांच्या राजकारणाविषयी कोणाची काही मते असली तरी त्या देशांच्या भाषाविषयक प्रश्नांच्या अभ्यासाला ती आड येण्याचे जसे कारण नाही, तसेच इस्राएल संबंधीची राजकीय मते किंवा अरब–इस्राएल संघर्षामुळे बनलेले उलटसुलट पूर्वग्रह आड येऊ न देता इस्रायल मधील हिब्रू भाषेच्या पुनरुज्जीवनाची माहिती घेणे उद्‌बोधक ठरले.

दोन हजार वर्षांनंतर मिळालेले संजीवन

हिब्रू भाषा साडेतीन हजार वर्षांहून अधिक प्राचीन आहे. केनन (पॅलेस्टाइनचे प्राचीन नाव) या प्रदेशातले रहिवासी ही भाषा बोलत असत. इस्राएली लोकांनी हा प्रदेश जिंकल्यावर त्यांनी ही भाषा आत्मसात् केली. पुढे याच भाषेत बायबल (ओल्ड टेस्टॅमेंट – जुना करार) लिहिले गेले.

जवळजवळ दीड हजार वर्षेपर्यंत ही हिब्रू भाषा ज्यू (इस्राएली) लोकांच्या रोजच्या व्यवहाराची भाषा होती व तिच्यात कालमान व परिस्थितीला अनुसरून काही बदलही होत होते. येशू ख्रिस्त हा स्वतः ज्यूच होता व त्याची तीच भाषा होती. परंतु ख्रिस्तानंतर दोन शतकात ज्यू लोकांची पांगापांग झाली व हिब्रू भाषेचे अस्तित्वही संपुष्टात आले. खुद्द पॅलेस्टाइनमधील काही ज्यू लोक ॲरामेक किंवा ग्रीक भाषा वापरू लागले. मध्ययुगात इस्लामी संस्कृतीच्या वर्चस्वाखालील प्रदेशात राहणारे ज्यु अरबी भाषा बोलू लागले. यूरपमध्ये स्थायिक

झालेल्या ज्यू लोकांनी मध्ययुगीन जर्मन व स्पॅनिश भाषेवर आधारित अशा यिडिश व लाडिनो या दोन आगल्या भाषा बनवल्या.

कालांतराने जगाच्या निरनिराळ्या प्रदेशात विखुरलेले ज्यू लोक स्थानिक भाषा बोलू व लिहू लागले, परंतु आपल्या धर्माची व धर्मग्रंथाची भाषा म्हणून हिब्रू भाषेवर त्यांची श्रद्धा कायम होती. भिन्न देशातील ज्यू लोक एकमेकांना भेटले तर हिब्रूचा उपयोग करून परस्परांच्या विचारांची देवघेव करीत व काही लोक हिब्रू भाषेत लेखनही करीत. अठराव्या—एकोणिसाव्या शतकात यूरपमधील ज्यू लोकांमध्ये नवजागृतीची चळवळ वाढू लागली तेव्हा बायबलच्या प्राचीन हिब्रू भाषेचे पुनरुज्जीवन करून त्या भाषेचे साहित्यनिर्मितीचे प्रयत्न होऊ लागले. १८५६ साली 'हा-माग्गीद' हे हिब्रू साप्ताहिक प्रकाशित होऊ लागले.

या दरम्यानच्या सुमारे दोन हजार वर्षांच्या कालखंडात ज्यू संस्कृतीच्या-अभिमानी लेखकांनी व विद्वानांनी हिब्रू भाषेत ग्रंथरचना करण्याचा उपक्रम सुरू ठेवला होता व त्या ग्रंथांच्या द्वारे सर्व जगभर पसरलेल्या ज्यू लोकांमध्ये ऐक्याची भावना जागृत ठेवली होती. परंतु ज्ञान—विज्ञानाच्या रुंदावणाऱ्या कक्षांच्या मानाने हिब्रू भाषेतील ही ग्रंथरचना फार अपुरी होती व कोणत्याच देशात व प्रदेशात दैनंदिन व्यवहारासाठी त्या भाषेचा वापर होत नसल्यामुळे तिची फारशी वाढ होणे दिवसेंदिवस कठीण आहे हे त्या भाषेच्या कट्टर अभिमान्यांनाही मान्य करणे भाग होते. निरनिराळ्या देशातले ज्यू लोक त्या देशाची भाषा वापरीत व स्वतःला त्या देशाचे नागरिक मानीत, त्यामुळे ज्यूंचा निराळा देश व निराळी भाषा हा विचारच नव्हता. पण एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झारशाहीच्या रशियात ज्यू-विरोधी भावना पेटवून दंगली सुरू झाल्या त्यामुळे ज्यू राष्ट्रवादाचा उदय झाला व पॅलेस्टाइनमध्ये पुन: ज्यू राष्ट्र प्रस्थापित झाले पाहिजे अशी मागणी आग्रहाने पुढे मांडणारी झायोनिस्ट (Zionist) चळवळ फोफवू लागली. या चळवळीचा एक अंगभूत व अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणून हिब्रू भाषा व साहित्याच्या पुनरुज्जीवनाचे प्रयत्न सुरू झाले. केवळ २५—३० वर्षांच्या अल्प काळात या चळवळीने मूळ धरले व हिब्रू भाषेत अनेक लेखक व कवी उदयाला आले. हिब्रू भाषेत वृत्तपत्रे व मासिके प्रसिद्ध होऊ लागली. अमेरिकेत या चळवळीला फार मोठे प्रोत्साहन मिळाले व तेथे हिब्रू भाषेचा व साहित्याचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला.

मेंडिल मोकेर सेफोरिम या विद्वान लेखकाने बायबलची हिब्रू भाषा व मध्ययुगी रब्बाई (ज्यू लोकांमधील विद्वान, ग्रंथकार व धर्मगुरु) लोकांची हिब्रू यांचा समन्वय साधून हिब्रू भाषेला अर्वाचीन वळण दिले व आधुनिक काळातील गरजा पूर्ण करण्याला समर्थ अशी ती भाषा बनविण्याच्या प्रक्रियेला गती दिली. हीच अर्वाचीन हिब्रू भाषा पुढे इस्राएल या राष्ट्राच्या निर्मितीनंतर तेथील राजभाषा व लोकभाषा बनल व आज त्या राष्ट्राची तीच मुख्य भाषा आहे

हिब्रू माध्यमाचा लढा

ज्यू राष्ट्रवाद व हिब्रू भाषेच्या या पुनरुज्जीवनाच्या काळातच एलिझर बेन—येहुदा याने पॅलेस्टाइनमध्ये नव्या ज्यू राज्याच्या स्थापनेसाठी प्रचाराची मोहीम सुरू केली व १८८० मध्ये तो स्वत: पॅलेस्टाइनमध्ये येऊन दाखल झाला. त्याची घोषणा होती की ज्यू लोकांचे स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र असले पाहिजे व हिब्रू हीच राष्ट्रभाषा असली पाहिजे. हे स्वप्न साकार करण्यासाठी बेन-येहुदाने पॅलेस्टाइनमध्ये स्थायिक असलेल्या काही धर्मबांधवांच्या सहकार्याने हिब्रू भाषा हे शिक्षणाचे माध्यम झाले पाहिजे असे प्रयत्न सुरू केले. एक समग्र पिढी हिब्रू भाषेतून शिकून तयार झाली म्हणजे मगच सर्व ज्यूचे जीवन हिब्रू-मय होईल हे त्याने ओळखले व त्या दिशेने त्याने पावले टाकल्याला सुरुवात केली. प्रारंभी प्राथमिक शाळांमधून व लवकरच हायस्कूलांमधून हिब्रू माध्यम सुरू झाले व पहिल्या महायुद्धाच्या प्रारंभीच्या काळापर्यंत हा प्रयोग संपूर्णपणे यशस्वी ठरला.

जर्मन-ज्यू लोकांच्या 'हिल्फस्वेरेन' या संस्थेच्या अनेक शाळातूनही हिब्रू भाषेच्या माध्यमातूनच शिक्षण दिले जात होते. १९१३ साली या संस्थेने एक तांत्रिक शिक्षणाची संस्था सुरू केली त्या संस्थेत मात्र हिब्रू ऐवजी जर्मन भाषेचे माध्यम वापरण्याचे ठरले. तांत्रिक शिक्षणाच्या दृष्टीने आवश्यक तितका हिब्रू भाषेचा विकास झालेला नव्हता हे या निर्णयाचे कारण होते.

परंतु या निर्णयाचा परिणाम विलक्षण झाला. हजारो विद्यार्थी व शिक्षक या निर्णयाचा प्रतिकार करण्यासाठी शाळा सोडून रस्त्यावर आले व त्यांनी इमारतीच्या बाहेर उघड्यावर वर्ग घेण्याचा उपक्रम सुरू केला.

अनुक्रमणिका

आम्ही हिब्रू भाषेशिवाय इतर कोणत्याही भाषेतून शिक्षण घेणार नाही अशी त्यांची घोषणा होती. हा भाषिक लढा यशस्वी झाला व तांत्रिक शिक्षणासाठी सुद्धा हिब्रू भाषेचे माध्यम सुरू झाले.

१९१६–१८ या काळापर्यंत हिब्रू भाषेने त्या प्रदेशातील ज्यू लोकांमध्ये चांगलेच मूळ धरले. जेरुसलेम सोडून पॅलेस्टाइनच्या इतर भागात ४० टक्के ज्यू लोक हिब्रू भाषा–भाषी झाले. लहान मुलांमध्ये हे प्रमाण ५४ टक्के होते. तेल–अविव व समोवतालच्या प्रदेशात तर हे प्रमाण ७७ टक्क्यांपर्यंत वाढले.

पहिल्या महायुद्धानंतर १९२१ पासून पॅलेस्टाइनमध्ये आंतरराष्ट्रीय नियंत्रणाखालील नवी राजवट आली व इंग्रजी व अरबी भाषांच्या जोडीला हिब्रू भाषेलाही राज्यभाषा म्हणून मान्यता मिळाली. ज्यूंच्या स्वायत्त संस्थांमध्ये व त्यांच्या शिक्षणसंस्थात हिब्रू भाषेचा सार्वत्रिक वापर सुरू झाला अनेक हिब्रू वृत्तपत्रे व नियतकालिके सुरू झाली. १९२५ मध्ये हिब्रू विद्यापीठ स्थापन झाले. परदेशातून येणाऱ्या ज्यूंची संख्या या काळात सारखी वाढत होती व त्यांना त्यांच्या भाषा सोडून हिब्रू भाषा स्वीकारण्याला भाग पाडणे हा एक सतत चालू राहणारा लढा होता. 'हिब्रू-भाषा संरक्षण संग्राम समिती' नावाच्या संस्थेने प्रचंड मोहीम उभारून विशेषत: लहान मुलांच्या मार्फत हा लढा घरोघर पोचवला. शाळेतच नव्हे तर घरी सुद्धा आम्ही हिब्रूच बोलणार, हिब्रूखेरीज इतर भाषा वापरणार नाही, अशी प्रतिज्ञा घेऊन मुले घरी गेली की आईवापांचा नाइलाज होई व त्यामुळे त्यांना हिब्रू शिकणे भाग पडे.

इस्त्राएलच्या स्थापनेनंतरची प्रगती

या मोहिमेचा अपेक्षित परिणाम झाला व १९४८ च्या मे महिन्यात इस्त्राएल राज्याची स्थापना झाली त्यानंतर लगेच जी पाहणी करण्यात आली तीत असे आढळून आले की एकूण लोकसंख्येपैकी शे. ८० लोकांना हिब्रू भाषा अवगत होती व शे. ५४ लोक दैनंदिन व्यवहारात हिब्रू भाषेचाच वापर करू लागले होते.

इस्त्राएलच्या स्थापनेनंतर हिब्रू हीच त्या राज्याची एकमेव राज्यभाषा झाली व अरबी भाषेचा उपयोग अल्पसंख्य अरबांपुरताच मर्यादित झाला. जगातल्या सर्व देशातून शेकडो ज्यू कुटुंबे इस्त्राएलमध्ये येण्याचा क्रम सुरु होता, पण त्या सर्वांना हिब्रू भाषा शिकावी लागत होती. लहान मुलांना अर्थात्च हे कठीण गेले नाही, पण मोठी माणसेही अल्पावधीतच हिब्रू भाषा शिकून घेत असा अनुभव आला व पुढे हा प्रश्न पूर्णपणे सुटला. आज हिब्रू भाषा येणे व तिचाच सार्वत्रिक वापर होणे ही गोष्ट इस्त्राएलमध्ये अत्यंत स्वाभाविक झाली आहे.

इस्त्राएलमधील अनेक ज्यू व इतर लोकांना हिब्रू-खेरीज इतरही भाषा येतात अरबी, लॅट्वियन किंवा वेल्श भाषेचा वापर पुष्कळ कुटुंबातून होतो, पण मुख्य भाषा हिब्रूच ! प्रमुख वृत्तपत्रे त्याच भाषेत. बहुसंख्य ग्रंथांची भाषा तीच, शिक्षणाचे प्रमुख माध्यम तेच !

१८८० साली बेन–येहुदाने हिब्रूच्या पुनरुज्जीवनाची तुतारी फुंकली त्यावेळी हिब्रू ही मुख्यत्वेकरुन ग्रांथिक भाषा होती. साहित्यनिर्मिती, तत्त्वज्ञान, धार्मिक व्यवहार यासाठी ती पुरेशी होती. परंतु दैनंदिन व्यवहाराची बोलभाषा व आधुनिक विज्ञान व तंत्र यासाठी ती पुरेशी नव्हती. परंतु हिब्रू भाषा–भाषिकांनी तिचा बोलभाषा म्हणून सर्रास उपयोग सुरू केला. कर्मठ व पुराणमतवादी भाषाशास्त्रज्ञांना व विद्वानांना व्याकरणाच्या नियमांचा व 'शुद्ध' भाषेचा हा उपमर्द सहन होईना. पण लोकांना भाषा हे साधन होते, गरजेनुसार व्याकरणाचे ग्रांथिक नियम गुंडाळून ठेवून लोकांनी भाषा बदलली, समृद्ध केली. ललित लेखकांची या कामी लोकांना फार मदत झाली. कथा–कादंबऱ्यांमधील संवाद, संभाषणे यातून बोलभाषेला नवे वळण मिळाले व सामान्य जनतेची नवी, आधुनिक हिब्रू भाषा आकार धारण करू लागली.

तंत्र-विज्ञानासाठी नवी शब्दसंपत्ती

विज्ञान व तांत्रिक क्षेत्रात हिब्रू भाषेच्या प्राचीन शब्दसंपत्तीच्या भांडारातून यथार्थ शब्द शोधून काढणे, त्यांची नवी रुपे बनविणे आणि आवश्यक तेथे संपूर्णपणे नवीन शब्द तयार करणे हे अर्थात्च अवघड काम होते. पण हिब्रूच्या पुनरुज्जीवनाचा प्रणेता बेन–येहूदा यानेच यासाठी शब्दकोश ('थेसारस') रचण्याचे कार्य सुरू केले होते. इस्त्राएलच्या स्थापनेनंतर दहा वर्षांनी हा कोश पूर्ण झाला व एकूण १७ खंडाच्या या कोशाने हिब्रू भाषेचा सर्व क्षेत्रात सुलभपणे वापर व्हावा हे बेन–येहूदाचे स्वप्न सत्यसृष्टीत उतरले. याशिवाय इतरही कोश आता प्रकाशित झाले असून कोणत्याही प्रसंगी हिब्रू भाषा कशी पुरी पडेल हा प्रश्न राहिलेला नाही.

याच कामसाठी १९०४ साली एक भाषा मंडळ (वाद हा–लाशोन) स्थापन झाले होते, त्या मंडळाने

फार महत्त्वाची कामगिरी बजावली. इस्राएलच्या स्थापनेनंतर या संस्थेचा व्याप पुष्कळच वाढला व तिच्या अनेक शाखा ठिकठिकाणी हिब्रू भाषेच्या प्रसाराचे व ती भाषा समृद्ध करण्याचे कार्य करू लागल्या. भाषातज्ञ, विद्वान मंडळी व निरनिराळ्या क्षेत्रात कार्य करणारे इंजिनीअर, तंत्रज्ञ, वगैरेंनी मिळून आपापल्या गरजांप्रमाणे शेकडो नवीन शद्बांचा वापर सुरू केला. त्यातले काही शद्ब मागे पडले, काहींची रूपे बदलली, पण एकंदरीने भाषासमृद्धीचे कार्य वाढत गेले. मोटार व तिचे सुटे भाग, टेलिफोन व त्यासंबंधीची यंत्रसामुग्री, यासारख्या तांत्रिक क्षेत्रात लागणाऱ्या शद्बांचे संग्रह, तसेच संगीत क्षेत्रातील शद्बसंग्रह, असे अनेक संग्रह या संस्थेने प्रकाशित केले आहेत.

या मंडळाला आता इस्राएल सरकारने 'हिब्रू भाषा ॲकॅडेमी'चे स्वरुप दिले असून नामवंत भाषाशास्त्रज्ञ, लेखक, कवी वगैरेंच्या या मंडळाचे निर्णय सर्व सरकारी भाषाव्यवहारात अमलात आणले पाहिजेत अशी कायदेशीर तरतूद करण्यात आली आहे. बायबलमधील हिब्रू भाषेत ७,७०४ भिन्न शद्ब आहेत. परंतु अर्वाचीन हिब्रू भाषेत सुमारे तीस हजारांहून अधिक शद्ब असून त्या सर्वांचे अर्थ भाषा–ॲकॅडेमीने निश्चित केले आहेत. यापैकी सुमारे नऊ हजार नवे शद्ब गेल्या २५–३० वर्षात आलेले असून त्यात व्यावहारिक उपयोगाचे शद्ब व तांत्रिक शद्ब व संज्ञांचा समावेश आहे.

इस्त्राएलच्या संरक्षण विभागाची एक भाषा समिती असून तिने अनेक नवीन शद्ब व संज्ञा तयार करून हिब्रू भाषेच्या शद्बसंपत्तीत भर घातली आहे.

याशिवाय इतर अनेक शासकीय संस्था व कार्यालये आपापल्या गरजांनुसार शद्ब बनवितात व सरावाने त्यातले अनेक रूढ होतात. वृत्तपत्रे, रेडियो वगैरे क्षेत्रात व ग्रंथलेखनात तर नवीन शद्बांची निर्मिती व भाषेला वळण देण्याची प्रक्रिया सतत सुरूच असते.

अर्वाचीन हिब्रू भाषा ही मूलतः बायबलमधील प्राचीन हिब्रूवर आधारित असली तरी त्या भाषेची रचना प्राचीन हिब्रूपेक्षा पुष्कळच निराळी व सुलभ झाली आहे. शद्बांच्या अर्थात परिवर्तन, शद्बांचे भिन्न अर्थ, या प्रवाही भाषेतील प्रक्रियाही मोठ्या प्रमाणात घडून येत आहेत.

उच्चारांची समस्या

हिब्रू भाषेतील उच्चारांचीही एक मोठी समस्या या पुनरुज्जीवनात ज्यू लोकांपुढे आहे. गेल्या दोन हजार वर्षांच्या कालखंडात परस्परांना पूर्णपणे दुरावलेल्या निरनिराळ्या देशातील ज्यू जमातींचे लोक आपल्या प्रार्थनामंदिरात प्राचीन हिब्रू भाषेचा उपयोग करीत असले तरी त्यांचे उच्चारण भिन्न होते. आजही निरनिराळ्या प्रदेशातून आलेल्या ज्यू लोकांच्या हिब्रू भाषेच्या उच्चारात हा फरक आढळतो. विशेषतः इस्राएलमध्ये बराच काळ वास्तव्य करून असलेले ज्यू व अन्य राष्ट्रातून अलिकडेच आलेली ज्यू कुटुंबे यांच्या हिब्रू भाषेच्या उच्चारातील फरक तीव्रतेने जाणवण्याइतका स्पष्ट आहे. परंतु इस्राएलमध्येच जन्माला येऊन लहानपणापासून हिब्रू भाषेचे संस्कार झालेल्या नव्या पिढीचे उच्चार पुष्कळसे सारखे आढळतात. कालांतराने यात बोलीभाषांचे थोडे भेद राहिले तरी सुशिक्षित समाजाची हिब्रू भाषा एकसत्र बनेल हे उघड आहे.

भाषा व साहित्याचा प्रसार

हिब्रू भाषेच्या पुनरुज्जीवनामुळे इस्राएल मध्ये नवे साहित्य व नवीन ग्रंथनिर्मितीला फारच मोठे प्रोत्साहन मिळाले आहे. परदेशात आपापल्या स्थानिक भाषांमध्ये लेखन करणारे अनेक नामवंत ज्यू लेखक, कवी नाटककार, शास्त्रज्ञ व पत्रकार गेल्या २५–३० वर्षात मोठ्या संख्येने पॅलेस्टाईनमध्ये आले, त्यांनी तर हिब्रू साहित्यात भर टाकलीच, पण आता इस्राएलच्या निर्मितीनंतर तेथेच वाढलेल्या हिब्रू लेखकांची नवी पिढीही अनेक विषयांवर जोमाने लेखन करू लागली आहे. हिब्रू भाषेतील नाटके, बोलपट यांच्या निर्मितीलाही जोर आला असून राष्ट्रीय ऐक्य, समृद्धी व संरक्षण ही उद्दिष्टे साध्य करण्यात हे नवे साहित्य अत्यंत उपयुक्त कामगिरी बजावीत आहे.

इस्राएलमध्ये शेकडोंच्या संख्येने येणाऱ्या अनेक भिन्न देशातील ज्यू कुटुंबांना हिब्रू भाषा शिकविणे व ज्यांना ती बोलता येते त्यांना लिहायला शिकविणे हा सुद्धा हिब्रूच्या पुनरुज्जीवनाच्या मोहिमेतील कार्यक्रम आहे. त्यासाठी भाषेच्या अध्यापनाच्या आधुनिक पद्धती व तंत्र यांचा उपयोग करून अल्पावधीत हिब्रू भाषा शिकविण्याचे अभ्यासक्रम मोठ्या प्रमाणावर घेण्यात येतात. 'उल्पान' नावाच्या चार मोठ्या शिक्षणसंस्थांमधून दरवर्षी १२०० लोकांना हिब्रू भाषा शिकविली जाते.

प्रत्येक अभ्यासक्रम पाच महिन्यांचा असतो. या काला-वधीत ती भाषा शिकणाऱ्यांना संस्थेतच राहून तो अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो व त्यानंतर ते हिब्रू भाषा, चांगल्या प्रकारे बोलू व लिहू शकतात व जबाबदारीच्या जागांवर हिब्रू भाषेतून कारभार करू शकतात असा अनुभव आहे. या शिवाय मोठमोठ्या शेती-वसाहतींवर काम करणाऱ्या तरुण शेतकऱ्यांना अर्धा वेळ शिक्षण देणाऱ्या अनेक संस्थांमध्येही हिब्रू भाषेच्या अभ्यास-क्रमाला महत्त्वाचे स्थान असते.

१९५३ साली हजारो लोकांना घरी जाऊन हिब्रू भाषा शिकविण्यासाठी एक 'हांचालात हा-लाशोन' (भाषेचा वारसा जनतेपर्यंत नेऊन पोचविण्याची मोहीम) हा नवीन कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्यासाठी दैनं-दिन व्यवहारात उपयोगी पडणाऱ्या एक हजार शब्दांच्या व पुढे ५०० शब्दांच्याद्वारे हिब्रू भाषेचा खास अभ्यास-क्रम तयार करण्यात आला. या १००० व ५०० शब्दांच्या मर्यादेत लिहिलेली अनेक पुस्तके तयार झाली व या 'सुलभ हिब्रू' भाषेत एक साप्ताहिक वृत्तपत्र व रेडियोवर दैनिक वार्तापत्र सुरू करण्यात आले.

अशा प्रकारे इस्राएलमध्ये हिब्रू भाषेच्या व संस्कृ-तीच्या पुनरुज्जीवनाची योजना संपूर्णपणे यशस्वी झाली आहे व शिक्षण, शेती, आर्थिक प्रगती, संरक्षण या सर्व क्षेत्रात या चिमुकल्या राष्ट्राने केलेल्या नेत्रदीपक प्रगतीचे रहस्य या हिब्रू भाषेच्या पुनरुज्जीवनातच साठविलेले आहे. हिब्रूच्या जोडीला आता मुख्यत्वेकरुन इंग्रजी व फ्रेंच आणि जर्मन, अरबी, फारशी, यिद्दिश, लाडिनो, पोलिश, हंगेरिअन, रुमानिअन व बल्गेरिअन आदि भाषाही अनेक लोक शिकतात व त्या भाषांमध्ये दैनिके व साप्ताहिकेही प्रसिद्ध होतात. परंतु दैनंदिन व्यवहा-राची, राज्यकारभाराची व शिक्षणाची भाषा हिब्रूच !

तीन हजार वर्षापूर्वीच्या एका प्राचीन भाषेचे आधुनिक काळात पुनरुज्जीवन करण्याचा हिब्रूचा हा यशस्वी प्रयोग अत्यंत अभिनव व भाषिक प्रश्नाच्या सोडवणुकीच्या दृष्टीने अभ्यासण्याजोगा आहे. प्रादेशिक भाषांतून तंत्र व विज्ञानाचे विषय शिकविलेच जाऊ शकत नाहीत व या भाषांतून ग्रंथनिर्मिती करण्याची योजना आखलीच तरी त्याला अनेक पिढ्यांचा काला-वधी लागेल, त्यापेक्षा इंग्रजीतूनच हे शिक्षण व राज्य-कारभार होऊ द्या, असे अट्टाहासाने कंठशोष करून मांगणाऱ्या इंग्रजीच्या पुरस्कर्त्यांनीही हिब्रूच्या पुनरुज्जी-वनाचा हा अनुभव विचारात घेतला तर त्यांच्यापैकी निदान काही प्रामाणिक लोकांच्या विचारात बदल होण्याची शक्यता आहे.

संस्कृतचेही पुनरुज्जीवन होऊ शकेल

तसेच भारतात संस्कृत भाषेच्या पुनरुज्जीवनासाठी धडपडणारी काही 'संस्कृतवेडी' मंडळी आहेत. वस्तुतः संस्कृत भाषा व साहित्याचा अभ्यास ही गोष्ट या देशात अगदी स्वाभाविक व नित्यक्रमाची असली पाहिजे. परंतु इंग्रजांच्या व इंग्रजीच्या संपर्काने काही प्रमाणात आधु-निक विज्ञानाची व आधुनिक जगाची ओळख झाली असली तरी इंग्रजीची मगरमिठी घट्ट बसल्यामुळे आपण अनेक बाबतीत आपले भारतीयत्व गमावून बसलो, त्यात संस्कृत भाषेची अवहेलना ही आपली अत्यंत गंभीर अशी सांस्कृतिक हानी आहे. तसेच संस्कृत भाषा व साहित्य यांची प्राचीन धर्मविषयक कल्पनांशीच नव्हे तर सनातन रूढी, चातुर्वर्ण्य पद्धती, अंधश्रद्धा, भ्रामक समजुती व बुरसटलेले सामाजिक विचार यांच्याशी सांगड घातली गेल्यामुळे संस्कृत भाषेचा अभ्यास म्हणजे प्राचीन धार्मिक विचारांचे व रूढींचे पुनरुज्जीवन असे अत्यंत चुकीचे समीकरण रूढ झाले आहे. वस्तुतः असे होण्याचे काहीच कारण नाही. अत्यंत आधुनिक पद्ध-तीचा पोषाख केलेले, स्कूटरवर हिंडणारे संस्कृतचे शिक्षक व प्राध्यापक असू शकतात व सरकारी अधिकारी, इंजिनीअर, डॉक्टर, शेतीतज्ज्ञ, वैमानिक व त्यांच्या विमानातील हवाई सुंदरी आणि रणगाडे व राडार चालविणारे सैनिक या सर्वांना संस्कृत भाषा उत्तम आली व शाकुंतलच नव्हे तर रामायण-महाभारत व वेद उपनिषदे सुद्धा त्यांना मूळ संस्कृतात वाचता आली व समजली तर त्यांची आपापल्या क्षेत्रातील कार्यक्षमता कमी होण्याचा यत्किंचित्‌ही संभव नाही, उलट त्यांचे व्यक्तिमत्व व भारतीयत्व अधिक समृद्ध सकस व तेजस्वी बनेल ही भावना या देशात रूढ झाली पाहिजे. माध्यम म्हणून प्रादेशिक भाषांच्या वापर करताना नवीन शब्द व संज्ञा तयार करण्यासाठी तर संस्कृतचे ज्ञान अत्याव-श्यकच आहे. त्यासाठी प्रादेशिक भाषांच्या जोडीला संस्कृत शिकविले गेले तर आपले अनेक नवे शिक्षक, लेखक, अनुवादक, पत्रकार, साहित्यिक हे सर्व आपापल्या भाषांचा उपयोग अधिक समर्थपणे करू लागतील व

[पान १२२ वर]

सहप्रवाश्याचे सहसंवेदन

डॉ. अ. ना. देशपांडे

[डॉ. वि. भि. कोलते यांचा 'प्राचीन मराठी साहित्य संशोधन' हा ग्रंथ नुकताच प्रकाशित झाला आहे. या ग्रंथाला डॉ. अ. ना. देशपांडे यांनी लिहिलेली प्रस्तावना वाचकांना विचारप्रवर्तक वाटेल म्हणून त्यांच्या अनुमतीने येथे देत आहोत. – संपादक]

खीर की घोळाणा ?

'प्राचीन मराठी साहित्य संशोधन' या डॉ. वि. भि. कोलते यांच्या लेखनसंग्रहरूप ग्रंथाला मी प्रस्तावना लिहावी अशी त्यांनीच मला सूचना केली आणि ती मी स्वीकारली. स्वीकारल्यानंतर प्रस्तावनालेखनाची भूमिका काय असावी यासंबंधी माझ्या डोक्यात विचारमालिका सुरू झाली. प्रस्तावना हा एक स्वतंत्र वाङ्मय प्रकार कल्पून त्याच्यासंबंधीची तंत्र चिकित्सा कोणी केल्याचे माझ्या तरी ऐकिवात नाही. 'प्रस्तावना–एक वाङ्मय-प्रकार –– तंत्र आणि विकास' अशा एखाद्या प्रबंधाचा भरदार अलंकार या वाङ्मयप्रकारावर कोणी चढविलेला असल्याची वार्ताही माझ्या कानांवर आलेली नाही. असे काही झालेले असते तर त्यापासून निश्चितच मार्गदर्शन मिळाले असते. प्रस्तावना, तिचे प्रयोजन, तिचे आदर्श स्वरूप, ती लिहिणाऱ्याच्या अंगी अपरिहार्यपणे आवश्यक असलेले गुण यांची साहित्यशास्त्रज्ञाकडून मीमांसा होणे आवश्यक आहे, असे येथे म्हणूनच सुचवावेसे वाटते. या बाबतीत उत्पन्न होणारा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न– प्रस्तावनालेखक आणि ग्रंथलेखक यांचे परस्पर नाते कोणत्या प्रकाराचे असावे ? – हा आहे. प्रस्तावना-लेखक हा ग्रंथलेखकाचा पाठपुरावा करणारा वकील असावा काय ? किंवा लेखकाच्या आशयातील आणि अभिव्यक्तीतील गुणदोषांची निर्णयचिकित्सा करणारा व त्यावर निर्णयात्मक अभिप्राय देणारा तो न्यायाधीश असावा काय ? किंवा लेखकाच्या कृतीतील गुणांचा उल्हासपूर्वक गौरव करून तिच्यातील उणिवांना हळुवार स्पर्श करणारा त्याचा तो प्रेमळ मित्र असावा काय ? किंवा लेखकाला उत्तेजनपर आशीर्वाद देणारा वडिलधारा विद्वान तो असावा काय ? अडचण अशी उत्पन्न झालेली आहे की, यापैकी कोणत्याही एक नातेविशेषांत मी बसू शकत नाही.

डॉ. कोलते आणि मी यांच्यात गुरुशिष्याचे नाते आहे. प्रस्तावनाशास्त्राप्रमाणे शिष्याने गुरूच्या ग्रंथाला प्रस्तावना लिहिणे हे कदाचित निषिद्ध मानले जाण्याचा संभव आहे त्यामुळे ही प्रस्तावना लिहिताना मी या सगळ्या नातेसंबंधांपासून अलिप्त राहणार आहे. मी स्वतंत्र भूमिका घेणार आहे–तटस्थतेची दुरून, पाहण्याची; पण सौहार्दपूर्वक व मनःपूर्वक आदराची. प्राचीन मराठी साहित्याच्या प्रदेशात डॉ. कोलते आणि मी सहप्रवासी आहोत. या प्रदेशात डॉ. कोलते गाजत्या प्रसिद्धीच्या वैभवासह, चौफेर कर्तृत्वाच्या भव्य लवाजम्यासह आणि मानमान्यतेच्या ताशेवाजंत्रीसह परिभ्रमण करीत आहेत. या प्रदेशात मीही हिंडत आहे; पण एकाकी, एकटा, उपेक्षित, दुर्लक्षित, कधी कधी अवगणनेविधित, तरीही आत्मविश्वस्त आणि आत्मनिर्धारित. या प्रदेशात संचार करतांना मला अनेक विद्वानांचे कर्तृत्व साहाय्यकारी झालेले आहे. त्यांत डॉ. कोलते यांच्या कर्तृत्वाचे स्थान फार महत्वाचे आहे. या प्रदेशाची पाहाणी करीत असताना इतर अनेक पंडितांबरोबर मला डॉ. कोलते यांचाही आधार घ्यावा लागलेला आहे. त्यामुळे डॉ. कोलते आणि मी सहप्रवासी असलो तरी मी एक सामान्य प्रवासी आहे– बुद्धीत सामान्य, परिश्रम-शीलतेत सामान्य, कर्तृत्वात सामान्य. डॉ. कोलते हेही प्रवासी आहेत. पण बुद्धीत असामान्य, परिश्रमशीलतेत असामान्य, कर्तृत्वात असामान्य. प्रस्तुत लेखनसंग्रहाच्या रूपाने डॉ. कोलते यांच्या कर्तृत्वाचे जे दृश्य रूप प्रकट झालेले आहे ते पाहून मला जे प्रामाणिकपणे वाटले ते मी नम्रपणे पण निर्भयपणे येथे मांडणार आहे. डॉ. कोलते

यांचा प्रस्तुत ग्रंथ म्हणजे संशोधनप्रेमी जनांस खाशी मेजवानीच आहे. काही प्रसंगी जेवताना, प्रत्यक्ष जेवणास सुरूवात करण्यापूर्वी, आधी थोडीशी खीर खावी लागते. कित्येक वाचकांना ही प्रस्तावना मेजवानीपूर्वी खावयाच्या खिरीसारखी वाटणार आहे. काही प्रसंगी जेवताना, प्रत्यक्ष जेवणास आरंभ करण्यापूर्वी, आधी थोडासा कडु लिंबाचा घोळाणा खावयाचा असतो. कित्येकांना ही प्रस्तावना घोळाण्यासारखी वाटण्याचा संभव आहे.

संशोधनास उपकारक असलेली त्रिपथगा

प्राचीन मराठी साहित्यासंबंधी डॉ. कोलते यांनी मांडलेले संशोधनपर विचार ज्यात ग्रंथित झालेले आहेत असे एकूण अकरा लेख प्रस्तुत ग्रंथात एकत्र आणलेले आहेत. प्राचीन मराठी वाङमयाचे संशोधन किती प्रकारांनी होण्याची शक्यता आहे ? असे प्रकार स्थूल मानाने एकूण सात संभवू शकतात.

१) व्यक्ति-स्थल-काल-निर्णय करणे.

२) पाठसंहिता-निर्णय आणि अर्थ-निर्णय करणे.

३) ग्रथभाष्य वा भाषांतर असल्यास मूळ कृतीबरोबर तुलना करणे.

४) भाषिक वैशिष्टयांची पाहणी करणे आणि त्या वैशिष्टयांचा ऐतिहासिक दृष्टया मागोवा घेणे.

५) काव्यलक्षणदृष्टया मूल्यमापन करणे.

६) वाङमयकृतीत समाजजीवनाच्या पडलेल्या प्रतिबिंबाची आणि वाङमयकृतीच्या समाजजीवनावर पडलेल्या प्रभावाची दाद घेणे.

७) अध्यात्मदृष्टीने परामर्ष घेणे.

प्रस्तुत लेख संग्रहात यांपैकी (१), (२), (३), (४), व (५) या पाच प्रकारांत मोडणारे लेख आलेले आहेत. साधारणपणे स्थल-काल-व्यक्ति-पाठ-अर्थ यांचा निर्णय करू पाहाणारे जे लेख असतात त्यांना त्या त्या प्रश्नातला शेवटचा शद्व असे स्वरूप सहसा प्राप्त होत नाही. त्या त्या प्रश्नाबद्दल कोणाला तरी मागाहून नवीन माहिती मिळते, कोणाला नवीन कल्पना सुचतात, कोणाला नवे स्पष्टीकरण स्फुरते आणि मग त्यासंबंधीच्या विवेचनाला नव्या विचाराचे नवे कोंब, नवे घुमारे फुटू लागतात. हे लक्षात घेतल्यावर डॉ. कोलते यांच्या ' ज्ञानदेवीची सिद्धनाथसंहिता ' या लेखाला मिळालेले यश निस्संशय अभिनंदनीय स्वरूपाचे आहे असे म्हटले पाहिजे. ज्ञानदेवीचे प्राचीनतम हस्तलिखित असलेली तिची शके १२७२ मधली सिद्धनाथसंहिता आम्हांस सापडलेली आहे, अशी विजयपताका फडकावीत डॉ. हर्षे संशोधनक्षेत्रात मिरवीत असतांना डॉ. कोलते यांनी त्यांना आव्हान दिले आणि हे मिरविणे कसे निराधार आणि निरर्थक आहे हे साधार पटवून दिले. शत्रूवर चारही बाजूंनी, कुशल योजना आखून हल्ला करावा व त्याचा पूर्ण पाडाव करावा त्याप्रमाणे डॉ. कोलते यांनी अनेक प्रकारचा पुरावा परिश्रमपूर्वक गोळा करून सिद्धनाथप्रतीसंबधीचे विप्रप्रमेय पूर्णपणे नेस्तनाबूद करून टाकले. त्यानंतर या संहितेची कड घेऊन संशोधनप्रदेशात तिच्या प्राचीनतमतेची झेंडी फडकवीत पुन्हा कोणी गडवड उडवून देण्यास पुढे सरसावलेले दिसत नाही. डॉ. कोलते यांनी हाणलेला सप्रमाण खंडनाचा फटकारा चांगलाच कारीगर ठरला असा याचा अर्थ आहे, संशोधनक्षेत्रातले हे यश निस्संशय हेवा वाटण्यासारखे आहे.

सिद्धनाथसंहितेवरील या लेखाला जी निर्णायक ऐट लाभलेली आहे ती 'फुलान्त्रिया भोगा । लागि प्रेमदांगा ।', 'त्रिसांकु', , रघुनाथ पंडिताच्या कालनिर्णयाची एक दिशा' व 'ज्योतिषरत्नमाला-मराठी टीका' या लेखांना मात्र प्राप्त झालेली नाही ; पण त्यामुळे या लेखांचे संशोधनमूल्य मुळीच कमी होत नाही संशोधनकार्यात निर्णायकतेचा तोरा विशेष चालत नाही. सत्याचा, जमेल तितका (अंतिम सत्य कोणाला गवसले आहे ?) शोध करीत राहणे आणि त्या शोधाला पोषक आणि प्रोत्साहक अशा वादविशेषांना, अशा विचारधारांना चालना देणे हे संशोधनविषयक उद्योगांतले प्राणतत्व आहे ; आणि डॉ. कोलते यांच्या उपरोक्त चार लेखांत या प्राणतत्वाचे स्फुरण उत्कट स्वरूपात झालेले असल्याचा प्रत्यय कोणत्याही अभ्यासकाला सहज येण्यासारखा आहे. या चार लेखांतल्या वादग्रस्त प्रश्नांसंबंधी अजूनही नवे दृष्टीकोन मांडले जाण्याची शक्यता आहे ; आणि या नव्या दृष्टीकोनांमुळे डॉ. कोलते यांना विशिष्ट वादप्रश्नासंबधी आपले मत बदलावे लागले तर त्याला ते नेहमीच तयार आहेत; कारण खऱ्या संशोधकाची प्रतिष्ठा जिच्यावर आधारलेली आहे अशी निरहंकार पण त्याचबरोबर कठोर अशी सत्यनिष्ठा ही डॉ. कोलते यांच्या ठिकाणी स्थायी-

भावपद पावलेली आहे. शिवाय, केवळ उपरिनिर्दिष्ट पाचच लेख नव्हेत, तर प्रस्तुत संग्रहातले सर्वच लेख वाचले असता आणखी एक प्रतीती येते. ती ही की, डॉ. कोलते यांच्या अंगी असलेल्या गुणसमारप्रदेशातून निरलस व्यासंगशीलता, अनाग्रही व विवेचक बुद्धिमत्ता आणि चांगदळ गमिकता ही जी त्रिपथगा वाहून असताना दिसून येते. ती संशोधनकार्याचे भरघोस पीक काढण्यास अतिशय उपकारक ठरण्यासारखी आहे.

दोन प्रकारचे संशोधन

संशोधनाचे, परिणामाच्या दृष्टीने, दोन वर्ग पाडता येण्यासारखे आहेत. काहींचे संशोधकी पांडित्य हे बंद कुपीतल्या अत्तरासारखे असते. पंडिती अहंमन्यतेच्या चाळीशीतून जगाकडे पाहणारे कडक मानेचे निवडक विद्वान जरूर पडेल तेव्हा या अत्तराचा वास घेत असतात. एरवी सर्वसामान्य सुशिक्षितांना मात्र या अत्तराच्या अस्तित्वाची जाणीवसुद्धा नसते. या संशोधनामुळे सर्वसामान्यांच्या जीवनरूपी जलाशयाच्या पृष्ठभागावर इवलासासुद्धा तरंग उठत नाही, इतके ते आत्मसंतुष्ट, अलिप्त आणि लोकविमुख प्रकृतीचे असते. काहींचे संशोधनगर्भ पांडित्य हे मात्र झंझावातासारखे असते; प्रक्षोभ उत्पन्न करणारे असते समाजजीवनाच्या सर्व स्तरांवर ते उलथापालथ घडवून आणते. जसे डॉ. आंबेडकरांचे पांडित्य, जसे विशिष्ट अंशापुरते लोकमान्य टिळकांचे पांडित्य. डॉ कोलते यांच्या काही संशोधनपर लेखांनी सुशिक्षित जन – जीवनातील रूढ समजुतींना धक्का देणारे, झुंजार वृत्तीचे पण पुष्कळच संयत स्वरूपाचे वळण घेतलेले आहे. श्री चक्रधर, नामदेव व ज्ञानदेव यांच्यावरील त्यांचे लेख या वळणाची साक्ष देणारे आहेत.

मिठाच्या व्यापाऱ्याने दुधात टाकलेला मिठाचा खडा

या तीन व्यक्तींत कालदृष्टीने क्रम असा– श्री चक्रधर, नामदेव आणि ज्ञानदेव; आणि कर्तृत्वाच्या श्रेष्ठतेच्या निकषाच्या दृष्टीनेही क्रम तसाच–श्री चक्रधर, नामदेव आणि ज्ञानदेव. अशी स्पष्ट वस्तुस्थिती असतांना सुद्धा गौरवकारणात गडबड झालेली आहे. कशी ती पहा. ज्ञानदेवांचे, त्यांच्या अलौकिक व्यक्तित्वाबद्दल, अलौकिक कवित्वाबद्दल जे भरपूर गुणगान झालेले आहे आणि होत आहे ते निर्विवादपणे योग्यच आहे; पण त्यांनी जी सामाजिक क्रांती केलीच नाही ती घडवून आणल्याचे अकारण श्रेय मात्र त्यांना दिले जात आहे. उलट, नामदेवांनी उत्तर हिंदुस्थानात जाऊन आयुष्यातला सगळाच उमेदीचा आणि उतारणीचा काळ तेथेच घालवून, तेथील सामान्य जनतेत, हलक्या मानल्या गेलेल्या जातींतल्या तेथील लोकांत जे ईश्वरभक्तीचे चैतन्य निर्माण केले, भक्तिमार्गाची जी मर्द परंपरा निर्माण केली त्याबद्दल त्या प्रमाणात त्यांचा तोंडभरून योग्य गौरव करावयाला मराठीतला संतवाङ्मयविवेचक मात्र विसरून गेलेला आहे. एवढेच नव्हे तर, एकाच वेळी ज्ञानदेवांना वर चढवायचे आणि नामदेवांना खाली ओढावयाचे असा नतद्रष्ट उद्योगही त्याने केलेला आहे. काही विद्वान सारस्वतविवेचकांनी नामदेवांना ज्ञानदेवाचा शिष्य बनवून टाकले आहे. (वस्तुतः वारकरी परंपरेत ज्ञानदेवांचा असा एकही अनुगृहीत शिष्य नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे.) ज्ञानदेवांनी जेव्हा शिकविले तेव्हा नामदेवांना पारमार्थिक शहाणपण आले असे सांगण्यात आले आहे. हे धादांत असत्य वर्षानुवर्षे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या गळी उतरविले जात आहे. मिठाच्या व्यापाऱ्याने दुधात हा मिठाचा खडा टाकून दिलेला आहे; तरी पण हे दूध किती गोड आहे अशी या नासलेल्या दुधाची प्राध्यापकांकडून विद्यार्थ्यांसमोर सतत प्रशंसा केली जात आहे, आणि विद्यार्थीही ही प्रशंसा प्रमाण मानीत आहेत. ज्ञानदेव नं. १ आणि नामदेव नं. २ असा ग्रह मनात कायम करून ते महाविद्यालयातून बाहेर पडत आहेत. वस्तुतः जसे ज्ञानदेव आपल्या क्षेत्रात नं. १ आहेत त्याचप्रमाणे नामदेवही आपल्या क्षेत्रात नं. १ आहेत, ही वस्तुस्थिती त्याच्या कानांवर कोणी घालीत नाही. ही नामदेवांना निश्चितच अन्याय करणारी गोष्ट आहे. नामदेवांच्या कर्तृत्वाचा आणखी एक पलू येथे आवर्जून सांगणे आवश्यक आहे. ज्ञानदेवांमुळे नामदेव बदलले ही वर्णधर्माभिमान्यांनी उठविलेली एक अफवा आहे. नामदेवांमुळे ज्ञानदेव बदलले, भक्तिमार्गी बनले, ज्ञानदेवाना नामदेवांच्या रूपाने भक्तिरहस्याचे साक्षात दर्शन झाले ही वास्तव स्थिती आहे. नामदेवांच्या या पारमार्थिक कर्तृत्वाचे गौरवगान मात्र व्हावयाचे राहिले आहे.

God man आणि Man God

श्री चक्रधरांचे कर्तृत्व तर नामदेव व ज्ञानदेव या दोघांच्याही कर्तृत्वापेक्षा अधिक वरिष्ठ श्रेणीचे आहे.

विशेषतः श्री चक्रधर व ज्ञानदेव याच्या थोरवीतला जो एक फरक आहे तो तर बुद्धीचे बटीक बनलेल्या आजच्या सुशिक्षितांच्या गावीही नाही; आणि तो फरक त्यांच्या लक्षात आणून दिल्यावर या गर्वांध व बुद्धिवद्ध सुशिक्षितांच्या मूर्ख उपहासाचा तो विषय होईल अशी भीती आहे परमार्थिक दृष्टीने हा फरक अतिशय महत्त्वाचा आहे. श्री चक्रधर हे अवतार आहेत, God man आहेत, तर ज्ञानदेव सद्गुरू आहेत, man God आहेत. श्री चक्रधरांचा एवढा अनन्य अधिकार असूनही त्यांच्या वाटयास काय आलेले आहे ? अद्वैतवादाचे, सर्वत्र ईश्वर पाहण्याचे धडे जगाला देणाऱ्या आणि विश्वची माझे घर म्हणणाऱ्या या महाराष्ट्राने या मानवतावादी महात्म्याला, या ईश्वरी विभूतीला काय दिलेले आहे ? दोनदा विषप्रयोग, एकदा अवयवच्छेद आणि शेवटी शिरच्छेद; आणि निर्णयानंतर ब्राम्हणी पंडितांकडून त्यांना आणि त्यांच्या अनुयायांना निंदानालस्तीचा, तिरस्काराचा, उपमर्दाचा अखंड अहेर !

हिंदू धर्मांचा संकोच होत आहे, का ?

असे का व्हावे ? याला कारण एकच वैदिकत्व. विषारी असहिष्णुतेने भारलेले वैदिक धर्मतत्त्व, सामाजिक विषमतेचे पद्धतशीर पोषण करणारा वर्णधर्म हा वैदिकत्वाचा गाभा; आणि ब्राम्हणांचे सामाजिक श्रेष्ठत्व हा या गाभ्याचाही गाभा. वैदिकत्व, वर्णत्व, ब्राम्हणत्व—शब्द तीन, पण या तिहीतूनही सूचित होणारी वस्तू एकच आहे. ती म्हणजे अन्याय, असहिष्णु वर्णव्यवस्था व तत्संलग्न जातिसंस्था. ब्राम्हणांच्या वर्णश्रेष्ठत्वाच्या आसुरी लालसेमुळे वैदिक हिंदुधर्मात सामाजिक समता कधीच प्रस्थापित झाली नाही आणि पुढेही कधी काळी ती प्रस्थापित होईल, अशी आशा बाळगण्यातही अर्थ नाही. सामाजिक समतेला स्थान न दिल्यामुळे हिंदू धर्माची काय अवस्था झाली आहे तो पहा ! ख्रिश्चन, बौद्ध, इस्लाम हे धर्म आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा पावले आहेत, जगभर त्यांचा प्रसार आहे, विस्तार आहे; आणि हिंदुधर्म मात्र येथे या देशात, अवघडलेल्या अवस्थेत, बौद्धांच्या, मुसलमानांच्या, ख्रिश्चनांच्या नावाने बोटे मोडीत आणि स्वतःभोवती खोटयाच आध्यात्मिक श्रेष्ठतेचे सोवळे गुंडाळून बसलेला आहे !

'सर्वाधमत्व ब्राम्हणत्व'

हिंदुधर्माचा असा संकोच होण्याला मुख्यतः त्यातील वर्ण—जाती—व्यवस्था, तिच्यातील जातीजातीसंबंधातील सामाजिक विषमता आणि अनेक सामाजिक व धार्मिक सवलतींचा मलिदा खाणारी ब्राम्हणांची खास प्रतिष्ठा —या गोष्टी कारणीभूत झालेल्या आहेत. या विषमतेचे निराकरण करून सामाजिक समता स्थापण्याचा कोणी प्रयत्न केला की, या प्रयत्नामुळे आपले आसन डळमळीत होणार या भीतीने, ब्राम्हण बहुधा हा प्रयत्न हाणून पाडावयाला टपलेला असायचा, असा प्राचीन व अर्वाचीनही काळचा अनुभव आहे. याची निरपवाद साक्ष पटविणारा एक उत्कृष्ट प्रसंग रामायणात उपलब्ध आहे. स्वर्गप्राप्तीसाठी एका शूद्राने आरंभिलेल्या तपश्चर्येमुळे एका ब्राम्हणाचा मुलगा मरण पावतो; रामाच्या राज्यांत पुण्यवान् ब्राम्हणाच्या मुलाला अकाली मरण कसे, या शंकेचा आधार घेऊन त्यासंबंधीची तक्रार श्रीप्रभू रामचंद्रापुढे नोंदविण्यात येते, त्या मरणाचे खापर त्या शूद्राच्या माथी फोडण्यात येते ; शूद्राला तपश्चर्येचा अधिकारच नाही असे रामाला सांगण्यात येते, "न शूद्रो लभते धर्मं युगतस्तु निरर्षभ।". ब्राम्हणवर्गाला प्रसन्न करण्याकरिता त्या निरपराध, सत्त्वशील शूद्राला राम ठार मारतो, इंद्र टाळ्या वाजवितो आणि संतापजनक आश्चर्याची गोष्ट ही की तिकडे तो ब्राम्हणाचा मुलगा, शूद्राला ठार मारल्यामुळे, जिवंत होतो ! वैदिक धर्मातील सामाजिक विषमतेचे दुष्ट संस्कार अट्टाहासाने कायम टिकविणारा ब्राम्हण्यपीडित वर्णधर्म कसा क्रूर आहे याची उत्तम कल्पना या प्रसंगावरून येण्यासारखी आहे. ब्राम्हणपुरस्कृत वर्णधर्मांतर्गत क्रूरतेचा चटका सम्राट हर्षवर्धनालाही झोंबलेला आहे. या उदारमतवादी, त्यागी राजाला ठार मारण्याचा कट ब्राम्हणांनी केलेला आहे. "पार्था जयाचिया ठायी । वैषम्याची वार्ता नाही । रिपुमित्रां दोही । सरिसा पाडु ।। जो खांडावया घावो घाली । का लावणी जयाने केली । दोघा एकिचि साउली । वृक्ष जैसा ।। " ही आध्यामिक पातळीवरील म्हणजे खरी पूर्ण समता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी गांधीजी प्रवृत्त झाले, पण त्यामुळे ते एका हिंदुत्ववादी ब्राम्हणाच्या पिस्तुलाच्या गोळीला बळी पडले, हा ताजा इतिहास आहे. गांधीजींप्रमाणे श्री चक्रधरही गुजराथेतून येऊन महाराष्ट्रात स्थायिक झाले; समता बोलले आणि समतेशी इमान राखून जगले; पण त्यांनाही वर्णधर्मवादी ब्राम्हणांच्या प्रयत्नांनी कायमचे वाटेस लावण्यात आले. त्यामुळेच तर 'सर्वाधमत्व ब्राम्हणत्व' असे चक्रधरांनी निस्संदिग्ध-

पणे सांगून टाकले. असे सांगण्यात त्यांचे काय चुकले ? त्यांनी फक्त वस्तुस्थितीचे अचूक निदान वर्तविले. त्यांनी वर्णधर्मातील असहिष्णुतेवर व ब्राम्हणांच्या अन्याय्य आक्रमकतेवर अचूक बोट ठेवले.

वर्णधर्म विषमतेबरोबर विसंगतीही उत्पन्न करतो

हा वर्णधर्म विषमता तर निर्माण करतोच; पण थोर तत्त्वज्ञांच्या विचारात विसंगतीही उत्पन्न करतो. ज्ञानदेवांच्या बाबतीत हा प्रकार कसा घडून आला हे पाहण्यासारखे आहे ज्ञानदेव हे मुख्यत: आत्मसाक्षात्कारवादी. त्यांच्या अमृतानुभवात, त्यांच्या चांगदेवपासष्टीत सगळी शिकवण आत्मदर्शनाची आहे. तेथे वावरतांना वर्णधर्माच्या पुरस्काराचा ओझरता सुद्धा वारा अंगाला लागणं अशक्य आहे. गीतेवर भाष्य लिहावयाला जेव्हा ते बसले तेव्हा या आत्मसाक्षात्कारवादाशी विसंवादी अशा वर्णधर्माची त्यांनी तडफदार तरफदारी केलेली आहे, ब्राम्हणांचा अपरंपार गौरव केलेला आहे. आणि शूद्रांबद्दल तिरस्कार दर्शविला आहे. वर्णधर्माचे आकर्षण इतके जबरदस्त आहे की त्याने ज्ञानदेवांसारख्या प्रेममूर्ती संतश्रेष्ठाला उपरोक्त विसंगती लक्षात न येण्याइतके आंधळे बनविले आहे. ज्ञानदेवांनी अंहिसेचे गोडवे गायिलेले आहेत; तेही अतिशय तन्मयतेने आणि विस्ताराने रस्त्यावर कृमिकीटक जर झोपतांना आढळला तर त्या रस्त्याने चालणारा, अहिंसक मनुष्य आपले पाय मागे वळवितो, परत फिरतो. कारण त्या कृमिकीटकाच्या रूपाने प्रत्यक्ष परमेश्वरच झोपलेला आहे, त्याची झोप मोडावयाची नाही, असा उदात्त अहिंसक विचार त्याच्या मनात उदयास येतो. अद्वैताचे प्रात्यक्षिकच असलेली अशी जी अहिंसा, अशी जी सर्वाभूती निरपवाद प्रेममयता, तिचे असे पराकोटीचे बहारीचे वर्णन ज्ञानदेवांच्या ज्या लेखणीने केलेले आहे त्याच लेखणीने अहिंसावादी जैनांचा कडकडून तुच्छतापूर्वक चावा घेतलेला आहे ! त्या दृष्टीने श्री चक्रधरांच्या जीवनातील अहिंसापालनामधील सुसंगती निश्चितच आदर्शवत् ठरण्यासारखी आहे. केवळ श्री चक्रधर आणि ज्ञानदेव हे एकेकटेच कशाला, एकीकडे महानुभाव पंथातले कवी आणि संत-महंत आणि वारकरी पंथातले एकनाथ-तुकारामादी संत यांची अहिंसापालनाबाबत तुलना केली असता, डॉ. कोलते म्हणतात त्याप्रमाणे " मराठी संतांनी महानुभावांविषयी अनुदार उद्गार काढलेले आहेत," "तरी कोणत्याही महानुभाव कवीने किंवा महंताने वारकऱ्यांविषयीच काय पण इतर कोणत्याही पंथियाविषयी तसे उद्गार काढलेले नाहीत," हे लक्षात घेऊन, महानुभावांनी अहिंसेचा पुरस्कार आणि आपले प्रत्यक्ष वर्तन यात विसंवाद उत्पन्न होऊ न देण्याला लागणारे अभिनंदनीय धैर्य दाखविले, असे म्हणता येत नाही काय ?

श्री चक्रधर व नामदेव एका बाजूचे व ज्ञानदेव दुसऱ्या बाजूचे

श्री चक्रधर, नामदेव व ज्ञानदेव या तिघांचा एकत्र विचार अनेकप्रकारे बोधप्रद ठरण्यासारखा आहे. या तीन व्यक्ती डोळ्यांपुढे एकत्र आल्या तर संतवाङ्मयाचे सुशिक्षित अभ्यासक नामदेव व ज्ञानदेव एका बाजूला आणि श्री चक्रधरांना दुसऱ्या बाजूला काढतील हे उघड आहे; पण असे करणे अज्ञानमूलक ठरणार आहे. खरी परिस्थितीं, श्री चक्रधर व नामदेव एका बाजूला व ज्ञानदेव दुसऱ्या बाजूला, अशी आहे. श्री चक्रधर वर्णधर्मविरोधं आहेत, अवैदिक आहेत. नामदेव वैदिकांच्या वर्णधर्माच्या छळाला बळी पडलेले आहेत. त्यांना वैदिकत्वाशी कसले सोयरसुतक आहे ? त्यांच्या विचारांचे वळण अवैदिकत्वाला जास्त जवळचे आहे. ज्ञानदेवांचा वेदशास्त्र विषयक अभिमान प्रसिद्धपणे स्पष्ट आहे; तो भाष्यरूप असला तरी मन:पूर्वक आहे. मग नामदेव-ज्ञानदेव यांना एकत्र आणणे कसे बरे न्याय्य आहे ? नामदेवांचो एक गौळण मुसलमानीण आहे. त्यांनी बुद्धाला अवतार मानून वंदन केलेले आहे. ज्ञानदेवांच्या गौळणीत मुसलमानिणीचा अंतर्भाव झालेला आहे काय? होणे शक्य आहे काय ? ज्ञानदेवांनी भगवान् बुद्धाबद्दल भक्तिभाव व्यक्त केलेला आहे काय ? व्यक्त करणे त्यांच्या बाबतीत शक्य आहे काय ? आणखी एक मुद्दा. अतिशय महत्त्वाचा. पारमार्थिक दृष्टीने तर विशेषेकरून विचारात घेण्यासारखा. ज्ञानदेवांनी गुरुकृपेची महती आत्यंतिकतेने गायिलेली आहे, हे खरे असले तरी त्यांचा मुख्य भर आत्मज्ञानावर आहे. माणूस आपल्या बळावर आपला उद्धार करून घेऊ शकतो, नव्हे-तो प्रत्यक्ष ईश्वर होऊ शकतो; या देहीच ब्रम्हपद पावू शकतो, असे त्यांना सुचवावयाचे आहे. मी पापी आहे, अनंत अपराधी आहे, देवा, तूच मला तार, अशा भूमिकेवरून काढलेल्या उद्गारांचा ज्ञानदेवांच्या समग्र वाङमयात पूर्ण अभाव आहे. श्री चक्रधर व नामदेव यांची भूमिका अगदी निराळी आहे. मी पापी

आहे, माझ्या हातून असंख्य अपराध घडलेले आहेत, 'अंगुष्ठापासोनी मस्तकापर्यंत मी अखंड दुश्चित्त आचरलो आहे,' मी पामर आहे–अशा स्थितीत मी माझ्या बळावर तरून जाणे अशक्य आहे; तेव्हा हे देवा, तूच मला तार, अशी आतंतेची हाक नामदेवांच्या अभंगवाङ्मयातून उमटलेली आहे. श्री चक्रधरांनी आपल्या भक्तांना जो उपदेश केलेला आहे त्याला या भूमिकेचाच आधार आहे मनुष्य स्वतःच्या बळावर मुक्त होऊ शकत नाही, त्यासाठी ईश्वरी कृपा अपरिहार्यपणे आवश्यक आहे असे त्यांनी स्पष्टपणे सांगितलेले आहे. या बाबतीतील त्यांचे मार्गदर्शन निस्संदिग्ध आहे, " सृष्टीमध्ये कव्हणें करणे मुचिजेना एकें परमेश्वरें वीण; " आणि खरोखरच मनुष्य आपल्या कर्तृत्वाच्या सहाय्याने, केवळ आपल्या सामर्थ्यावर अवलंबून मुक्त होऊ शकतो ? जन्मोजन्मीच्या अगणित संस्कारातून तो केवळ आपल्या हिंमतीवर आपली सुटका करून घेऊ शकतो ! माणसाला वाटते, हे माझे कर्तृत्व आहे, हे मी निर्माण केलेले आहे, हे माझ्या बुद्धीचे वैभव आहे; पण वस्तुस्थिती तर निराळी आहे. गवताच्या पानाच्या इवल्याशा हालचालीपासून तो विश्वातील प्रचंड हालचालींपर्यंतचे जे सगळे कांही घडताना दिसत आहे— त्यात माणसाचेही कर्तृत्व अर्थात् आलेच– ती सगळी ईश्वराची लीला आहे. गांधीजींनी म्हटल्याप्रमाणे आपण नाहीच, तोच आहे. त्याचे गुणगान करणे व आपल्या स्वतंत्र इच्छाशक्तीचा मूर्खपणाने वडेजाव न करता त्याच्या इच्छेप्रमाणे वागणे एवढेच आपले कर्तव्य आहे, एवढेच आपल्या हातात आहे. त्याच्या मर्जीप्रमाणे वागावे म्हणजे आपले जीवन आपोआप निश्चित होऊन जाते असे त्यांनी सांगितले आहे. " We are not. He alone is. And if we will be, we must eternally sing His praise and do His will. Let us dance to the tune of his bansilute and all would be well. ही भक्ताची भूमिका आहे, ईश्वरप्रीतीची भूमिका आहे. हीच भूमिका श्री चक्रधरांनी मांडलेल्या विचारात आहे, नामदेवांच्या अभंगात आहे. ज्ञानदेव हे मुख्यतः आत्ममार्गी, योग–मार्गी आहेत; श्री चक्रधर व नामदेव हे भक्तिमार्गी आहेत. असे असूनही, खेदाची व आश्चर्याची गोष्ट ही की आमच्या वारकरी पंथियांनी श्री चक्रधरांचा, त्यांच्या अनुयायांचा पदोपदी अपमान केलेला आहे, त्यांना निष्ठुरतेने दूर लोटलेले आहे ! असो.

श्री चक्रधर, नामदेव व ज्ञानदेव यांच्यासंबंधी मी हा जो मजकूर लिहिलेला आहे त्यामागे दोन हेतू आहेत एक हेतू असा की डॉ. कोलते यांनी या व्यक्तित्रयीवर जे लिहिले आहे ते पटण्यास माझ्या मजकुराचा थोडाफार हातभार लागावा. हातभार वाटण्याइतका तो महत्त्वाचा ठरेल अशी अपेक्षा आहे. दुसरा हेतू या हेतूशीच निगडीत आहे. तो हा की श्री चक्रधर, नामदेव व ज्ञानदेव यांचे, त्यांच्या पारमार्थिक व सामाजिक कर्तृत्वाचे न्याय्य मूल्यमापन होण्यास चालना मिळावी असे जे डॉ. कोलते यांच्या लेखांतून सुचविण्यात आले आहे त्याला माझ्या मजकुरामुळे अनुमोदन मिळावे, हे अनुमोदन प्रभावी उतरले आहे असे मी समजू काय ?

भक्ती, नीती आणि समाजरचनापद्धती

प्रस्तुत लेखसंग्रहातील लेखांना, प्रस्तावनेच्या झारीतून पूरक विवेचनाचे पाणी देत असतांना तुकाराम व रामदास यांच्यावरील लेख तसेच राहून गेले श्री चक्रधर नामदेव व ज्ञानदेव या यादवकालीन विभूतींवरील लेखांतून मांडलेल्या विचारांना पुष्टी देऊन त्यांचे स्वागत केले. त्याचप्रमाणे त्याच काळात जन्मास येऊन बहरास आलेल्या महानुभाव पथावरील लेखाशी, विवेचनाच्या ओघात, धावते हस्तांदोलन करून, त्याचे अभिवादन केले. तुकाराम आणि रामदास या शिवकालीन संत श्रेष्ठांवरील लेखही तितकेच तोलाचे आणि दर्जेदार आहेत. तुकारामांवरचा लेख तर तीट लावून दृष्ट काढण्याइतका नीटनेटका उतरलेला आहे. त्यात सगळे काही आहे. तो सर्वस्पर्शी आहे. तुकारामांचे चरित्र, त्यांचे कवित्व, त्यांच्या कवित्वाला आणि संतत्वालाही उच्चवर्णियांकडून झालेला विरोध, त्यांची ईश्वरमर्जीविषयक दृष्टी - या तुकारामांच्या व्यक्तित्वाच्या जवळ जवळ सर्वच पैलूंचा थोडक्यात पण मुख्य मुद्यांची यथाप्रमाण आव राखणारा विचार त्यात येऊन गेलेला आहे. अतिसंक्षिप्त तुकाराम व्यक्तित्वदर्शन–असे या लेखाचे वर्णन करणे शक्य आहे. एखाद्या सुखवस्तू स्थितीतील तरुणाच्या नवपरिणीत वधूने चार स्वच्छ, सुंदर खोल्यांतील आपला नेटका संसार, मोजक्या प्रमाणात सर्व आवश्यक वस्तूंचा संग्रह जमवून, वेधक

व्यवस्थितपणाने थाटावा, तसा थाट या लेखात उतर-लेला आहे. या संसारात आणखी एखाद-दुसऱ्या वस्तूची भर टाकली तर त्याची शोभा वाढण्यासारखी आहे. संतांच्या कर्तृत्वाचा मुख्य आधार कोणता--धर्म की, परमार्थ ? समाजाची नैतिक उन्नती की व्यक्तिगत ईश्वरप्राप्ती ? नीती ही धर्मातील प्राणशक्ती. धर्म ही सामाजिक पातळीवरची वस्तू लौकिकार्थी–मनाच्या कक्षेत वावरणारी.

द्वंद्वात्मक परमार्थ, अध्यात्म ही आगळी ईश्वरानुभूतीची सृष्टी. उन्मनीत गवसणारी. द्वंद्वातीत, अलौकिक. पहि-लीत चांगली गती मिळाली की दुसरीत आपोआप प्रवेश मिळेलच असे नाही. आचरणात नैतिक शुद्धतेचा आदर्श गाठला म्हणजे ईश्वर मिळाला असे म्हणता येत नाही. म्हणून तर राधाकृष्णन् यानी स्पष्टच सांगून टाकले आहे की The spiritual is not an extention of the ethical; it is a new dimention altogether, dealing with things eternal. तुकारामांच्या अभं-गात दोन्ही प्रकारचे विचार आढळतात– समाजशुद्धीचे आणि ईश्वरभक्तीचे; पण त्यांत क्रम कोणता ठेवाव-याचा ही महत्त्वाची गोष्ट आहे. क्रम स्पष्ट आहे. आधी भक्ती, मग समाजशुद्धी. येथे लागलीच एक प्रश्न उत्पन्न होतो. भक्ती ही सर्व सामाजिक मूल्यांच्या, नियमनांच्या, संकेतांच्या पलीकडची वस्तू आहे. ती कालातीत आहे. या कालातीताची कालसापेक्ष अशा समाजजीवनाशी सांगड कशी घालायची ? भक्ती धुंदी आहे. धुंदी आणि शुद्धी यात मेळ कसा घालावयाचा ? तुकारामांनी हा मेळ घातलेला आहे काय ? कालातीत अशा भक्तितत्त्वाशी सुसंवादी अशा समाजरचनेचे चित्र त्यांनी रेखाटलेले आहे काय ? विषमतेवर आधारलेली जातिसंस्था ही भक्तितत्त्वाशी उघडच विसंगत. तुका-रामांनी तिच्यावर कोरडे ओढलेले आहेत. क्वचित् तिचे समर्थनही केले आहे. असे का व्हावे ? वर्णधर्मावर आधारलेली समाजरचना मोडून टाकली तर दुसरी समुचित अशी पर्यायवाची समाजरचना सूचणाइतका समाजशास्त्रीय विचार त्या काळी प्रगत झालेला नव्हता असे समजावे काय ? वर्णधर्मजन्य विषमता अंगाला बोचते तर आहे, पण तिच्या जाचातून सामाजिक पातळीवर मुक्त कसे व्हावे हे समजत मात्र नाही, अशा समाजशास्त्रीय अगतिकतेत तत्कालिन बहुजनसमाजा-तील भक्तजनवर्ग सापडलेला असावा काय ? पुन्हा, भक्ती हे समाजशास्त्रीय विचाराचे नियामक तत्त्व होऊ शकते काय ? असे अनेक विचारप्रेरक प्रश्न डॉ. कोलते यांच्या तुकारामावरील लेखातून उत्पन्न होतात, ही गोष्ट अप्रत्यक्षपणे त्या लेखाच्या सामर्थ्याची द्योतक नाही काय ?

सामर्थ्य शुद्धीत नाही, धुंदीत आहे

डॉ. कोलते यांनी दासबोधाची भाषिक पाहणी केलेली आहे. त्यांनी दासबोधाची सामाजिक आणि पारमार्थिक पाहणी केली असती तर तुकाराम आणि रामदास यांच्या समाजदृष्टीतील, त्यांच्या अध्यात्म-दृष्टीतील विचारांची तुलना करण्याचा आनंद लुटता आला असता, हे उघड आहे. त्यांची भाषिक पाहणीही एका दृष्टीने उद्‌बोधक ठरलेली आहे. शब्दांची संस्कृत रूपे हीच शुद्ध आणि प्रमाणभूत, असे मानून दासबोधात अनेक शब्दांची रूपे ही कशी असंस्कृत आणि भ्रष्ट झालेली आहेत हे डॉ. कोलते यांनी भरपूर उदाहरणे देऊन, विस्तारपूर्वक दाखविलेले आहे. दासबोधाच्या भाषेतील सुबोधतेचा गुण डॉ. कोलते यांनी मान्य केलेला आहे, पण तिला लागलेले असंस्कृततेचे गालबोट त्यांनी प्रयत्नपूर्वक निदर्शनास आणून दिलेले आहे. येथे पुन्हा प्रश्न असा की एवढी असंस्कृतता असूनही एका संप्रदायाचे प्रवर्तन करण्याचे आणि संप्रदायाबाहेरीलही असंख्य मराठी-भाषी भक्तांना मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य दासबोधाच्या अंगी कसे आलेले आहे ? उत्तर एकच. सामर्थ्य शुद्धीत नाही धुंदीत आहे. शुद्धीत सामर्थ्य असते तर केवळ व्याकरणशुद्ध लेखनात कवित्व-गुण आपोआप झळकायला लागले असते; पण तसे होत नाही. उलट, ज्याच्या अंगी श्रेष्ठ कवित्वगुण अस-तात त्यांना व्याकरणीय शुद्धतेचे ज्ञान असतेच असे नाही. लेखनातली शुद्धी आणि प्रतिभेतील धुंदी या दोन भिन्न, परस्परावलंबी नसलेल्या अशा गोष्टी आहेत. म्हणूनच तर व्याकरणशुद्ध लिहायला शिकून कोणाला ललितलेखक होता येत नाही; आणि वृत्त– जातिरचनेचे पाठ घोकून कोणाला कवी होता येत नाही हे लक्षात घेतले म्हणजे दासबोधातील भाषेच्या अशुद्धतेचे, असंस्कृततेचे मलिनत्व आणि अपकर्षकत्व नाहीसे होऊन जात नाही काय ? दासबोध हा विशिष्ट विचारांच्या धुंदीतून स्फुरलेला ग्रंथ आहे. त्या धुंदीच्या प्रवाहात त्यातील भाषेची अशुद्धता ही एक प्रकारे गुणस्वरूपच

झालेली नाही काय ? दासबोधातील भाषा ही अशुद्ध, असंस्कृत असूनही ती अर्थवाहक आहे, अंतःकरणाला जाऊन मिडणारी आहे व प्रत्ययोत्पादक आहे' असा जो निष्कर्ष डॉ. कोलते यांनी काढलेला आहे तो असंस्कृततेच्या दोषाचें दोषरूपत्व बरेचसे हिरावून घेणार नाही काय ?

छोटयाला प्रतिष्ठा आणि मोठयाला समाधान

दासबोधाच्या भाषेतील दोषरूपतेबद्दल मी जे लिहिलेले आहे तेच मी माझ्या या प्रस्तावनेसंबंधी म्हणू शकतो काय ? डॉ. कोलते यांच्या या लेखसंग्रहातील गुणवत्तेच्या प्रवाहाच्या पावन सान्निध्यात आल्यामुळे माझ्या प्रस्तावनेतील दोषांमधील दोषरूपत्व निघून जाईल अशी आशा मी बाळगू नयें काय ? समारोपादाखल मी एवढेच म्हणेन की माझ्या प्रस्तावनेतील मजकुराला डॉ. कोलते यांच्या या संग्रहातील लेखांच्या सहवासात नेहमीच राहण्याचे भाग्य लाभलेले आहे. छोटयाला मोठयाची सोबत मिळणार आहे. यात छोटयाची प्रतिष्ठा निश्चित वाढणार आहे. पण मोठयालाही, आपणास समाधानकारक सोबत मिळाली असे वाटेल, असा विश्वास मी बाळगून आहे

हिब्रू भाषेचे पुनरुज्जीवन .. .. [पान ११४ वरून]

आपल्या भाषा अधिक जोमदार व समृद्ध बनतील. या दृष्टीने हिब्रूच्या पुनरुज्जीवनाप्रमाणेच संस्कृतच्या पुनरुज्जीवनाची मोहीम उभारणे फार महत्त्वाचे आहे. मात्र त्यासाठी एक गोष्ट झाली पाहिजे. प्राचीन संस्कृत भाषा ही आज बोलभाषा नाही व ती बोलभाषा म्हणून शिकविली जात नाही. त्यामुळे तिला प्रवाही भाषेचे स्वरूप येत नाही व तिच्यात नवी भर पडत नाही. संस्कृतच्या प्रसाराच्या दृष्टीने हे आवश्यक आहे. टेबल, रेडिओ, रेफ्रिजरेटर, स्कूटर, मोटार, पंप वगैरे शब्द मराठीत समाविष्ट झाले तसेच अनेक मराठी, हिंदी, इंग्रजी शब्द घेऊन दैनंदिन व्यवहाराला उपयुक्त अशी नवी संस्कृत भाषा समोर अवतरली तर तिचे आकर्षण वाढेल, तिच्यात संभाषण व लेखनही सुलभ होईल. मग संस्कृत राज्यभाषा न झाली तरी निदान त्या भाषेचे पुनरुज्जीवन होणे शक्य होईल.

हिब्रू भाषेच्या पुनरुज्जीवनाची उद्‌बोध कथा व महती ही अशी आहे.

[वरील लेखातील हिब्रू भाषेच्या पुनरुज्जीवनासंबंधीची माहिती जेरुसलेम येथील हिब्रू विद्यापीठातील हिब्रू भाषेचे प्राध्यापक डॉ. चाइम राबिन यांच्या Revival of Hebrew या लेखावरून घेतली आहे. डॉ. राबिन यांचा लेख Israel Today या मालिकेत पाचव्या क्रमांकाच्या पुस्तिकेच्या रूपाने प्रसिद्ध झाला आहे.]

श्रीधराचा रसविचार

सौ. उमा देशमुख

श्रीधर हा मराठीतील अत्यंत लोकप्रिय कथाकवी आहे. त्याने आपल्या विविध ग्रंथांतून काव्यविषयक आणि 'साहित्य'विषयक अनेक विचार मांडलेले आहेत. श्रीधराचा रसविषयक असा काही दृष्टिकोन आहे किंवा काय याचा विचार या ठिकाणी करावयाचा आहे.

रसाचे कवितेतील स्थान

'पांडव प्रतापा'त श्रीधर म्हणतो-

कविता रसिक आणि साहित्य परम
श्रोता प्रज्ञावंत आणि सप्रेम।
सुपंथ आणि सुसमागम
पूर्वपुण्यें पाविजे ॥

पां. प्र. ४ : ८१.

कविता रसाळ असून तीत श्रेष्ठ साहित्य आहे; श्रोता बुद्धिमान असून प्रेमळ आहे; एखादा पंथ चांगला असून त्याला चांगला अनुयायी मिळाला तर काय उत्कर्ष वर्णन करावा ? हे सर्व पूर्वपुण्याईने प्राप्त होते. या ठिकाणी कविता रसाळ असून तीत श्रेष्ठ साहित्य आहे; असे म्हटले आहे. म्हणजे कवितेत रस असणे हे मूलतः आवश्यक आहे असे त्याचे मत व्यक्त होते. कारण कविता मुळातच रसाळ असने म्हणजे तिच्यात हा रस असलाच पाहिजे, याविषयी श्रीधर निश्चित दिसतो.

रसाचे स्वरूप

मूळ भारताचा सारांश सांगत असता चतुर श्रोत्यांनी अर्थ ग्रहण कसा करावा हे स्पष्ट करताना श्रीधर म्हणतो-

बहुत बोलतां वाढेल ग्रंथ
ध्वनित बोलता न कळे अर्थ।
पाल्हाळ संकोच टाकून परिमित
रस सुरस वर्णिला ॥

पां. प्र. ३६ : ९.

मी हा ग्रंथ जर विस्ताराने सांगितला तर तो फार मोठा होईल. उलटपक्षी मी जर ध्वन्यर्थयुक्त भाषेने बोललो तर श्रोत्यांना अर्थ कळणार नाही. म्हणून अतिविस्तार किंवा अतिसंक्षेप टाळून मोजक्या शब्दांत यातील रसाची गोडी वर्णन केली आहे.

यावरून श्रीधराच्या मते पाल्हाळ आणि संकोच यांच्यामधील नेमकेपणा, नेटकेपणा, किंबहुना औचित्य हे रसाला आवश्यक आहे असे दिसते.

दृष्टान्त : रसाचा एक घटक

श्रीधराच्या मते काव्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे दृष्टान्त होय. - केवळ काव्यालाच नव्हे तर रसनिर्मितीलाही दृष्टान्तांची आवश्यकता आहे असे त्याचे मत दिसते.

अमृताहून गोड अन्न
परी रुचि नये शाकेविण।
दृष्टान्ताविण ग्रंथ संपूर्ण
रसीं न चढे सर्वथा ॥

रा. वि. ३ : ६.

श्रीधराच्या दृष्टीने अन्न कितीही गोड असले तरी त्याची चव घेण्यासाठी शाकेची म्हणजे व्यंजनाची अत्यंत आवश्यकता असते त्याप्रमाणे काव्य हे कितीही परिपूर्ण असले तरी त्यातील रसाचा उत्कर्ष साधण्यासाठी दृष्टान्त हे अपरिहार्य आहेत. या ओवीत श्रीधराने काव्य आणि रस यांचे समीकरण गृहीत धरले आहे. अर्थात दृष्टान्त हा काव्याचा एक आवश्यक व महत्त्वाचा घटक आहे. कारण-

कीं मननाविण श्रवण
कीं सद्भावाविण कीर्तन।
कीं क्षेत्र जैसें बीजाविण
दृष्टान्ताविण ग्रंथ तैसा ॥

रा. वि. ३ : ९.

–त्याचप्रमाणे दृष्टान्तावाचून ग्रंथ अर्थात काव्य हे रसाप्रत पोहचू शकणार नाही, असे श्रीधराचे मत या ठिकाणी व्यक्त होते.

रसनिर्मितीमागील प्रेरणा

श्रीधराच्या दृष्टीने त्याच्या काव्यातील रसनिर्मिती मागील प्रेरणा कोणत्या हे आता पाहू.

बीजेपासून चढत्या कळा
तों तों चकोरासीं अधिक सोहळा।
तैसी येथें रघुनाथ लीला
चढेल आगळा रस पुढें।

रा. वि. १ : ३७.

शुद्ध पक्षातील द्वितीयेपासून जसजशा चंद्राच्या कला वाढू लागतात तसतसा चकोर पक्ष्याला अधिकाधिक आनंद होत जातो. त्याप्रमाणे जसजशा श्रीरामाच्या चरित्रातील लीला वर्णन कराव्या तसतसा रस अधिकाधिक परिपुष्ट होईल.

'पांडवप्रतापा'तील वनपर्वाच्या प्रारंभी श्रीधर म्हणतो एकदा पांडुरंगनगरीत मी ग्रंथलेखन थांबवून झोपलो असताना एक चमत्कार झाला. पांडुरंगाने स्वतः येऊन भारतलेखनाची मला 'प्रेरणा दिली' व तो म्हणाला–

म्हणे तूं जे जे बोलसी बोल
तेथें रस मी पुरवीन सबल।
हा ग्रंथ हृदयीं धरतील सकळ
भक्त संत पंडित जे ॥

पां. प्र. २९ : १२.

तू जे जे शब्द वापरशील त्या ठिकाणी मी रसाचे सामर्थ्य ओतेन आणि भक्त, संत आणि पंडित या सर्वांना तुझा ग्रंथ हृद्य वाटेल.

या दोन उद्गारांवरून श्रीधराच्या मते रसाच्या मुळाशी असणारी प्रेरणा म्हणजे साक्षात परमेश्वर आणि त्याच्या लीला होत. ही एक प्रेरणा झाली. आता दुसरी प्रेरणा कोणती आहे ते पाहू.

'रामविजया'च्या पाचव्या अध्यायाच्या प्रारंभी श्रीधर म्हणतो–

जों जों श्रोते कथेसी सादर
तों तों रस चढे अपार।
जैसा पुष्करीं देखतां रोहिणीवर
चंद्रकांता पाझर सुटे ॥

पां. प्र. ५ : ५.

आकाशात चंद्र दिसताच चंद्रकांतमण्याला पाझर फुटतो त्याप्रमाणे जसजसे श्रोते कथेकडे अवधान देतील तसतसा कथेतील अपरंपार रसाचा उत्कर्ष होईल. अर्थात चंद्रकांतमण्याला पाझर फुटण्यासाठी ज्याप्रमाणे चंद्रबिंबाचे दर्शन आवश्यक आहे त्याप्रमाणे काव्यातील रसोत्कर्षासाठी सादर श्रोत्यांची प्रेरणा आवश्यक आहे.

श्रोता भेटलिया चतुर
ग्रंथरस वाढे अपार।
जेवीं वीर संघटना थोर
रणचक्रीं रंग भरे ॥

रा. वि. १२ : १०.

थोर पण सारख्या सामर्थ्याचे योद्धे समोरासमोर लढण्यासाठी येतात त्यावेळी युद्धाला रंगत चढते. त्याप्रमाणे चतुर श्रोता लाभला म्हणजे ग्रंथातील रस अमर्यादपणाने वाढतो.

या दोन्ही ठिकाणी श्रीधराच्या मते सादर आणि चतुर श्रोते लाभणे ही ग्रंथातील रसोत्कर्षाची प्रेरणा होय.

रसप्रतीतीमधील विघ्न : मतिमंद श्रोता

श्रोता चतुर आणि सादर असला तर रसाची चढावणी होते. परंतु श्रोता तसा नसला तर ? –

कवित्व-सागरींचीं रत्नें दृष्टांत
त्यांचे परीक्षक ज्ञाते पंडित।
मतिमंद कुटिल निश्चित
त्यांस परीक्षा न कळे हे ॥

रा. वि ५ : १०.

काव्यरूपी सागरातील रत्ने म्हणजे दृष्टान्त होत त्यांचे परीक्षक हे जाणते आणि विद्वान हवेत. ते जर मंद आणि कुटिल वृत्तीचे असतील तर त्यांना ग्रंथाची पारख होणार नाही. इतकेच काय पण श्रीधराच्या मताप्रमाणे–

मतिमंद बैसतां श्रोता श्रवणीं
तरी ग्रंथरस जाय वितळोनी।
जैसें भस्मामाजीं नेउनी
व्यर्थ अवदान घालिजे ॥

रा. वि. १२ : ३.

एखादा मंदबुद्धीचा श्रोता काव्याचे श्रवण करू लागला तर त्यातील रस हा नाहीसा होईल. अग्नीत

आहुती घालण्याऐवजी जर ती राखेत टाकली तर ती जशी व्यर्थ जाते त्याप्रमाणे मतिमंद श्रोता हा रस प्रतीतीत विघ्न निर्माण करतो. अशा श्रोत्यांचे अवधान वाया जाते. या ठिकाणी श्रीधराने अवदान (आहुती) म्हणजे जणू काही अवधान (लक्ष) असा श्लेष केला आहे की काय, असा भास होतो. श्रीधराच्या मते काव्याकडे यथायोग्य अवधान न देणारे आणि कुटिल म्हणजे दुश्चित्त असे श्रोते म्हणजे ग्रंथरसाच्या आस्वादात येणारे विघ्न होय.

रससंख्या आणि भक्ती

श्रीधराच्या मते रसांची संख्या किती आहे ते बघावे लागेल–

ज्यास ज्या रसाची प्रीति
ते ते दावून उद्धरी श्रीपति।
नवरस लीला नवविध भक्ती
दावी यदुपति तारावया ॥

ह. वि. १७ : ७३

भक्त मुमक्षु साधक संत
ते ही येथें निवती समस्त।
नवरसीं भरला ग्रंथ
पाहोनी पंडित सर्वदा ॥

रा. वि. ६४ : १७३

म्हणे मी आहे पाठीशीं
पांडवप्रताप ग्रंथराशीं।
वद साहित्य – दृष्टान्तेंशीं
नवरसीं सुरस जो

॥ पां. प्र १ : ११

यावरून ' नऊ ' ही रससंख्या श्रीधराने निश्चित केलेली आहे. वरील 'हरिविजया'तील ओवीत त्याने स्पष्टच म्हटले आहे की, ज्याला ज्या रसाविषयी आवड असेल ते ते रस प्रगट करून श्रीपती हा आपल्या भक्तांचा उद्धार करतो–व अशा रीतीने श्रीकृष्ण हा भक्तांचा उद्धार करण्यासाठी नवरसांची लीला दाखवून त्यांना त्या द्वारा नवविधाभक्तीचा मार्ग दाखवितो.

भक्तांच्या ठिकाणी नऊ प्रकारची भक्ती असल्यास त्यांना ईश्वराच्या ठिकाणी नवरसांच्या लीला दिसू शकतात. श्रीधराने नवविधा भक्ती आणि नवरस यांचा येथे काहीसा अन्वय लावल्यासारखा दिसतो.

श्रीधराचे हे विचार एकनाथांच्या पुढील ओवीशी ताडून पाहण्यासारखे आहेत–

भक्ति-सरोवरीं निर्मळ
नव–विधरसें रसिक जळ।
तेथे तुझें चरण–कमळ
विकसत केवळ भावार्थ–सूर्यें॥

एकनाथी भागवत २९ : ५७

(भक्तिरूपी सरोवरात नऊ प्रकारच्या रसांनी भरलेले स्वच्छ पाणी असून त्यात तुझे चरण-कमळ भावार्थ-रूपी सूर्यामुळे विकास पावत आहेत).

श्रीधरानंतर महीपतीनेही नवरस आणि नवविधा-भक्ती याचा अत्यंत मनोहर असा संबंध जोडलेला आहे. तोही या ठिकाणी लक्षात घेण्यासारखा आहे–

नवलक्ष पताका स्वर्गींहूनी
उतरल्या जैशा सौदामिनी।
कीर्तनरंगीं येऊनी
उभ्या ठाकल्या अकस्मात॥
त्या नवलक्ष ध्वजा नव्हेति केवळ
नवविधा भक्तीचें उतरलें फळ।
कीं नवरसची होऊनि प्रांजळ
आले तत्काळ कीर्तनीं॥

भक्तविजय १२ : १४९, १५०.

नवरसांपैकी श्रीधराने दोन रसांचा उल्लेख केलेला दिसतो–

नवरसांचे भांडार
रणशूर आणि नृपवर।
त्यात वीररस अपार
असंभाव्य येथें असे॥

पां. प्र. १५ : १०

येथे वीररसाचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे. तसेच

अन्तरीं निग्रह करून
शांति–रसें भरलें पूर्ण।।
आत्मस्तुती मनांतून
स्वप्नीं जयासी नावडे॥

रा. वि. २ : ६.

या ठिकाणी राम-उपासक जे संत त्यांची लक्षणे वर्णन करीत असताना श्रीधराने मनामध्ये निग्रह करून शांतरसाने परिपूर्ण भरलेले असे जे भक्त त्यांचे लक्षण सांगितलेले आहे. 'शांतरस' असा स्पष्ट उल्लेख येथे येतो.

'हरिविजया'च्या दुसऱ्या अध्यायाच्या शेवटी संत-श्रोत्यांचे वंदन करीत असता श्रीधर म्हणतो–

ब्रम्हानंद कृपेच्या बळें।
हें ग्रंथजहाज चाले।
भक्तीचें शीड वर लाविलें
दयावातें फडकतसे ॥

ह. वि. २ : २०५

गुरुकृपेच्या सामर्थ्यामुळे या ग्रंथरूपी जहाजाला गती मिळत असून त्यावर भक्तीचे शीड लावले आहे आणि ते ईश्वरी कृपेच्या वाऱ्याने फडकत आहे. श्रीधराच्या मते ग्रंथाला जहाज म्हटल्यास भक्तीला त्याचे शीड कल्पावे लागते. अर्थात काव्याचे सर्वस्व म्हणजे भक्ती होय.

परीक्षा समिती : वि. सा. संघ

केंद्राधिकाऱ्यांना सूचना व विनंती

१) विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणाऱ्या मराठी भाषा आणि वाङमयाच्या परीक्षांविषयी पुढील माहिती कळविण्यात येत आहे.

उद्देश :– मराठी भाषा आणि वाङमय या विचाराची गोडी वाढविण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील अ-मराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रचार करण्याकरिता अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

फेब्रुवारी १९६८ पासून परिक्षा समितीने अभ्यासक्रमात आवश्यक बदल केला असून विदर्भ माध्यमिक शिक्षण मंडळ आणि नागपूर विद्यापीठ यांच्या विद्यमाने होणाऱ्या सर्व परिक्षांशी मराठी विषयापुरता वि. सा. संघ परीक्षा समितीने नेमलेला अभ्यासक्रम शक्यतो समरूप व समकक्ष ठेवला आहे.

२) आपण केन्द्र उघडण्याची इच्छा दर्शविल्यास आपणाकडे अभ्यासक्रम पाठविण्यात येईल. अ-मराठी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी आपण आपल्या दृष्टीने करावी, अशी अपेक्षा आहे.

३) आगामी आक्टोबर १९६८ सत्राची परीक्षा शनिवार दि. ५-१०-६८ आणि रविवार दिनांक ६-१०-६८ ला घेण्यात येईल.

४) नवीन केंद्र सुरू करण्यासाठी कमीत कमी २५ विद्यार्थी परीक्षेत बसविले तर केंद्राला मान्यता देण्यात येते असा समितीचा परिपाठ आहे. परिक्षार्थी आवेदनपत्र मूल्य २५ पैसे प्रमाणे केन्द्रातच अवांतर खर्चासाठी राखून ठेवावे. केवळ परिक्षार्थ्यांचेच निर्धारित शुल्क केन्द्रीय कार्यालयाकडे पाठवावे.

आपण आपल्या केन्द्रातून दिनांक १० सप्टेंबर ६८ पर्यंत परीक्षार्थी आवेदनपत्रे सशुल्क भरून घेऊन केन्द्रीय कार्यालयाकडे दिनांक १५ सप्टेंबर ६८ चे आत पाठविण्याची दखल घ्यावी, तदनंतर आलेली आवेदनपत्रे स्वीकृत करण्यात येणार नाहीत.

प्रत्येक सत्रात जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसवून आम्हास सहकार्य देऊन उपकृत करावे.

ग. स. देशपांडे
संचालक, परीक्षा समिती

ग्रंथपरिचय

चंद्रकांत कुळकर्णी

मैफल

(संकलक–हरिभाऊ मोटे)

संगीत रसिकांचे बादशहा असे ज्यांचे वर्णन केलें जाते त्या स्व. रामूभय्या दाते यांच्या प्रथम पुण्यतिथी-निमित्त त्यांच्या मैफलीतील स्वरवेड्या मित्रांनी व साहित्यिकांनी लेखरूपांनी वाहिलेली श्रद्धांजली 'मैफल' मध्ये संकलित करण्यात आली आहे. मैफलीत आहेत पु. ल. देशपांडे, प्र. के. अत्रे, कुमार गंधर्व, विद्याधर गोखले, व. प्र. काणे, ए. कृ. फडके, विठ्ठलराव घाटे, ग. रा. खेडकर इ. मान्यवर व्यक्ती.

इतर लेखांबरोबरच रामूभय्यांच्या अर्धवट राहिलेल्या 'रंगपंचमी' नांवाच्या आत्मचरित्राचा कांही भाग 'मैफल' मध्ये संकलित करण्यात आला आहे.

माधव ज्यूलियन

(चरित्रकार–गं दे. खानोलकर, पॉप्युलर प्रकाशन)

मराठीतील श्रेष्ठ दर्जाचे व उत्कट भावनांचा अविष्कार करणारे कवी म्हणून माधवराव पटवर्धनांना मराठी साहित्यप्रेमी ओळखतात. गं. दे. खानोलकरांनी १९५१ साली त्यांचे चरित्र लिहिले होते. प्रस्तुत चरित्र केवळ नवीन आवृत्ति नसून पुनर्लेखन आहे. माधवराव पटवर्धनांच्या अनेक कविता व लेखनामागील भूमिका व परिस्थिती यांत साधार व विस्तृतपणे दिली असल्याने काव्याच्या अभ्यासकांना अत्यंत उपयोगी असा संदर्भ ग्रंथ.

भारतीय काव्यशास्त्राचे मूळ प्रश्न

(लेखक–डॉ. नगेंद्र, अनुवाद–सौ. शैलजा करंदीकर)

हिंदी भाषेतील विख्यात साहित्यशास्त्रज्ञ डॉ. नगेंद्र यांच्या 'भारतीय काव्यशास्त्र की भूमिका' आणि 'रससिद्धांत' या ग्रंथांतील महत्वाच्या मूलभूत स्वरूपाच्या विवेचनाचा सौ. शैलजा करंदीकर यांनी केलेला हा अनुवाद आहे. डॉ. नगेंद्रांनी रसविषयक व रीतिविषयक पौर्वात्य आणि त्यांतहि हिंदी, मराठी, बंगाली साहित्यिकांची मते आणि पाश्चात्य मते यांची कल्पना या ग्रंथांत एकत्ररीत्या दिली आहे. डॉ. नगेंद्र यांच्या मूळ ग्रंथात १९६५ मध्यें हिंदीतील सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणून साहित्य अकादामीचे पारितोषक तसेच हिंदी समितीचे सर्वोच्च अखिल भारतीय पारितोषक मिळाले आहे.

लोकहितवादीकृत निबंधसंग्रह

(संपादक–डॉ. अनंत काकबा प्रियोळकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई)

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या वैचारिक इतिहासातील महत्वाचा दुवा असे ज्याचे वर्णन केले जाते ते गोपाळ हरि देशमुख उर्फ लोकहितवादी यांच्या 'शतपत्रांचा' व इतर लेखांचा हा संग्रह. 'शतपत्रे' प्रसिद्ध होऊन आता शंभर वर्षे लोटली पण अजूनहि ही 'शतपत्रे' व लेख ताजे वाटतात. आज या पुनर्मुद्रित आवृत्तीमधून प्रतीत होतो तो लोकहितवादींचा द्रष्टेपणा व देशाच्या प्रगतीविषयीची त्यांची कळकळ. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध संशोधक डॉ. अ. का. प्रियोळकर यांनी हा निबंधसंग्रह संपादित केला असून त्यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना हे या पुस्तकाचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.

नमन नटवरा

(प्रकाशक–बालगंधर्व रंगमंदीर, पुणे महानगर पालिका.)

मराठी रंगभूमीच्या अनभिषिक्त सम्राटाला नमन करणारी 'भरजरी शालू' पेहरलेली ही स्मरणिका

अनुक्रमणिका

मराठी नाट्य रसिकांच्या स्मरणांत चिरंतन राहील. श्री. पु. ल. देशपांडे, आचार्य अत्रे, प्रा. वसंत बापट, प्रा. ना. सी. फडके, श्री. वसंत शांताराम देसाई यांचे गंधर्वासंबंधीचे लेख, बालगंधर्वांची दुर्मिळ छायाचित्रे, ही या स्मरणिकेची सकस वैशिष्ट्ये. सुंदरता, सुबकता व औचित्य यांचा विलोभनीय संगम या स्मरणिकेत आहे.

युगान्त

(लेखक–डॉ. इरावती कर्वे,
प्रकाशक–देशमुख आणि कंपनी, पुणे)

महाभारताची ही विलक्षण समीक्षा एका सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ विदुषीच्या लेखणीतून उतरली आहे. महाभारताचा गाभा असलेल्या मुख्य कथेतील प्रमुख व्यक्तींच्या जीवनावर भांडारकर इन्स्टिट्यूटच्या संशोधित आवृत्तीच्या आधारे या ग्रंथात लेखिकेने स्वच्छ प्रकाश टाकला आहे. महाभारताच्या वाचकांना वारंवार धक्का देऊन चकित करणारा व अनेक रूढ कल्पनांना आव्हान देणारा हा ग्रंथ.

जपून टाक पाऊल

(निवेदक–भालचंद्र पेंढारकर
लेखक–व. पु. काळे)

साठ वर्षांची परंपरा असलेली महाराष्ट्रातील एक अग्रेसर नाट्यसंस्था 'ललित कलादर्श' हिचे विद्यमान चालक श्री. भालचंद्र पेंढारकर यांच्या 'जपून टाक पाऊल' या पुस्तकाने मराठीतील नाट्यविषयक साहित्यात मोलाची भर टाकली आहे. पेंढारकरांचे हे आत्मचरित्र नव्हे की 'ललितकलादर्श'चा इतिहासही नव्हे. भावी काळात नट होणाऱ्या आपल्या मुलाला, चि. ज्ञानेशला, सांगितलेले हे अनुभव आहेत. १९३७ ते १९६७ या काळात पेंढारकरांना नाट्यक्षेत्रात आलेल्या कडू–गोड अनुभवांचे हे परखड निवेदन आहे. या पुस्तकाचे निवेदक आहेत पेंढारकर आणि प्रत्यक्ष लेखक आहेत सुप्रसिद्ध कथाकार वसंत पुरुषोत्तम काळे.

आनंदी गोपाळ

(लेखक–श्री. ज. जोशी)

दुर्लक्षित अशा आगळ्या व्यक्तिरेखांचे मोठेपण पटवून देणारी कादंबरी. काही कादंबऱ्या त्यांचा लेखन-विषय फार मोठा असल्यामुळे श्रेष्ठ दर्जाच्या बनतात. तर काही वेळा वर्ण्यविषय सामान्य असून सुद्धा कादंबरीकाराच्या सामर्थ्यपूर्ण शैलीमुळे त्या कादंबऱ्यांना मोठेपण प्राप्त होते. पण कादंबरीच्या लेखनविषयाची महानता आणि लेखकाचे उत्कृष्ट लेखनगुण यांचा सुयोग घडून उत्कृष्ट ठरणाऱ्या कृती अपवादभूतच आढळतात. नुकत्याच प्रसिद्ध झालेली आणि टीकाकार व रसिक वाचक यांच्यात चर्चेचा विषय झाल्याने अल्पावधीतच लोकप्रिय झालेली श्री. श्री. ल. जोशी यांची 'आनंदी गोपाळ' ही कादंबरी अशीच अपवादात्मक समजण्यास हरकत नाही. महाराष्ट्रातच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानातील पहिली स्त्री डॉक्टर होण्याचा मान मिळविणारी आनंदीबाई आणि तिच्या या कर्तृत्वाला प्रेरणा व जिवापाड साहाय्य करणारे तिचे पती गोपाळराव जोशी यांच्या चरित्राचा पट या कादंबरीत उलगडून दाखविण्यात आला आहे. स्वामी, झेप, झुंज, यज्ञ, इ. उत्कृष्ट चरित्रात्मक कादंबऱ्यांच्या परंपरेत बसणारी कादंबरी असे या पुस्तकाचे वर्णन करता येईल.

अनुक्रमणिका

संघवार्ता
(सप्टेंबर १९६८)

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

भेट

गोवा प्रदेशाचे शिक्षणमंत्री श्री. गोपाळराव मयेकर यांनी दि. ३० जुलै रोजी सकाळी ९ वाजता वि. सा. संघाला भेट दिली.

यावेळी संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर आणि सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी श्री. मयेकर यांचे पुष्पहार घालून स्वागत केले. संस्थेची वास्तू व कार्य पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी आणि सभासद उपस्थित होते.

नाट्यवाचन

दि. २५ जुलै रोजी आनंद जोग व श्री. जयंत देवघर या दोघांनी केलेल्या 'अेनिमी ऑफ दि पीपल' या नाटकाचे रूपांतर रात्री ९ वा. वाचन झाले.
दि. १७ ऑगस्ट रोजी प्रा. कृ. अं. आचार्य यांनी लिहिलेल्या ' सम्राट रामगुप्त ' नाटकाचे सायं ८ वाजता वाचन झाले.
दि. २० ऑगस्ट रोजी श्री. प्रभाकर सिरास यांनी अल्बेर कामू यांनी लिहिलेल्या ' जस्ट असेसिन ' या नाटकाचे ' युद्धाचा प्रसंग ' या नावाने केलेल्या रूपांतराचे वाचन झाले.

सांस्कृतिक समिती–संगीत केंद्र

वि. सा. संघ सांस्कृतिक समिती अंतर्गत संगीत केन्द्राचा वार्षिकोत्सव शुक्रवार दि. १६–८–६८ रोजी रात्री ८–३० वाजता गडकरी सभागृहात साजरा करण्यात आला.
प्रथम चिटणीस श्री. वा. के अत्रे यांनी श्री शारदेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. नतर कलावंताचे पुष्पमाला घालून स्वागत केले.
सुरवातीला श्री. दामोदर देवघरे यांनी सारंगीवर राग बिहाग सादर केला.
यानंतर डॉ. बाळासाहेब पुरोहित यांचे गायन झाले. त्यांनी शुद्ध कल्याण व राग जोग गाऊन दाखविला.
सुप्रसिद्ध गायक श्री. राजाभाऊ कोकजे यांनी यावेळी पेटीची साथ केली. श्री. बायवार यांनी तबल्याची साथ केली. सर्वश्री चोरघडे व कशाळकर यांनी तंबोऱ्याची साथ केली. आभार प्रदर्शनानंतर हा वार्षिकोत्सवाचा कार्यक्रम संपला.

म. म. बाळशास्त्री हरदास यांच्या निधनानिमित्त शोकसभा

महाराष्ट्राचे थोर विचारवंत प्रगाढ पंडित आणि प्रसिद्ध वक्ते म. म. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांच्या दुःखद निधनानिमित्त दि. १३–८–६८ रोजी सायं. ६.३० वा. धनवटे रंगमंदिरात संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा आयोजित करण्यात आली.

अनुक्रमणिका

यावेळी प्रा. डॉ. श्री. भा. वर्णेकर, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, श्री. दि. ब. पंडित, पं. हृषिकेशजी शर्मा, डॉ. मा. गो. देशमुख आणि पुण्याचे श्री. रामभाऊ दाते व श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची भाषणे झाली.

यावेळी कै. म. म. बाळशास्त्री हरदास यांच्या छायाचित्राला संस्थेतर्फे हार अर्पण करण्यात आला.

आचार्य अत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त पुष्पहार अर्पण

आचार्य प्र. के. अत्रे यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त वि. सा. संघाचे चिटणीस श्री. वा. के. अत्रे यांनी मुंबई येथे वि. सा. संघातर्फे आचार्य अत्रे यांना पुष्पमाला व गुच्छ अर्पण करून दीर्घायुरारोग्य चिंतिले.

या प्रसंगी वि. सा. संघाचे माजी चिटणीस श्रीमंत म. ल. देशमुख उपस्थित होते.

शाखा वृत्त

वर्धा शाखा

वर्धा शाखा सभासदांची सर्वसाधारण सभा श्री. ब. पं. तांदळे यांचे अध्यक्षतेखाली दि. ११ ऑगस्ट ६८ रोजी होऊन इ. स. ६८–६९ करिता खालीलप्रमाणे पदाधिकारी निवडण्यात आले.

अध्यक्ष– प्रा. दे. गं. सोटे, उपाध्यक्ष– प्रा. कावळे, श्री. ब. पं. तांदळे,
कार्यवाह– श्री. प्र. बा. मंगरूळकर, सहकार्यवाह - श्री. पुरुषोत्तम चवडे, श्री. लक्ष्मणराव चुटके,
सदस्य– प्रा. वर्णेकर, प्रा. जगताप, कु. माधुरी घारपुरे, सौ. रजनी गर्गे, श्री. भय्याजी देशमुख, श्री. प्रभाकरराव बाळसराफ, प्रचारमंत्री- श्री. उमाशंकर शुक्ल.

यवतमाळ शाखा

यवतमाळ शाखा सभासदांची सभा १९ ऑगस्ट ६८ रोजी होऊन इ. स. ६८–६९ करिता खालील पदाधिकारी निवडण्यात आले.

अध्यक्ष– श्री. ब. ना. एकबोटे, उपाध्यक्ष– सौ. श्रीखंडे,
कार्यवाह– प्रा. दि. व्यं. जहागीरदार, सहकार्यवाह– प्रा. रमाकांत कोलते,
सदस्य– डॉ. पंडित, सौ. पंडित, ॲड. श्री. बर्वे, सौ. बर्वे, प्रा. देशपांडे, प्रा. ब्रम्हे, प्रा. बक्षी, प्रा. शरच्चंद्र टोंगो, श्री. द. बा. महाजन, श्री. सदुभाऊ पांडे व सौ. गोळे.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

कार्यवृत्त इ. स. १९६७-६८

एक एप्रिल १९६७ पासून सुरू झालेल्या नवीन वर्षात कार्यकारी मंडळाच्या ५ आणि सर्व साधारण सभासदांच्या २ सभा झाल्या.

यावर्षी, संस्थेचे एकूण १७५३ सदस्य नोंदले गेले. आजीव सभासद संख्या २४७ असून यामध्ये १२ उपकर्ते, ५ आश्रयदाते, २ सहाय्यक व ५ हितचिंतक सभासद होते.

वेगवेगळ्या समित्यांनी संबंधित वर्षातील कार्यक्रम व्यवस्थित पार पाडल्याबद्दल त्या त्या समित्यांच्या आमंत्रकांचे आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

सांस्कृतिक समितिद्वारे :—श्रीगणेश व्याख्यानमाला, कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला व इतर अन्य कार्यक्रम घेण्यात आले.

श्रीगणेश व्याख्यानमालेचे ८ वे पर्व ह्यावर्षी मीमांसातीर्थ पं. श्रीपाद शास्त्री किंजवडेकर यांनी गुंफले. दि. १५ एप्रिल ते १७ एप्रिलपर्यंत 'संतांच्या वाङ्मयाचा समाज आणि राष्ट्र यांच्यावर झालेला परिणाम,' 'संतवाङ्मयाने निर्माण केलेले आदर्श' आणि 'विज्ञानयुग आणि संतवाङ्मय' या विषयावर उद्बोधक व माहितीपूर्ण भाषणे झाली.

कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमालेत संस्कृत वाङ्मयाचे अभ्यासक प्रा. डॉ. श्री. भा. वर्णेकर यांनी दि. १९, २० आणि २१ जानेवारी ६८ रोजी 'वेदमूर्ती सातवळेकरांची वैदिक विचारधारा,' 'महाकवी कालिदासाची योगनिष्ठा' आणि 'भगवद्गीतेची काव्यात्मता' या विषयांवर व्याख्याने दिली.

अन्य कार्यक्रम

दि. २८ मे रोजी स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकर जयंतीनिमित्त प्रा. द. भि. कुळकर्णी यांचे 'सावरकरांची कविता' या विषयावर भाषण झाले.

दि. १५ जून रोजी 'संदेश'कार कै. अ. ब. कोल्हटकर स्मृतिदिनानिमित्त समाजसेवक श्री. मा. ज. कानेटकर यांचे भाषण झाले.

दि. १५ जून रोजी रात्रौ ९ वा. सुप्रसिद्ध गायक श्री. राजाभाऊ देव यांची कन्या कु. अलका देव यांचे सुश्राव्य गायन झाले.

दि. ८ जुलै रोजी 'महाकवी कालिदास स्मृतिदिना'निमित्त कवि श्री. ज्ञा. रा. साथू व श्री. मा. नी. गलगलीकर यांची व्याख्याने झाली.

दि. १५, १६ व १७ जुलै रोजी डॉ. सर्वांगानंद चैतन्य ऊर्फ पु. ह. सन्त यांची 'श्रीकृष्ण-द्वैपायन व्यासरचित आद्यसंशोधित गीता' याविषयावर भाषणे झाली.

दि. १ ऑगस्ट रोजी लो. टिळक पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी श्री. मा. नी. गलगलीकर यांचे भाषण झाले.

कवी 'बी' पुण्यतिथी

कवी 'बी' पुण्यतिथीनिमित्त दि. ३० ऑगस्ट रोजी प्रा. म. ना. लोही यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. श्रीधर शनवारे यांचे भाषण झाले.

कवी कै. अण्णाजी बोबडे स्मृतिदिन

कविवर्य कै. श्रीनिवास रामचंद्र ऊर्फ अण्णाजी बोबडे यांच्या ३३ व्या स्मृतिदिनानिमित्त दि. १ ऑक्टो. रोजी श्री. त्र्यं. खं. गंधे यांचे भाषण झाले.

कवी श्री. मामा रामभजनी स्मृतिदिन

कवी कै. गोविंद गोपाळ उर्फ मामा रामभजनी यांचा स्मृतिदिन ता. २८ डिसेंबर रोजी साजरा झाला. यावेळी प्रा. पां कृ. सावळापूरकर यांचे भाषण झाले.

दि. २९ डिसेंबर रोजी, आचार्य स. ज. भागवत यांचे 'नवजागरण आणि नवसाहित्य' या विषयावर भाषण झाले.

'स्वरमंडळ'

सांस्कृतिक समितीतर्फे संगीतविषयक कार्य करण्यासाठी 'स्वरमंडळ' सुरू करण्यात आले.

जन्माष्टमीच्या सुमुहूर्तावर म्हणजे दि. २८ ऑगस्ट रोजी 'स्वरमंडळा'ची स्थापना करण्यात आली.

यावेळी सौ. स्नेहलता सराफ आणि श्री. शरद सुतवणे यांचे सुश्राव्य गायन झाले. डॉ. बाबासाहेब देशपांडे यांनी तारशहनाईचा कार्यक्रम सादर केला.

दि. २१ सप्टेंबर रोजी श्री. प्रभाकर धारे यांचे व्हायोलिन वादन झाले. तबल्याची संगत श्री. प्रभाकर पिल्ले यांनी केली. यावेळी श्री. नारायणराव यांचा तबलावादनाचा कार्यक्रमही झाला.

स्वरमंडळातर्फे, नागपूर महाविद्यालयाचे संगीत विभाग-प्रमुख प्रा. प्र. नी. खर्डेनवीस यांचा सत्कार दि. १९ ऑक्टोबर रोजी रात्रौ ८-३० वाजता 'तरुण भारता'चे संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.

स्वरमंडळाचे संयोजक डॉ. बाबासाहेब पुरोहित यांनी प्रास्ताविक भाषण केले व प्रा. खर्डेनवीस यांना पुष्पहार घालून त्यांच्या संगीत विषयक कार्याचा गौरव करण्यात आला. नंतर श्री. रघुवीर राव यांचे बासरीवादन झाले.

दि. ४ फेब्रुवारी रोजी सकाळी १०-३० वा. सुप्रसिद्ध गायक डॉ. वसंतराव देशपांडे यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला.

अनुक्रमणिका

दि. १७ मार्च रोजी यु. एस्. आय्. एस्. तर्फे गडकरी सभागृहात लघुचित्रपट दाखविण्यात आले.

होलिकोत्सवानिमित्त कवि-संमेलन

सांस्कृतिक कार्यक्रम समितीतर्फे होलिकोत्सवानिमित्त गुरुवार दि. १४ मार्च ६८ रोजी सायं. ६-३० वा. राजकवी रा. अ. काळेले यांच्या खास उपस्थितीत कवि-संमेलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हे कवि-संमेलन, ज्येष्ठ कवी प्रा. या. मु. पाठक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

यावेळी राजकवी श्री. रा. अ. कालेले यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त संस्थेतर्फे पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

कवि-संमेलनात प्रा. भ. श्री. पंडित, श्री. रा. अ. काळेले, प्रा. या. मु. पाठक आणि नागपुरातील प्रथितयश व नवोदित कवींनी भाग घेतला.

सहआमंत्रक श्री. वा. के. अत्रे यांनी सर्व कवींचे आभार मानल्यावर हा कार्यक्रम संपला.

नाटच समिती तर्फे:– दि. १ जून रोजी नाटककार कै. श्री. कृ. कोल्हटकर स्मृतिदिनानिमित्त प्रा. मनोहरराव रोकडे यांचे भाषण झाले.

दि. ३ जून रोजी नाटककार कै. वीर वामनराव जोशी स्मृतिदिनानिमित्त प्रा. जगन्नाथराव नाईकवाडे यांचे भाषण झाले.

कै. नाना जोग स्मृतिदिन

कै. नाना जोग स्मृतिदिनानिमित्त दि. १ मे रोजी रात्रो ९ वा. प्रा. प्रभाकरराव चांदेकर लिखित 'भ्रमात पडले जर बच्चमजी' व 'आमुचे माहेर खूप दूर दूर' ह्या दोन एकांकिका सादर करण्यात आल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान 'तरुण भारता'चे संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी मंडित केले होते.

नटसम्राट बालगंधर्व–शोकसभा

नटसम्राट श्री. नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांच्या निधनानिमित्त गुरुवार दि. २७ जुलै रोजी सायं. ६. ३० वाजता धनवटे रंगमंदिरात शोकसभा आयोजित करण्यात आली. यावेळी श्री. मा. ज. कानेटकर, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. नरहर जोशी, श्री. बाळासाहेब अण्णिगेरी, श्री. दि. ब. पंडित, प्रा. रु. पां. पाजणकर, श्री. व. ना. एकबोटे, डॉ. वि. भि. कोलते आणि श्री. सखारामपंत जोशी यांची भाषणे झाली.

या कार्यक्रमाचे वेळी नटसम्राट बालगंधर्व यांच्या नाट्यपदांच्या ध्वनिमुद्रिका लावण्यात आल्या.

कलाकेंद्राचे संयोजक श्री. वसंतराव टिकेकर यांनी या कार्यक्रमासाठी कै. बालगंधर्वांचे एक छायाचित्र तयार करून दिले.

दि. २६ ऑगस्ट रोजी, नाट्याचार्य कै. कृ. प्र. खाडिलकर पुण्यतिथीनिमित्त प्रा. म. ना. लोही यांचे व्याख्यान झाले.

दि. ५ नोव्हेंबर रोजी रंगभूमीदिनानिमित्त रंगभूमीविषयक ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

अनुक्रमणिका

दि. १ जानेवारी ६८ रोजी सायं. ६.३० वा., मुंबईचे श्री. रंगनाथ कुळकर्णी यांनी 'एका गाढवाची कहाणी' हा कथाकथनाचा साभिनय कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी स्वीकारले होते.

कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा : तृतीय वर्ष

यावर्षी कै. पदमाकर डावरे एकांकिका स्पर्धा, दि. २३ आणि २५ जानेवारी व ८ फेब्रुवारी रोजी धनवटे रंगमंदिरात आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेत, ऑर्डिनन्स क्लब, भंडारा यांनी 'कुणी गोविंद घ्या', विश्वेश्वर रिज. इंजिनियरिंग कॉलेज नागपूर यांनी 'दादा ! भाई !! नवरोजी !!!' ए., आय्. आर. कलामंडळ नागपूर यांनी 'चोरावर मोर' रंजनकला मंदिरातर्फे 'दोन यमांचा फार्स' आणि धनवटे नॅशनल कॉलेजतर्फे 'मद्रासीने केला मराठी भ्रतार' हया एकांकिका सादर करण्यात आल्या.

या स्पर्धेत, रंजन कला मंदिराने सादर केलेल्या 'दोन यमांचा फार्स' या एकांकिकेला सर्व-प्रथम क्रमांकाचे रु. ५० चे पारितोषिक व फिरती रौप्यढाल देण्यात आली.

विश्वेश्वरय्या रिज. इंजि. कॉलेजने सादर केलेल्या 'दादा ! भाई !! नवरोजी !!! या एकांकिकेला द्वितीय क्रमांकाचे रु. ३० चे पारितोषिक देण्यात आले.

वैयक्तिक अभिनयाचे प्रथम पारितोषिक रु. १५ कु. कल्पना तिवारी ('दोन यमांचा फार्स–भूमिका 'मैना') यांना मिळाले.

वैयक्तिक अभिनय – द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक रु. १० कु. रजनी मंडलेकर ('दादा ! भाई !! नवरोजी !!!' – भूमिका सत्यभामाबाई) यांना मिळाले.

तृतीय क्रमांकाचे रु. ५ चे पारितोषिक 'श्री. सुरेंद्र दळवी (दादा ! भाई नवरोजी !!! – भूमिका 'माधव') यांना मिळाले.

श्री खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धा

श्री खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धेत यावर्षी लॉ कॉलेज नागपूर (तुझे आहे तुजपाशी), मेडिकल कॉलेज, नागपूर (दिनूच्या सासुबाई राधाबाई) हिस्लॉप कॉलेज, नागपूर (तीन चौक तेरा) धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर (साष्टांग नमस्कार), श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय नागपूर (एखाद्याचे नशीब), शासकीय विज्ञान महाविद्यालय नागपूर (उसना नवरा) आणि सुवालाल पाटणी महाविद्यालय मुलगाव (शितू) या महाविद्यालयांनी भाग घेतला.

हया स्पर्धेत मेडिकल कॉलेजने सादर केलेल्या. ' दिनूच्या सासुबाई राधाबाई ' या नाटकाचा प्रथम क्रमांक आल्यामुळे या महाविद्यालयाला 'श्री खोलकुटे रौप्य ढाल' मिळाली.

अभिनयाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रु. १५/– श्री सुहास देशमाने (दिनूच्या सासुबाई राधाबाई– भूमिका 'डॉ. नाथ') यांना मिळाले.

स्त्रीभूमिकेचे सर्वोत्कृष्ट वैयक्तिक पारितोषिक रु. १५–/ कु. विजया शिलेदार (दिनूच्या सासुबाई राधाबाई भूमिका —'प्रिती') यांना मिळाले.

या दोन्ही स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ, संघाध्यक्ष प्रा. वा. कृ. चोरघडे यांचे हस्ते दि. ८ फेब्रुवारी रोजी झाला.

अनुक्रमणिका

नाट्यचर्चा – सत्र

नागपुरातील मराठी रंगभूमीशी लेखक, दिग्दर्शक, नट, तंत्रज्ञ, समीक्षक यापैकी कुठल्याही नात्याने प्रत्यक्ष संबंध असलेल्या व्यक्तींसाठी संस्थेने एक नाट्यचर्चासत्र दि. २४ ते ३१ मार्च पर्यंत आयोजित केले. हे चर्चासत्र श्री. बाबुराव चिमोटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. त्याचे आयोजन श्री· पु. व्यं. दारव्हेकर, आमंत्रक, नाट्य समिती ह्यांनी केले.

कै. न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा

वि. सा. संघ आणि वक्तृत्वोत्तेजक सभा (पुणे) या संस्थाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली न्या. मू. रानडे आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धा २२, २३ व २४ सप्टेंबर ६७ रोजी धनवटे रंगमंदिरात आयोजित करण्यात आली.

यास्पर्धेत एकूण २१ महाविद्यालयांनी भाग घेतला. वादस्पर्धेचा विषय — 'भारताने अणुबॉम्ब निर्मिती करावी' हा ठेवण्यात आला होता.

यावर्षी विश्वेश्वरय्या रिज. इंजिनियरिंग कॉलेजला फिरती रौप्यढाल मिळाली.

वैयक्तिक प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रु. १००/– कु. जयश्री घोडकी (शासकीय विज्ञान महाविद्यालय, नागपूर) यांना मिळाले असून ६० टक्क्यांहून अधिक गुण मिळाल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले.

दुसऱ्या क्रमांकाचे रु. ७५ चे पारितोषिक श्री. अनिल वसंत शालिग्राम (डी लक्ष्मी नारायण टेक्. इन्स्टिटयूट नागपूर) यांना मिळाले.

तसेच श्री. मोहन फाटे आणि श्री. पी. एस्. दीक्षित यांना ६० टक्यांहून अधिक गुण मिळाल्याबद्दल प्रमाणपत्रे देण्यात आली.

दि. २४ सप्टेंबर रोजी या वादस्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ श्री. अेम्. व्ही. बोपर्डीकर, डायरेक्टर, सेंट्रल पब्लिक हेल्थ इंजि. रिसर्च इन्स्टिटयूट नागपूर यांच्या हस्ते पार पडला.

या वादस्पर्धेचे वेळी तीनही दिवस परीक्षक म्हणून अॅड. श्री. वसंतराव साठे, श्री. त्र्यं. खं. गंधे आणि श्री. अ. गो. देशपांडे यांनी सहकार्य दिले.

श्री. वि. स. खांडेकर सत्कार समिति (पुणे)

श्री. वि. स. खांडेकर सत्कार समिति (पुणे) यांचे वतीने वि. सा. संघाच्या स्वाधीन केलेल्या निधीच्या रकमेवरील व्याजातून महाराष्ट्रातील विद्यापीठांतून बी. ए. परीक्षेत मराठी ऐच्छिक विषयात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला पारितोषिक देण्यात येते.

इ. स. १९६७—६८ मध्ये पुढील प्रमाणे श्री. वि. स. खांडेकर पारितोषिके देण्यात आली.

श्री. दिगंबर परशुराम लाखणीकर (लाखणी) नागपूर विद्यापीठ, नागपूर

सौ. लीना अरविंद तुळपुळे (मुंबई) मुंबई विद्यापीठ, मुंबई

कु. वासंती विष्णु माटे (औरंगाबाद) मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

श्रीमती उषा रामकृष्ण गोडबोले (सातारा) पुणे विद्यापीठ, पुणे

कु. हेमलता बाळकृष्ण जोशी (सोलापूर) श्री शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परीक्षा समिती तर्फे – यावर्षी मराठी प्रवेश ते साहित्य पारंगत या परीक्षा घेण्यात आल्या.

दोन्ही सत्रांमध्ये एकूण १९७५ विद्यार्थी परीक्षेस बसले.

ऑक्टोबर ६७ सत्र– १०७० विद्यार्थी ३५ केंद्रे;

फ़ेब्रुवारी ६८ सत्र– ९०५ विद्यार्थी; ३० केंद्रे.

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय :–यावर्षी श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयान्तर्गत अभ्यास मंडळातर्फे बी. ए. आणि एम्, ए. (मराठी) करिता मार्गदर्शन मिळण्याची व्यवस्था करण्यात आली.

संदर्भ ग्रंथालयाकरिता सावरकर वाङ्मय, गडकरी वाङ्मय, वरेरकर वाङ्मय आणि अनेक टीकाग्रंथ घेण्यात आले.

(अ) नटसम्राट बालगंधर्व यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी बालगंधर्वावर लिहिलेल्या वाङ्मयाचे एक छोटेसे प्रदर्शन गडकरी सभामृहात, अभ्यासमंडळातर्फे आयोजित करण्यात आले.

या प्रदर्शनात बालगंधर्वासंबंधीं ग्रंथ, विविध लेख व वृतपत्रांचे खास श्रद्धांजली-अंक प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. याकरिता नागपूर-विद्यापीठ-वाचनालयाचे प्रमुख ग्रंथपाल श्री. वसंतराव कुळकर्णी यांचे अमूल्य सहकार्य लाभले.

(आ) मराठी टीकावाङ्मयाचे धावते प्रदर्शन :–समृद्ध अशा मराठी टीकावाङ्मयाचे धावते दर्शन अभ्यासकांना घडविण्याचे दृष्टीने अभ्यासमंडळाच्या वतीने ग्रंथालय–सप्ताहाच्या निमित्ताने एक प्रदर्शन श्रीशिवाजीसंदर्भ ग्रंथालयात दि. ७ ते १० ऑक्टोवरपर्यंत आयोजित करण्यात आले.

(इ) सानेगुरुजी कथामालेच्या निमित्ताने दि. २३ डिसेंबर रोजी बालवाङ्मयाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आलें. या प्रदर्शनाचे वेळी साहित्य प्रसार केंद्राने सहकार्य दिले.

(ई) श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला डॉ. शं वा. पेंडसे यांचेकडून ग्रंथरूपाने देणगी :– ख्यातनाम साहित्यिक, वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष डॉ. शंकर दामोदर पेंडसे यांनी श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाला आपल्या खाजगी ग्रंथालयातील ८०० मौलिक ग्रंथ देणगी म्हणून दिले.

अभ्यासमंडळातर्फे एम्. ए. च्या (मराठी) विद्यार्थ्यांसाठी श्री. पु. ल. देशपांडे लिखित ' व्यक्ती आणि वल्ली ' या पुस्तकावर दि. १३ जाने. रोजी प्रा. म. वा. कुंडले यांचे व्याख्यान झाले.

२७ वे विदर्भ साहित्य संमेलन

वि. सा. संघाचे २७ वे साहित्य संमेलन वर्धा येथे, दि. २५ व २६ नोव्हेंबर ६७ रोजी ख्यातनाम साहित्यिक श्री. पुरुषोत्तम भास्कर भावे यांच्या अध्यक्षतेखाली, न्यू इंग्लिश हायस्कूलच्या पटांगणात झाले.

संमेलनाचे उद्घाटन दि. २५ रोजी सुप्रसिद्ध कवी, पटकथा लेखक श्री. ग. दि. माडगूळकर यांच्या हस्ते झाले.

स्वागताध्यक्ष श्री. रामेश्वरजी बजाज यांनी भाषण केल्यावर संमेलनाध्यक्षांच्या गौरवपर भाषणे झाली.

यानंतर श्री. पु. भा. भावे यांचे भाषण झाले.

रात्री १० वा. सुप्रसिद्ध पार्श्वगायक श्री. सुधीर फडके यांचा 'गीतरामायणा'चा कार्यक्रम झाला.

'मराठी संतांची कामगिरी' या विषयावर परिसंवाद

दि. २६ रोजी सकाळी १० वा. प्राचार्य डॉ. मा. गां. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली 'मराठी संतांची कामगिरी या' विषयावर परिसंवाद झाला.

या कार्यक्रमात, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. सुरेश म. डोळके, डॉ. द. मि. कुळकर्णी, श्री. सुदामजी सावरकर आणि श्री. ज. मी. अकर्ते यांची भाषणे झाली.

सत्कार:– या कार्यक्रमानंतर, वर्धा येथील वयोवृद्ध साहित्यिकांचा श्रीफल आणि शाल देऊन देऊन सत्कार करण्यांत आला. दुपारी २ वाजता विषय नियामक समितीची सभा व २-३० वा. सर्व साधारण सभा झाली.

सायंकाळी ५ वाजता खुले अधिवेशन झाले. यावेळी दिवंगत साहित्यिकांना श्रद्धांजली अर्पण करणारा ठराव मांडण्यात आला.

समारोपादाखल श्री. पु. मा. भावे यांचे भाषण झाले.

सायं ६ वा. प्रा. वा. कृ. चोरघडे यांच्या अध्यक्षतेखाली ' कथा कथना ' चा कार्यक्रम झाला.

रात्री १० वा. नाटककार श्री. गोविंद भिडे यांनी ' कुर्यात् सदा मंगलम् ' हा एकपात्री प्रयोग सादर केला.

संमेलनाचे आयोजक श्री. रामेश्वरजी बजाज, प्रा. दे. गं. सोटे. प्रा. कुसुमाकर बोरोकर आणि इतर कार्यकर्ते यांनी संमेलन यशस्वी केले.

'युगवाणी '-संपादक मंडळातर्फे ११ अंक प्रसिद्ध झाले. यावर्षी 'दिवाळी विशेषांक' आणि 'कला केंद्र' विशेषांक काढण्यात आले. नवोदित कवी व लेखक यांच्या साहित्याला प्रोत्साहन देण्याचे संपादक–मंडळाचे धोरण वाखाणण्याजोगे आहे.

' कला केंद्र ' समिती

भारत सोव्हिएत मैत्री संघातर्फे लेनिनग्राड येथे ' हमारा भारत ' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या चित्रप्रदर्शनासाठी नागपूरच्या बालकलाकारांची चित्रस्पर्धा कलाकेंद्र समितीच्या वतीने रविवार, दि. २३ जुलै ६७ रोजी चित्रस्पर्धा आयोजित करण्यात आली. या समितीद्वारा चित्रकलेचे वर्ग चालविण्यात आले. श्री. दुधपचारे आणि श्री. वसंत कोषळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. १८-९-६७ रोजी ' युगवाणी–कलाकेन्द्र समिती विशेषांकाचे प्रकाशन श्री. कृ. ग. पाठक, उपसंचालक शिक्षण विभाग, नागपूर यांच्या हस्ते सायं. ७ वा. गडकरी सभागृहात झाले. यावेळी 'कलाकेन्द्रा'च्या दालनात लहान मुलांनी तयार केलेल्या चित्रकलाकृतीचे प्रदर्शन भरविण्यात आले.

शंकर्स आंतरराष्ट्रीय बालचित्रस्पर्धेसाठी, कलाकेंद्रातील बालकांनी तयार केलेली चित्रे पाठविण्यात आली.

इ. स. ६६ मधील चित्रकलेचे बक्षिस कु. रोहिणी साठे या बालिकेला मिळाले.

लहान मुलांच्या चित्रांचे एक खास चित्रप्रदर्शन भरविण्यात आले. या चित्रप्रदर्शनांचे उद्‌घाटन ' मुलांचें मासिक' कर्ते श्री. वा. रा. मोडक यांच्या हस्ते झाले.

मृत्तिका - पुष्पपात्रांचे आकर्षक प्रदर्शन

कलाकेन्द्र समितीच्या वतीने दि. २४ मार्च रोजी युवक कलाकार श्री. अशोकराव यांनी तयार केलेल्या ४० मृतिका–पुष्पपात्रांचे आकर्षक प्रदर्शन टिळक सभागृहात आयोजित करण्यात आले.

या प्रदर्शनाचे उद्‌घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. ग. त्र्यं माडखोलकर यांच्या हस्ते झाले.

देणगी :–श्री काकासाहेब दांडेकर, डायरेक्टर, कॅम्लीन प्रा. लि. मुंबई यांनी 'कलाकेंद्राला' १०१ रु. ची देणगी दिली.

कै. राम गणेश गडकरी स्मृतिदिन

कवी–नाटककार कै. राम गणेश गडकरी यांच्या ४९ व्या स्मृतिदिनानिमित्त दि. २३ जानेवारी रोजी सुप्रसिद्ध कवी प्राचार्य राम शेवाळकर, वणी यांचे 'गडकऱ्यांचे श्रेय व प्रेय' या विषयावर भाषण झाले.

परिसंवाद

दि. २७ सप्टेंबर रोजी सायं. ६-३० वा. युगवाणीचे संपादक श्री. मा. नी. गलगलीकर यांचे अध्यक्षतेखाली धनवटे रंगमंदिरात खालील विषयांवर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला.

विषय–	वक्ते–
विद्यार्थी आणि राजकारण	श्री. मा. गो. वैद्य
विद्यार्थी आणि अभ्यास	अॅड. श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी
विद्यार्थी आणि पालक	अॅड. श्री. चंद्रशेखर माडखोलकर.

मराठी अध्यापन : चर्चा सत्र

संघातर्फे 'मराठीचे अध्यापन' या विषयावर दि. १७ ते १९ डिसेंबरपर्यंत एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

चर्चासत्राचे उद्‌घाटन दि. १७ डिसेंबर रोजी दुपारी ४.३० वा. नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांचे हस्ते झाले.

सुरुवातीला प्रा. म. बा. कुंडले यांनी चर्चासत्रासंबंधी माहिती दिली.

यानंतर प्राचार्य डॉ. मा. गो देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली 'अध्यापन' विषयावर पहिली बैठक झाली.

ता. १८ रोजी 'अध्यापनपद्धती' व ता. १९ रोजी 'पाठ्यपुस्तक व परीक्षापद्धती' या विषयावर चर्चा झाली.

या चर्चेमध्ये शिक्षक, प्राध्यापकांनी भाग घेतला.

वि. सा. संघाचा वर्धापन दिन

संस्थेचा ४५ वा वर्धापन–दिन ता. १४ जानेवारी रात्रौ ८.३० वाजता साजरा करण्यात आला.

या प्रसंगी श्री. वा. के अत्रे यांनी वर्धापन दिनासंबंधी उपस्थितांना माहिती निवेदन केली.

या नंतर 'स्वरमंडळा' तर्फे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात श्री. संजय पंडितजी यांचे सतारवादन आणि सुप्रसिद्ध गायक श्री. मधुसूदन भावे यांचे गायन झाले.

भेटी व सत्कार

कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांचा सत्कार

भोपाळ येथे मे ६७ मध्ये भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या ४७ व्या अधिवेशनाचे नियोजित अध्यक्ष, महानुभाव वाङमयाचे संशोधक आणि सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. वि. भि कोलते, कुलगुरू, नागपूर विद्यापीठ यांचा संस्थेतर्फे दि. १८ एप्रिल रोजी जाहीर सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राचार्य डॉ. मा. गो देशमुख, श्री. दि. बं. पंडित, श्री. पु. व्यं. दारव्हेकर, प्रा. द. भि. कुळकर्णी व प्रा. वा. कृ. चोरघडे यांची गौरवपर भाषणे झाली.

लो. ना. डॉ. बापूजी अणे यांचा ८८ वा वाढदिवस

लोकनायक डॉ. मा. श्री. ऊर्फ बापूजी अणे यांचा ८८ वा वाढदिवस दि. १९ ऑगस्ट रोजी न्या. मू. डॉ. भवानीशंकर नियोगी यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

यावेळी अॅड. श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी, अॅड. श्री. चंद्रशेखर माडखोलकर, व श्री. जांवु-वंतराव धोटे यांची भाषणे झाली.

२७ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. पु. भा. भावे यांचा सत्कार

वर्धा साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष, सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. पु. भा. भावे यांचा सत्कार दि. २४–११–६७ रोजी सायं. ६. ३० वा. करण्यात आला.

यावेळी श्री. शं. वा. शास्त्री, श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी, कु. प्रभा गणोरकर यांची भाषणे झाली.

या कार्यक्रमाला संमेलनाचे उद्घाटक, सुप्रसिद्ध कवी व चित्रपट कथा लेखक श्री. ग. दि. माडगूळकर आणि 'महाराष्ट्र टाईम्स' चे संपादक श्री. गोविंदराव तळवलकर उपस्थित होते.

दि. २ जुलै रोजी, 'महाराष्ट्र टाईम्स' चे संपादक श्री. द्वा. भ. कर्णिक यांनी संस्थेला भेट दिली.

सुप्रसिद्ध समाजसेवक श्री. मा. ज. कानेटकर यांच्या ७७ व्या वाढदिवसानिमित्त २७ जुलै रोजी सत्कार करण्यात आला. यावेळी आचार्य दादासाहेब धर्माधिकारी यांचे भाषण झाले.

सुप्रसिद्ध साहित्यिक व नाट्यवाङ्मयाचे अभ्यासक श्री. शि. गो. भावे यांनी १४ ऑगस्ट रोजी भेट दिली.

दि. ५ ऑक्टोबर रोजी, दिल्ली विश्वविद्यालयातील हिन्दी विभागाचे अध्यक्ष व हिन्दी साहित्यिक डॉ. नगेन्द्र यांनी भेट दिली.

दि. १२ मार्च रोजी सुप्रसिद्ध हिंदी साहित्यिक डॉ. नगेन्द्र आणि डॉ. मोहिनीवल्लभ पंत यांनी भेट दिली.

निरोप समारंभ

सुप्रसिद्ध लेखक श्री. श्रीकान्त राय यांची नाशिक येथे बदली झाली. त्यानिमित्त १७ ऑगस्ट रोजी सायं. ७ वा. त्यांना संस्थेतर्फे निरोप देण्यात आला.

यावेळी उपाध्यक्ष श्री. शं. वा. शास्त्री व युगवाणीचे संपादक श्री. मा. नी. गलगलीकर यांची भाषणे झाली.

चहापानानंतर हा निरोपसमारंभ आटोपला.

अनुक्रमणिका

शाखावृत्त

गोंदिया, यवतमाळ, वणी, चंद्रपूर, अमरावती, वर्धा, उमरखेड, खामगाव, कारंजा, वरोरा या गावी वि. सा. संघाच्या शाखा आहेत. या शाखांनी यावर्षी कार्यक्रम आयोजित करून संस्थेच्या प्रसार व प्रचाराला साहृय केले.

कारंजा शाखेच्या सभासदांची दि. २१ मे रोजी सभा झाली. यावेळी इ. स. १९६७-६८ सालासाठी कार्यकारी मंडळ निवडण्यात आले.

शाखा सभासद वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आला.

१५ ऑगस्ट रोजी आमदार सौ. प्रतिभा तिडके हृयांच्या अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध कवी प्राचार्य भाऊ मालेराव यांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन झाले.

उमरखेड या गावी या वर्षी शाखा स्थापन करण्यात आली.

दि. १७ ऑगस्ट रोजी शाखासभासदांची सभा होऊन इ. स. ६७–६८ करिता पदाधिकारी निवडण्यात आले. शाखाध्यक्षपदी डॉ. सिंगम यांची व कार्याध्यक्ष म्हणून प्रा. वा. दा. जोशी यांची निवड करण्यात आली.

गोंडवन शाखा–चंद्रपूर

दि. ३१ डिसेंबर रोजी अध्यक्ष श्री. न. रा. निमजे यांचे अध्यक्षतेखाली गोंडवन शाखेची सभा होऊन इ. स. ६७–६८ करिता पदाधिकारी निवडण्यात आले.

दि. १४ जानेवारी रोजी संघाचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी वणीचे प्राचार्य राम शेवाळकर यांचे भाषण झाले.

दि. २३ जानेवारी रोजी कवी–नाटककार कै. राम गणेश गडकरी यांचा स्मृतिदिन साजरा झाला.

तसेच 'सुभाष–जयंती' साजरी करण्यात आली. याप्रसंगी 'भाषाप्रभू गडकरी' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला.

वणी शाखा

दि. १५ जुलै रोजी शाखासभासदांची सभा झाली. यावेळी इ. स, ६७–६८ करिता कार्यकारी मंडळ निवडण्यात आले.

दि. १० जुलै रोजी श्री. अप्रबुद्ध पाळेकर यांच्या निधनानिमित्त शोकसभा घेण्यात आली.

दि. १७ जुलै रोजी डॉ. च. घ. देशमुख यांचे आषाढी एकादशीनिमित्त कीर्तनचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दि. १९ जुलै रोजी नटसम्राट बालगंधर्व यांच्या निधनानिमित्त शोकसभा घेण्यात आली. यावेळी प्राचार्य राम शेवाळकर, श्री. माधव सरपटवार, श्री. बाबाराव काटपाताळ, प्रा. कवडे यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

दि. १ ऑगस्ट रोजी संघाध्यक्ष प्रा. वा. कृ. चोरघडे यांनी शाखेला भेट दिली.

यावेळी प्रा. चोरघडे यांनी शाखेच्या कार्यासंबंधी मार्गदर्शन केले.

गोंदिया शाखा

दि. १ ऑगस्ट रोजी लो. बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथीनिमित्त शाखाध्यक्ष श्री. माहादेवराव घोटे यांचे अध्यक्षतेखाली प्रा पाध्ये, सि. जज्ज यांचे भाषण झाले.

दि. २६ ऑगस्ट रोजी नाटककार कै. कृ. प्र. खाडिलकर यांचा स्मृतिदिन साजरा झाला. यावेळी श्री. बाबासाहेब तनखीवाले यांचे अध्यक्षतेखाली श्री. वसंतराव मातुरकर यांचे भाषण झाले. याप्रसंगीं विद्यार्थ्यांचीही व्याख्याने झाली.

दि. ३० ऑगस्ट रोजी कविवर्य 'बी' यांचा स्मृतिदिन साजरा झाला. यावेळी श्री. रमेशचंद्र कुळकर्णी आणि कुमार प्रकाश एदलाबादकर यांची भाषणे झाली.

अमरावती शाखा

दि. १६ - ४ - ६७ रोजी शाखासभासदांची सभा झाली. या सभेत कार्यकारी मंडळातील पदाधिकारी निवडण्यात आले. अध्यक्ष म्हणून श्री. सुदाम सावरकर यांची बहुमताने निवड झाली. चिटणीस म्हणून सौ. सिंधू मांडवकर यांचे नाव सुचविण्यात आले व त्याला सर्वांनी अनुमोदन दिले.

दि. १६ मार्च ६८ ला सभा झाली. यामध्ये इ. स. ६८ - ६९ करिता खालील पदाधिकारी निवडण्यात आले.

अध्यक्ष—डॉ. द. ह. अग्निहोत्री, उपाध्यक्ष – प्रा. सौ. सुनंदा खेरडे, सरचिटणीस प्रा. सौ. सिंधू मांडवकर, कोषाध्यक्ष–श्री. सुदाम सावरकर.

या सभेचे वेळी प्रा. भाऊ मांडवकर यांनी लिहिलेल्या 'कोलाम' ग्रंथाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

वि. सा. संघाला अनुदान

विदर्भ साहित्य संघाला महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कडून खालीलप्रमाणे अनुदान प्राप्त झाले.

(अ)	वार्षिक अनुदान	रु. ७५००/–
(आ)	नाट्यसमिती	रु. २५००/–
(इ)	'युगवाणी' मासिकाकरिता	रु. ५०००/–

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला सर दोराबजी टाटा ट्रस्ट मुंबई यांचेकडून रु. १०००/– व श्री रतन टाटा ट्रस्टकडून रु. ५००/– देणगीदाखल मिळाले.

वि. सा. संघ शासनाचा आणि इतर देणगीदारांचा अत्यंत आभारी आहे.

इ. स. १९६७–६८ मध्ये ज्या ज्या व्यक्तींनी सहकार्य दिले त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

आपले,

ग. त्र्यं. माडखोलकर अध्यक्ष	अ. ल. लिमये वा. के. अत्रे	मा. नी. गलगलीकर सरचिटणीस
(डॉ.) मा. गो. देशमुख (प्रा) राम शेवाळकर उपाध्यक्ष.	शांताराम पोटदुखे चिटणीस	म. गो. भांबूरकर कोषाध्यक्ष

विदर्भ साहित्य संघाची विक्रीस तयार असलेली प्रकाशने

	पुस्तके		रु. पैसे
१.	कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह : भाग २		३–००
२.	The Vedasthan or The Ancient Home of the Indo-Aryans	ले. कै. डॉ. तु. ज. केदार	३–००
३.	प्रयोगक्षम मराठी नाटके	डॉ. मु. श्री. कानडे	१५–००
४.	केशवसुत वाङ्मयसूची	सौ. उज्ज्वल अयाचित	१–००
५.	मराठी वर्णोच्चार विकास	डॉ. द. ह. अग्निहोत्री	१६–००
६.	लोकसाहित्य संपदा	ना. रा. शेंडे	६–००
	कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध		
७.	नाटककार गडकरी	डॉ. द. रा. गोमकाळे	०–३१
८.	गोविंदाग्रज यांचा कवी या नात्याने विचार	कविभूषण प्रा अण्णासाहेब खापर्डे	०–५०
९.	गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत	प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
१०.	सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	द. वि. तेंडूलकर	०–५०
११.	गडकऱ्यांची खरी भूमिका	प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
१२	गडकऱ्यांची नाट्यशैली	प्रा. रू. पा. पांजणकर	०–५०
१३.	गडकऱ्यांची नाट्यप्रकृति व नाट्यसृष्टी	वसंत वरखेडकर	०–६०
१४.	गडकरीकालीन नाट्यतंत्र व गडकरी	वसंत वरखेडकर	०–६०

सर्व प्रमुख पुस्तकविक्रेत्यांकडे मिळतात. न मिळाल्यास मागणी करा–

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर–१.

अनुसूची ११ (नियम १७ (१) प्रमाणे)

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

३१ मार्च १९६८ ला संपणाऱ्या जमा–खर्चाचा तक्ता

खर्च		उत्पन्न	
इमारतीकरिता झालेला खर्च :— अवमूल्यन (Depreciation)	२,८३८.८५	व्याज (ठेवीवरील)	६९५.५३
अंकेक्षण शुल्क	२००.००	सरकारी अनुदान	१५,०००.००
वि. सा. संघाच्या उद्देशाप्रमाणे झालेला खर्च— शैक्षणिक	३२२६८.१४	वि. सा. संघ-कार्यक्रमांचे उत्पन्न	५,७४३.५२
आधिक्य स्थितिविवरणाकडे (Surplus Carried over to Balance Sheet)	८,१२९.५४	इतर उद्गमांपासून उत्पन्न (Income from other Sources)	
		साधारण सभासद वर्गणी	४,७४१.००
		संलग्न संस्था	२०.००
		परीक्षा शुल्क	६,१७५.२९
		पुस्तक विक्री	६१३.९९
		युगवाणी वर्गणी	३४१.००
		युगवाणी-जाहिरातीचे उत्पन्न	१५०.००
		किरकोळ उत्पन्न	१,८१५.१९
		रंगमंदिर आधिक्य (Rang Mandir Surplus)	८,१४१.०१
एकूण—	४३,४३६.५३	एकूण—	४३,४३६.५३

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस,
वि. सा. संघ

ग. त्र्यं. माडखोलकर
अध्यक्ष,
वि. सा. संघ

म. गो. भांबूरकर
कोषाध्यक्ष,
वि. सा. संघ

याच दिनांकाच्या अहवालाप्रमाणे
१९-७-१९६८
महेश्वर गद्रे आणि कंपनी
चार्टर्ड अकौंटंटस्

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ – धनवटे रंग मंदिर, नागपूर

३१ मार्च १९६८ ला संपणाऱ्या आय–व्ययाचा तक्ता

व्यय		रुपये पैसे	आय	रुपये पैसे
वेतन		१०,२३० . ००	भाडे	५०,७९६ . ००
वीज खर्च		४,९५९ . ९५	द्विचक्र स्थान	१,५२१ . ८६
कर		४,९८३ . २६		
विमा हप्ता		५७८ . १३		
दूर ध्वनी		२९३ . ५५		
किरकोळ खर्च		१,०२२ . ५१		
अधिकोष वर्तन		१ . ८०		
थकित देणे				
नागपूर नाट्य मंडळ	२४५ . ०५			
यशवंत कला केंद्र	२४५ . ०५	४९० . १०		
अवमूल्यन (Depreciation)				
इमारत ५% प्रमाणे	१९,३५४ . ८०			
उपस्कर १०% प्रमाणे	२,२६२ . ७५	२१६१७ . ५५		
आधिक्य		८,१४१ . ०१		
एकूण		५२,३१७ . ८६	एकूण	५२,३१७ . ८६

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस,
वि. सा. संघ

ग. त्र्यं. माडखोलकर
अध्यक्ष,
वि. सा. संघ

म. गो. भांबरकर
कोषाध्यक्ष,
वि. सा. संघ

याच दिनांकाच्या अहवालाप्रमाणे
१९–७–६८
महेश्वर गद्रे आणि कंपनी
चार्टर्ड अकौंटंटस्

अनुक्रमणिका

अनुसूची ८ (नियम १७ (१) प्रमाणे)

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

३१ मार्च १९६८ चे स्थिती विवरण (बॅलन्सशीट)

फंड लायबिलीटीज	रुपये पैसे	रुपये पैसे
मंदिर निधी मागील	२,०२,७८७ . २४	
यंदाची समयोजना	४७,८९९ . ६७	२,५०,६८६ . ९१
श्री शिवाजी ग्रंथालय		
सरकारी अनुदान मागील	२,४१,९७३ . ००	
सरकारी अनुदान यंदाचे	३२,००० . ००	२,७३,९७३ . ००
इतर विशेषांकित निधी–		
अवमूल्यन निधी	२०५८०४ . ८७	
आजीव सभासद	१३७५९ . ००	
कै. वेहेरे व्याख्यानमाला	६००० . ००	
श्री गणेश व्याख्यानमाला	६००० . ००	
श्री खांडेकर सत्कार निधी	८,०८२ . १६	
कै. श्री. वरेरकर सत्कार निधी	५८५ . ७१	
डॉ. शिंगणापूरकर पारितोषिक	५०० . ००	
कै. श्री. नेने स्मारक निधी	७५ . ००	
रगमंदिर देणग्या	४००१ . ००	
भविष्य निधी	२५३१ . ९६	
कै. पद्माकर डावरे एकांकिका नाट्य स्पर्धा	९४८ . ८३	
कै. श्री. गो. रा. दोडके स्मारक	३०० . ००	
कै. नाना जोग स्मारक फंड	२,०६८ . ८८	
श्रीशिवाजी ग्रंथालय देणग्या	५२,४५८ . ७८	
श्री. पेंडसे छायाचित्र	२५ . ००	
कै. रानडे वाद-स्पर्धा	१२७ . ४३	३,०३,२६८ . ६२
तात्पुरते कर्ज		८००० . ००
निलंबित खाते		५ . ४०
बँक अधिविकर्षण		९३५ . २३
देणे असलेला खर्च		२०० . ००
एकूण		८,३७,०६९ . १६

असेट्स प्रॉपर्टीज	रुपये पैसे	रुपये पैसे
मंदिर रचना (संघ मंदिर व श्री शिवाजी ग्रंथालय)		७,२०,३९१ . ७०
विद्युत् आणि दूरध्वनी स्थित निक्षेप		२,१५६ . ००
प्रसिद्धी अधिकारी खाते यांचेकडून येणे असलेले भाडे		१,५२५ . ००
इमारत बांधकामाचा अग्रिमा		१,३६० . ९६
ग्रंथ प्रकाशन :—		
खर्च मागील	८,७७३ . ३५	
खर्च यंदाचा	१८५ . ००	
	८,९५८ . ३५	
मागील वजा–अनुदान	८,९२० . ००	३८ . ३५
कर्मचाऱ्यास अग्रिमा		५९ . ३७
रोख आणि बँक खाते शिल्लक :		
मुदती ठेव	२५,७०५ . ००	
दि बँक ऑफ महाराष्ट्र (बिल्डींग फंड)	२७,१३७ . ६८	
दि बँक ऑफ महाराष्ट्र (शिवाजी ग्रंथालय)	२४१ . ५७	
विदर्भ प्री–को–ऑ–हाउसिंग सोसायटी	१८९१ . ०३	
,, (प्रॉ. फंड)	२५३१ . ९६	
शिल्लक जवळ वि. सा. संघ (रु. ११०८१ . ४९ धनादेश घरून)	११३७१ . ४५	
शिल्लक जवळ रंगमंदिर	६७ . ९५	
शिल्लक जवळ श्रीशिवाजी ग्रंथालय	८७ . ००	६९,०३३ . ६४
जमा खर्चाचा हिशेब–		
मागील बॅलन्स शीटमध्ये दाखविलेली रक्कम	५०,६३३ . ६८	
वजा यंदाचे (आधिक्य)	८१२९ . ५४	४२,५०४ . १४
एकूण		८,३७,०६९ . १६

प्रमाणपत्र--विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या ३१ मार्च १९६८ रोजी तयार असलेल्या स्थितिविवरणात वर दिलेले आकडे संघाच्या पुस्तकाशी तंतोतंत जुळतात आणि ही पुस्तके आम्ही तपासली असून ती बरोबर आहेत असे आम्ही प्रमाणपत्र देतो.

याच दिनांकाच्या अहवालाप्रमाणे
नागपूर दि. १९-७-६८

मा. नी. गलगलीकर	**ग. त्र्यं. माडखोलकर**	**म. गो. भांबुरकर**	**महेश्वर गद्रे आणि कंपनी**
सरचिटणीस,	अध्यक्ष,	कोषाध्यक्ष,	चार्टर्ड अकौंटंट्स
वि. सा. संघ	वि. सा. संघ	वि. सा. संघ	

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

३१–३–१९६८ च्या स्थिती–विवरणाच्या मत्तेचे अनुसूचितीचे पत्रक

तपशील	३१-३-१९६७ चे मूल्य	अधिक यंदाचे	एकूण	३१-३-१९६७ पर्यंत अवमूल्यन (Depreciation)	अवमूल्यन यंदाचे	३१-३-१९६८ पर्यंत अवमूल्यन	३१-३-१९६८ ला निव्वळ मूल्य
रंगमंदिर	५,४४,५१७ . २१	१७,८५० . ७५	५,६२,३६७ . ९६	१,५७,४२९ . ३४	१९,३५४ . ८०	१,७६,७८४ . १४	३,८५,५८३ . ८२
श्रीशिवाजी ग्रंथालय	९१,४१७ . २६	३,६२१ . २२	९५,०३८ . ४८	४,४०० . ७५	२,१७५ . ४०	६,५७६ . १५	८८,४६२ . ३३
टिनशेड आणि विहीर	५३,४१ . ८६		५,३४१ . ८६	८९६ . ५९	१११ . १२	१,००७ . ७१	४,३३४ . १५
उपस्कर आणि स्थावर							
रंगमंदिर	३५,६८५ . ७७	४२८ . ४०	३६,११४ . १७	१३,०५८ . ३३	२,२६२ . ७५	१५,३२१ . ०८	२०,७९३ . ०९
विदर्भ साहित्य संघ	११,०८६ . ७६	२८८ . ५०	११,३७५ . २६	५,५६३ . ४६	५५२ . ३३	६,११५ . ७९	५,२५९ . ४७
पुस्तके	३,७७७ . ८१	१,३८६ . ८०	५,१६४ . ६१				५,१६४ . ६१
निर्जीवसाठा	५९६ . ७६		५९६ . ७६				५९६ . ७६
कै. नाना जोग पुतळा	३,१३९ . ४३		३,१३९ . ४३				३,१३९ . ४३
कै. गडकरी तैलचित्र	३०० . ००		३०० . ००				३०० . ००
लो. ना. बापूजी अणे तैलचित्र	३४१ . १७		३४१ . १७				३४१ . १७
ध्वनीक्षेपक		५०० . ००	५०० . ००				५०० . ००
पाण्याचे मिटर	..	११२ . ००	११२ . ००	..	..	..	११२ . ००
एकूण..	६,९६,२०४ . ०३	२४,१८७ . ६७	७,२०,३९१ . ७०	१,८१,३४८ . ४७	२४,४५६ . ४०	२,०५,८०४ . ८७	५,१४,५८६ . ८३

याच दिनांकाच्या अहवालाप्रमाणे
नागपूर दि. १९–७–६८

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस
वि. सा. संघ

ग. त्र्यं. माडखोलकर
अध्यक्ष
वि. सा. संघ

म. गो. भांबूरकर
कोषाध्यक्ष
वि. सा. संघ

महेश्वर गद्रे आणि कंपनी
चार्टर्ड अकौंटंट्स

अनुक्रमणिका

"युगवाणी" [Yugwani] Regd. No. MH 1174

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १.
मुद्रणस्थळ : फ्रीनस प्रिंटींग हौस, वैद्यवाडी, धंतोली, नागपूर १.

अनुक्रमणिका